


# जनमाध्यम



e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २२ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


# देशाला अर्णब चक्रीवादळाचा धोका

**कोलकाता /वृत्तसंस्था :** भारतात सध्या दोन मोठ्या हवामान धोक्यांचा सामना करत आहे. एकीकडे पॅसिफिक महासागरात एल निनो अधिक तीव्र होत आहे. तर दुसरीकडे बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाची शक्यता आहे. हवामान विभागाच्या मते, जर बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची प्रणाली अधिक तीव्र होउन तिचे चक्रीवादळात रूपांतर झाले, तर त्याला अर्णब असे नाव दिले जाईल. ही प्रणाली २० ते २५ सप्टेंबर दरम्यान सक्रिय होउ शकते.यामुळे ओडिशा आणि उत्तर आंध्र प्रदेशसह अनेक किनारपट्टीच्या राज्यांमध्ये मुसळधार पाउस आणि सोसाट्याच्या वा-यांचा धोका वाढला आहे. एल निनोच्या प्रभावामुळे देशाच्या अनेक भागांमध्ये आधीच दुष्काळ आणि कमी पावसाचा धोका निर्माण झाला आहे. या दोन्ही धोक्यांच्या एकत्रित



परिणामामुळे भारताच्या हवामानावर गंभीर परिणाम होउ शकतो. भारतीय हवामान विभागाच्या मते, अंदमान समुद्रात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र पुढील दोन दिवसांत आणखी तीव्र होईल. २१ सप्टेंबर रोजी त्याचे तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात आणि २२ सप्टेंबर रोजी खोल कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर होउ शकते. २३ सप्टेंबरपर्यंत, ते आंध्र प्रदेश-दक्षिण ओडिशा किनारपट्टीजवळ पश्चिम-मध्य आणि लगतच्या वायव्य बंगालच्या उपसागरात पोहोचण्याची शक्यता आहे.

याची तीव्रता आणखी वाढली, तर त्याचे अर्णब चक्रीवादळात रूपांतर होउ शकते. हवामान तज्ज्ञांच्या मते, सध्याची हवामानाची परिस्थिती अशी आहे की ही प्रणाली वेगाने विकसित होउ शकते. त्यामुळे, किनारपट्टीच्या भागात सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. हवामान विभागाने दक्षिण ओडिशा आणि उत्तर किनारपट्टी आंध्र प्रदेशसाठी विशेष सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. २३ आणि २४ सप्टेंबर रोजी या भागांतील तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. २४ सप्टेंबर रोजी दक्षिण छत्तीसगडमध्येही तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. २३ ते २५ सप्टेंबर दरम्यान छत्तीसगड आणि तेलंगणामध्ये, आणि २४ व २५ सप्टेंबर रोजी विदर्भामध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. ओडिशामध्ये २३-२४ सप्टेंबर रोजी ताशी ५०-६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, वा-याचे झोत ताशी ७० किमी पर्यंत पोहोचू शकतात. २३ सप्टेंबर रोजी दक्षिण ओडिशा ➯(पान २ वर)

# राज्यातील विविध जिल्ह्यांना यलो अलर्ट

## मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटाची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई वेधशाळेने पुढील चार दिवसांसाठी हवामानाचा अंदाज जाहीर केला असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. संबंधित जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. २२ सप्टेंबर : नाशिक, नाशिक घाट, अहिल्यानगर, ठाणे, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा, सातारा घाट, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली.

**२३ सप्टेंबर :** नाशिक, नाशिक घाट, अहिल्यानगर, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा, सातारा घाट, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, जालना, परभणी, वाशिम, बुलढाणा, अकोला, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली.

**२४ सप्टेंबर :** सातारा, सातारा घाट, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, लातूर, नांदेड, जालना, परभणी, वाशिम, बुलढाणा, अकोला, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली.

**२५ सप्टेंबर :** वाशिम, बुलढाणा, अकोला, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली.

यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होत असताना आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# मिरजमध्ये सरकारी रुग्णालयाचा स्लॅब कोसळला ; 2 ठार

**सांगली / प्रतिनिधी-** मिरज शहरातून एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. येथील शासकीय रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर उभारण्यात येत असलेल्या नवीन कमानीचे काम सुरू असताना अचानक स्लॅब कोसळून भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत ढिगा-याखाली दबले जाउन २ जणांचा मृत्यू झाला असून ७ ते ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मिरज सिव्हिल हास्पिटलच्या बाहेरील मुख्य प्रवेशद्वारावर एका नवीन कमानीची उभारणी केली जात होती. काही वेळापूर्वीच या कमानीवर स्लॅब टाकण्याचे काम सुरू होते. मात्र, काम सुरू असतानाच अचानक हा स्लॅब कोसळला. कमान कोसळल्याचा आवाज इतका भयंकर होता की, परिसरात एकच खळबळ उडाली आणि मोठा गोंधळ निर्माण झाला.सुदैवाने, ढिगा-याखाली अडकलेल्या ५ ते ६ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले आहे. या दुर्घटनेत जवळपास ७ ते ८ कामगार गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी त्याच रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिस दल, अग्निशमन दलाचे बचाव पथक आणि रुग्णालय प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. सध्या जेसीबी मशिनच्या साहाय्याने स्लॅबचा ढिगारा बाजूला करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ढिगा-याखाली आणखी कोणी अडकले आहे का, याचा शोध घेतला जात आहे. या अनपेक्षित घटनेमुळे रुग्णालयाच्या बाहेर नागरिकांची मोठी गर्दी उसळली असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कमानीच्या बांधकामाच्या दर्जाबाबत आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

# तांदूळ महागणार!; भाताचा उत्पादन खर्च वाढला

**पुणे / प्रतिनिधी-** कराड तालुक्यातील कोपर्डे हवेली परिसरात भात पिकावर सध्या पानावरील अळी कडा करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. शेतक-यांच्या उत्पादन खर्चात आणखी वाढ झाली आहे. पावसाची उघडझाप, त्यानंतर पडणारे कडक उन, वातावरणातील बदलामुळे भात पिकावर किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढत आहे. संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतक-यांकडून कीटकनाशके, बुरशीनाशकासाठी आवश्यक ट?निकची फवारणी सुरू आहे.कोपर्डे हवेली परिसरातील भाताला राज्यभर मागणी आहे, दर्जेदार तांदळाची बाजारपेठेत स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. मात्र, यंदा भात लागवडीपासूनच उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. मजुरी, खते, औषधे, रोपांची लागवड, चिखलणी, मशागत, पाणी व्यवस्थापनासाठी मोठा खर्च करावा लागत आहे. त्यात आता किडी व रोगांच्या नियंत्रणासाठी फवारणीचा अतिरिक्त खर्च वाढला आहे. पानावरील अळी पानांच्या पाठीमागील बाजूस अंडी घालते. अळीचा प्रादुर्भाव वाढल्यास पानांचे नुकसान होउन पिकाच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रतिकूल हवामानामुळे काही ठिकाणी भात पिकाच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता शेतक-यांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे चांगले उत्पादन घेण्यासाठी शेतकरी पिकाची नियमित पाहणी करून आवश्यक फवारणी करत आहेत. उत्पादन खर्च वाढल्याने आगामी काळात भात व तांदळाच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. शेतक-यांना योग्य बाजारभाव मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. लागवडी, फवारणी बरोबर मजुरांचे वाढलेले दर जेरीस आणत आहेत. त्यातच उन पावसाच्या खेळामुळे भाताची वाढ खुंटली आहे. यंदा खर्च जास्त आणि उत्पादन कमी अशी परिस्थिती आहे. भाताची वाढ खुंटली असून फुटवा देखील निघाला नाही. उत्पादन खर्च वाढल्यामुळे तांदूळ देखील महागणार, अशी माहिती भात उत्पादक शेतकरी महादेव चव्हाण यांनी दिली.

# गणेश विसर्जनादरम्यान तिघांचा मृत्यू

**नंदूरबार / प्रतिनिधी-** लाडक्या गणरायाला निरोप देताना महाराष्ट्रात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. नांदेडमध्ये गणरायाचे विसर्जन करताना इंडिनिअरिंगच्या दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. तर नंदुरबारमध्ये विसर्जन करताना २६ वर्षीय तरुणाचा धरणात बुडून मृत्यू झाला. ३ तरुणांच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. नांदेड शहरातील काळेश्वर येथे गोदावरी नदीत बुडून २ तरुणांचा मृत्यू झाला. गणेश विसर्जनासाठी हे तरुण तिथे गेले होते. पोहण्यासाठी ते नदीत उतरले होते. पण पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही बुडाले. दोन्ही तरुण इंजिनिअरिंगचे विद्यार्थी होते. देगलूर तालुक्यातील किनी येथील १९ वर्षीय बजरंग येडूरे आणि मुखेड तालुक्यातील बा-हाळी येथील २० वर्षीय दीपक सोळूंखे अशी मृत तरुणाची नावे आहेत. नांदेड शहराजवळच्या वाडी पाटी येथील मातोश्री प्रतिष्ठान महाविद्यालय येथे हे दोन्ही तरुण इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होते. रविवारी ते आपल्या मित्रांसोबत गणरायाला निरोप देण्यासाठी आले होते. गणरायाच्या विसर्जनासाठी काळेश्वर येथे गोदावरी नदीत ते पोहण्यासाठी उतरले खरे पण पुन्हा बाहेर आले नाहीत. पाण्याचा अंदाज न आल्याने दोघे बुडाले. दोघांचे मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले. नंदुरबारच्या तळोदा तालुक्यात गणेशोत्सवाला गालबोट लागले. गणेश विसर्जनासाठी गेलेल्या २६ वर्षीय तरुणाचा धरणातील पाण्याच्या डोहात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. प्रताप जि-या पावरा असे मृत तरुणाचे नाव होते. तो मेडिकल कॉलेजमध्ये मानधनावर कक्ष सेवक म्हणून कार्यरत होता. प्रताप गणेश मंडळासोबत कोठार येथील धरणावर गणरायाच्या विसर्जनासाठी गेला असता ही घटना घडली.

# अपघातप्रवण महामार्गांवर 100 रूग्णवाहिका

**मुंबई / प्रतिनिधी-**रस्ते अपघातानंतरच्या गोल्डन अवरमध्ये जखमींना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी परिवहन विभागाने आपत्कालीन यंत्रणा बळकट करण्याची तयारी सुरू केली आहे. रोड सेफ्टी फंडातून ८० ते १०० नव्या रुग्णवाहिका खरेदी करून त्या राज्यातील अपघातप्रवण महामार्गांवर तैनात करण्याचे नियोजन आहे. ब्लॅक स्पाट, वारंवार गंभीर अपघात होणारी ठिकाणे आणि वैद्यकीय सुविधांपासून दूर असलेल्या महामार्गाच्या भागांना तैनातीसाठी प्राधान्य दिले जाणार असल्याचे आरटीओ अधिका-यांनी सांगितले. सध्या रुग्णांना वैद्यकीय सुविधा देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून बेसिक लाइफ सपोर्ट आणि अॅडव्हान्स लाइफ सपोर्ट रुग्णवाहिका सेवा कार्यरत आहे. हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांना रुग्णालयात नेणे किंवा रुग्णांची ने-आण यासाठी या रुग्णवाहिकांचा प्रामुख्याने वापर होतो. मात्र, रस्ते अपघातांमध्ये पहिल्या तासात मिळणारी मदत जीव वाचविण्यासाठी महत्त्वाची ठरते. त्यामुळे परिवहन विभागाची प्रस्तावित यंत्रणा रस्ते अपघात आणि महामार्गावरील आपत्कालीन प्रतिसादावर केंद्रित राहणार असल्याचे वरिष्ठ परिवहन अधिका-यांनी सांगितले. गंभीर जखमींना गोल्डन अवरमध्ये उपचार मिळावेत यासाठी एअर अॅम्ब्युलन्स सेवा सुरू करण्याचाही प्रस्ताव पुढे आला आहे. यासाठी व्यवहार्यता अभ्यास आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे. परिवहन विभागाच्या रुग्णवाहिका मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे, समृद्धी महामार्ग, कोकणातील प्रमुख महामार्ग तसेच दुर्गम आणि आदिवासी भागांतील अपघातप्रवण पट्ट्यांमध्ये तैनात करण्याचा विचार आहे. अपघातांची संख्या, ब्लॅक स्पाट, घटनास्थळी पोहोचण्याचा वेळ आणि जवळच्या ट्रामा सेंटरचे अंतर यांचा अभ्यास करून तैनातीची ठिकाणे निश्चित केली जाणार आहेत.

# शेतक-यांच्या पाठीशी सरकार खंबीर-मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्यात पावसाने ओढ दिल्यामुळे शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले असून विशेषत: सोयाबीन आणि कापूस या पिकांचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे शेतक-यांमध्ये आक्रोश असणे अत्यंत स्वाभाविक आहे. मात्र, अशा कठीण प्रसंगी संकटात सापडलेल्या शेतक-यांना तातडीने मदत केले.



मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात सध्या गंभीर दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या बिकट प्रसंगी सरकार पूर्णपणे शेतक-यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. एनडीआरएफचे निकष, राज्य शासनाची थेट मदत आणि पीक विमा अशा सर्वच माध्यमांतून शेतक-यांना शक्य ती सर्व मदत करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**फसवणूक करणा-या बँकांवर कठोर कारवाई होणार-**मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, शेतक-यांच्या भावनांशी खेळणा-या आणि कर्ज कमी असताना ते जास्त दाखवून सरकारची फसवणूक करणा-या बँकांची गय केली जाणार नाही. मुख्यमंत्री आणि सहकार मंत्र्यांच्या माध्यमातून अशा बँकांवर कठोर कारवाई केली जाईल. भविष्यात कोणत्याही बँकेने असा गैरप्रकार करण्याची हिंमत करू नये, अशा कडक उपाययोजना आम्ही राबवणार आहोत. आढावा बैठकीत झोपणा-या ➯(पान २ वर)

# दुष्काळी भागांचा शरद पवार 28 ला दौरा करणार

**मुंबई :** महाराष्ट्रातील अनेक भागांत अपु-या पावसामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी आणि ग्रामीण भागासमोर अडचणी उभ्या राहिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार २८ सप्टेंबर रोजी राज्यातील दुष्काळी भागांचा दौरा करणार आहेत.शरद पवार यांनी १८ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा तातडीने आढावा घेण्याची मागणी केली होती. तसेच प्रभावित भागांत दुष्काळ जाहीर करण्यासह ➯(पान २ वर)



# बँकांच्या गोंधळामुळे कर्जमाफीला ब्रेक!

## साडेपाच लाख शेतक-यांच्या ऐनवेळी याद्या मागे

**मुंबई /प्रतिनिधी-** महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान मोठा गोंधळ समोर आला आहे. काही व्यापारी बँकांनी सादर केलेल्या कर्जखात्यांच्या माहितीत मोठ्या प्रमाणात तफावत आणि तांत्रिक चुका आढळल्याने तब्बल ५.५ लाख शेतकरी कर्जखात्यांचे विशेष ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे कर्जमाफीच्या पुढील टप्प्याला काही काळ विलंब होण्याची शक्यता आहे.

कर्जमाफीसाठी बँकांकडून सादर करण्यात आलेल्या आकडेवारीची शासनाच्या नोंदींशी पडताळणी करण्यात आली. त्यावेळी काही बँकांनी दाखवलेली थकीत कर्जाची रक्कम आणि शासनाच्या नोंदीतील प्रत्यक्ष कर्जरक्कम यामध्ये मोठी तफावत असल्याचे समोर आले. याशिवाय कर्जदारांची नावे, बँक खाते



क्रमांक आणि कर्जप्रकरणाच्या तपशीलातही विसंगती आढळली.

या प्रकरणात काही व्यापारी बँकांकडून व्याजाची जादा आकारणी करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शासनावर चुकीच्या किंवा अवाजवी व्याजाच्या रकमेचा आर्थिक भार पडू नये, यासाठी संबंधित याद्या बँकांकडे परत पाठवून त्यातील त्रुटी दुरुस्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर प्रत्येक कर्जखात्याची तपासणी केली जाणार आहे.

सहकार विभागाचे आयुक्त दीपक तावरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ ते ५ व्यापारी बँकांकडून सादर करण्यात आलेल्या याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लेखा आणि तांत्रिक त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे या सर्व खात्यांची सखोल तपासणी केली जात आहे.दरम्यान, महाराष्ट्र सरकारच्या शेतकरी कर्जमाफी ➯(पान २ वर)

# IITबॉम्बे आत्महत्या प्रकरणात प्राध्यापक निलंबित:संस्थेने माफी मागितली

## ■ विद्यार्थी कापी करताना पकडला होता ■ 20 वर्षांत IITमध्ये १६० आत्महत्या

**मुंबई /प्रतिनिधी-** IIT बाम्बेचे विद्यार्थी साहिल वाकोडे यांच्या आत्महत्येनंतर सुरू झालेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संस्थेने प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांचे डीनपद तात्काळ निलंबित केले आहे. मात्र ते प्राध्यापक म्हणून कार्यरत राहणार असून पुढील कारवाई सुरू असलेल्या चौकशीनंतर केली जाईल, असे संस्थेने स्पष्ट केले आहे. साहिल यांच्या मृत्यूपूर्वीच्या घटनांबाबत संस्थेने यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनाबद्दलही IIT बाम्बेने माफी मागितली आहे. मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या घटनांची अधिकृत चौकशी सुरू असताना त्याबाबत निष्कर्षात्मक माहिती प्रसिद्ध करणे अयोग्य होते, असे संस्थेने म्हटले आहे. साहिल हे IIT बाम्बेच्या एनर्जी सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील द्वितीय वर्षाचे विद्यार्थी



होते. १८ सप्टेंबर रोजी कॅम्पसमध्ये त्यांचा मृत्यू झाला. घटनेपूर्वी झालेल्या परीक्षेत त्यांनी मोबाईल फोन वापरल्याचा आणि AI प्लॅटफार्मवर प्रश्नपत्रिकेशी संबंधित माहिती वापरण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप संस्थेच्या सुरुवातीच्या निवेदनात करण्यात आला होता. मात्र या संदर्भातील परिस्थिती अद्याप तपासाधीन असल्याचे संस्थेने आता स्पष्ट केले आहे.

**पालकांचा जातीय छळाचा आरोप-** साहिल यांच्या वडिलांनी प्रा. दुल्ला आणि इतर संबंधित अधिका-यांविरोधात तक्रार दाखल करत साहिलचा अनेक महिन्यांपासून मानसिक तसेच जातीय आधारावर छळ होत असल्याचा आरोप केला आहे. या तक्रारीवरून आत्महत्येस प्रवृत्त केल्यासह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. हे आरोप सध्या तपासाधीन आहेत.

दुसरीकडे IIT बाम्बे प्रशासनाने संस्थेत जातीय भेदभाव होत असल्याचा आरोप यापूर्वी नाकारला आहे. त्यामुळे पालकांचे आरोप, संस्थेची भूमिका ➯(पान २ वर)

# बुरखा, नकाबवर बंदी घालणार -जॉर्जिया मेलोनी

**रोम/वृत्तसंस्था :** इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी शाळांमध्ये बुरखा आणि नकाबवर बंदी घालण्याची घोषणा केली आहे. त्यांनी रविवारी सांगितले की, मंत्रिमंडळ लवकरच याबाबत निर्णय घेईल. याशिवाय, शाळांमध्ये परदेशी विद्यार्थ्यांची संख्याही मर्यादित ठेवली जाईल.मेलोनी यांनी राजधानी रोममध्ये त्यांच्या ब्रदर्स ऑफ इटली पक्षाच्या युवा संघटनेच्या राष्ट्रीय महोत्सवात ही घोषणा केली. प्रस्तावित नियमांनुसार, ज्या परदेशी विद्यार्थ्यांच्या मुलांना शाळेत मिसळून जाण्यात अडचण येते, त्यांच्या पालकांना इटालियन भाषा शिकावी लागेल. कायदा लागू करण्यासाठी सरकारच्या मंजुरीनंतर तो ६० दिवसांच्या आत संसदेत मंजूर करून घ्यावा लागेल. सध्या फ्रान्स आणि चीनसह जगातील २४ देशांमध्ये बुरखा आणि नकाबवर बंदी आहे.संशोधन संस्था फोंडाजियोने करटवच्या माहितीनुसार, इटलीतील शाळांमध्ये सुमारे ९.३ लाख परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे देशातील शाळांमध्ये शिकणा-या एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत ११.६% आहेत. गेल्या १० वर्षांत इटलीतील परदेशी अल्पवयीनांची संख्या ४.५% घटली आहे. युरोपियन कोर्ट ऑफ ुमन राइट्सने फ्रान्स आणि बेल्जियममधील सार्वजनिक ठिकाणी बुरखा-नकाबवर घातलेली बंदी योग्य ठरवली आहे. फ्रान्समध्ये २०१४ आणि बेल्जियममध्ये २०१७ साली दिलेल्या निर्णयात न्यायालयाने म्हटले होते की, लोकांमधील परस्पर संवाद कायम ठेवणे हे अशा बंदीचे कारण असू शकते. मानवाधिकार संघटना आणि संयुक्त राष्ट्रांनी याला विरोध केला आहे.



# अंधभक्त बिहारच्या घटनेलाही योग्य ठरवतील

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बिहारच्या जमुईमध्ये दहावीच्या विद्यार्थिनीची छेडछाड केल्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी संताप व्यक्त केला आहे. सोमवार दि. २१ सप्टेंबर रोजी राहुल गांधी यांनी हा व्हीडीओ अस्वस्थ करणारा असल्याचे म्हणत बिहार सरकारकडे या घटनेबाबत उत्तर मागितले. तसेच, कोणाचेही नाव न घेता त्यांनी भाजपवरही निशाणा साधला.



राहुल गांधी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, बिहारच्या जमुईमधील एक व्हीडीओ अत्यंत अस्वस्थ करणारा आहे. दहावीतील एक विद्यार्थी आणि विद्यार्थिनीला रस्त्यात जबरदस्तीने अडवण्यात आले. त्यांचा छळ करण्यात आला अपमान करण्यात आला आणि विद्यार्थिनीचा विनयभंग करण्यात आला. मुलगी हात जोडून तिला सोडून देण्याची विनंती करत होती. मात्र, काही तरुण तिच्याशी गैरवर्तन करत तिला खेचत होते, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.

या लोकांना अशी गैरवर्तणूक करण्याचा अधिकार कोणी दिला? असा सवाल राहुल गांधी यांनी केला. ही संस्कृती नसून पुरुषप्रधान मानसिकता असल्याचे त्यांनी म्हटले. कोणत्याही पुरुषाला मुलीच्या शरीरावर, तिच्या येण्या-जाण्यावर आणि तिच्या आवडी-निवडीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार असल्याची मानसिकता म्हणजे पुरुषप्रधानता असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. अंधभक्त अशा विचारांना सामान्य ठरवतात, असा आरोपही त्यांनी केला. जेव्हा नियंत्रण ठेवण्याच्या या मानसिकतेलाच संस्कृतीचे नाव दिले जाते आणि अंधभक्त अशा विचारांना योग्य ठरवतात, तेव्हा जमावालाच आपण कायद्यापेक्षा मोठे असल्यासारखे वाटू लागते.

**आरोपींना शिक्षा झाली पाहिजे-** व्हीडीओमध्ये दिसणा-या प्रत्येक व्यक्तीची ओळख पटवली पाहिजे आणि संबंधित आरोपींवर प?क्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना लवकरात लवकर शिक्षा झाली पाहिजे, ➯(पान २ वर)

# सोन्याचे भाव कोसळले

**मुंबई / प्रतिनिधी-**इराण आणि अमेरिका युद्धादरम्यान सोने आणि चांदीचे भाव घसरताना दिसले. आता पुन्हा सोने आणि चांदीचे भाव घसरले आहेत. सोने इराण आणि अमेरिका युद्ध सुरू होण्यापूर्वी २ लाखाच्या आसपास पोहोचले होते. मात्र, जशीही युद्धाला सुरूवात झाली, तसे सोन्याचे भाव धाड धाड घसरले. २१ सप्टेंबर रोजी सोने आणि चांदीच्या दरात घट दिसून आली.आहे. सोन्याचे भाव आज सोमवारी २१ सप्टेंबर रोजी ५८३ रुपयांनी घसरले. प्रति १० ग्रॅम १ लाख ५३ हजार ७९८ रूपयांवर व्यवहार करत आहे. चांदीचे भाव ७ रूपयांनी कमी होउन प्रति किलो २,४०,८९० रू पयांवर आले.










# बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी प्राप्त करणाऱ्यांवर कारवाई करा

***प्रहारचा जिल्हाधिका-यांना ८ दिवसाचा अल्टिमेटम***

**अमरावती/प्रतिनिधीः-**बनावट व बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून शासकीय सेवेचा गैरफायदा घेणाऱ्या अधिकाऱ्यावर तात्काळ कडक कारवाई करण्याची मागणी प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेने आज सोमवार २१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. आठ दिवसात यावर निर्णय न झाल्यास उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.निवेदनात म्हटले आहे की,अमरावती येथील पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. पुरुषोत्तम सोळंके यांच्याकडे वेगवेगळे यूडीआयडी कार्ड असणे तसेच ३० टक्क्यांवरून थेट ६० टक्के दिव्यांगत्व दाखविणे, हा अत्यंत संशयास्पद प्रकार आहे. याबाबत संघटनेने ४ सप्टेंबर रोजी पहिले निवेदन प्रशासनाला सादर केले होते.त्या निवेदनात प्रशासनाला ८ दिवसांची मुदत देण्यात आली होती. परंतु दिलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई किंवा निष्पक्ष चौकशी झालेली दिसून येत नाही, असा आरोप संघटनेने केला आहे.बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे नोकऱ्या बळकावणे व पदोन्नती मिळविणे यामुळे खऱ्या गरजवंत व पात्र दिव्यांगांच्या हक्कावर गदा येत आहे. या गंभीर विषयावर प्रशासनाची उदासीनता अत्यंत खेदजनक असल्याचे स्मरणपत्रात म्हटले आहे.जर येत्या ८ दिवसाच्या आत सदर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात आली नाही, तर न्याय मिळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपोषण करण्यात येईल. या दरम्यान कायदा सुव्यवस्था किंवा आरोग्याचा काही प्रश्न निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहिल, असा इशारा प्रहार अपंग क्रांती आंदोलनाने दिला आहे. निवेदन देताना शाम राजपुतसह अजय तायडे, नंदू वानखडे, राजेश कडू, दिनेश शर्मा, अशोक चौधरी, इमरान खान, चेतन वाडेकर व संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गौराईच्या पूजेसाठी निघालेली आई आणि मुलगा बेपत्ता

**अमरावती/प्रतिनिधीः-** वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील एक २७ वर्षीय महिला आणि तिचा पाच वर्षांचा मुलगा तिवसा बस डेपोतून संशयास्पद परिस्थितीत बेपत्ता झाले आहेत. दोघेही अचानक गायब झाल्याने कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या प्रकरणी तिवसा पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करून शोध मोहीम सुरू केली आहे.

माहितीनुसार, तक्रारदाराची पत्नी आणि पाच वर्षांचा मुलगा महालक्ष्मी सणानिमित्त जेवणासाठी तिवसा तालुक्यामध्ये राहणाऱ्या तिच्या बहिणीच्या गावी जाणार होते. १७ सप्टेंबर रोजी दुपारी तक्रारदार स्वतः दोघांना तिवसा बस स्टँडवर सोडण्यासाठी आले होते. त्यांनी दोघांना तिवसा ते चांदूर रेल्वे जाणाऱ्या बस मध्ये बसवले होते. मात्र, दिवसभर वाट पाहूनही महिला आणि त्यांचा मुलगा बहिणीच्या घरी पोहोचलेच नाही. त्यानंतर तक्रारदाराने आपल्या बहिणीशी संपर्क साधला असता, बहिणीने सांगितले की दोघेही तिथे पोहोचलेच नाहीत.त्यानंतर कुटुंबाने त्यांचा शोध सुरू केला. महिला आणि तिचा पाच वर्षांचा मुलगा १७ सप्टेंबर दुपारी १२ वाजेपासून ते १९ सप्टेंबर दुपारी १२ वाजेपर्यंत बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. बऱ्याच शोधानंतरही दोघांचा थांगपत्ता न लागल्याने कुटुंबीयांनी पोलिसांशी संपर्क साधला. तिवसा पोलिसांनी शनिवारी रात्री अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस महिला आणि मुलाचा शोध घेत असून, या प्रकरणाशी संबंधित संभाव्य हिट अँड रन प्रकरणाच्या अनुषंगाने देखील तपास करत आहेत. पोलिसांकडून बस स्टँड, संभाव्य मार्ग आणि आजूबाजूच्या परिसराची माहिती गोळा केली जात आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि बस वाहक-चालक यांचीही चौकशी केली जात आहे. प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

पान १ व १० वरून

## देशाला अर्णब चक्रीवादळाचा

आणि उत्तर आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर ताशी ५५-६५ किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. २३-२४ सप्टेंबर दरम्यान दक्षिण आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवरही जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे.

**मुसळधार पावसाचा अंदाज-**अंदमान आणि निकोबार बेटे आणि गंगा खो-यातील पश्चिम बंगालमध्ये २० ते २६ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे. झारखंड, ओडिशा आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल-सिक्कीममध्ये २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान पावसात वाढ होउ शकते. बिहारमध्ये २४ ते २६ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज आहे. २५ सप्टेंबर रोजी उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये अतिवृष्टी अपेक्षित आहे. या भागांमध्ये पूर, पाणी साचणे आणि पिकांच्या नुकसानीचा धोका वाढू शकतो.

**एल निनो अधिक तीव्र-**प्रशांत महासागरातील एल निनो अधिक तीव्र झाल्यामुळे देशाच्या अनेक भागांमध्ये दुष्काळ आणि उष्णसमारीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. एल निनोमुळे सामान्यतः मान्सून कमकुवत होतो आणि उष्णता वाढते. दरम्यान, बंगालच्या उपसागरातील चक्रीवादळी प्रणालीमुळे किनारपट्टीच्या राज्यांमध्ये मुसळधार पाउस पडू शकतो. दोन्ही परिस्थिती एकाच वेळी सक्रिय झाल्यामुळे हवामानाची स्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे. काही भागांमध्ये पाण्याची टंचाई वाढू शकते, तर किनारपट्टीच्या भागात पुरासारखी परिस्थिती निर्माण होउ शकते. हा दुहेरी धोका शेती, मत्स्यव्यवसाय आणि किनारपट्टीवरील लोकांसाठी आव्हानात्मक ठरू शकतो. हवामान विभाग या प्रणालीवर सतत लक्ष ठेवून आहे. पुढील ५-६ दिवस अनेक भागांमध्ये पाउस सुरू राहण्याची शक्यता आहे. किनारपट्टीवरील राज्यांच्या प्रशासनांना आगाउ तयारी करण्याचा सल्ला दिला जात आहे. मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा दिला जाउ शकतो.

## शेतक-यांच्या पाठीशी सरकार

**अधिका-यांची चौकशी-**दुष्काळ आढावा बैठकीदरम्यान काही अधिकारी निष्काळजीपणा दाखवत असल्याच्या आणि डुलक्या घेत असल्याच्या आरोपांवर बोलताना मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, या बैठकीला सुमारे ३०० ते ३५० अधिकारी उपस्थित होते. ज्या वेळी ज्या तालुक्याची माहिती विचारली जात होती, त्या वेळचे अधिकारी आपापल्या भागाचा आढावा मांडत होते. जर एखादा अधिकारी बैठकीत झोपलेला आढळला असेल तर त्याची नक्कीच चौकशी केली जाईल.

## दुष्काळी भागांचा शरद पवार

शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि ग्रामीण भागासाठी विविध उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, राज्य सरकारकडूनही दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पावसाच्या खंडामुळे प्रभावित भागांची पाहणी आणि पीक नुकसानीच्या पंचनाम्याबाबत प्रशासनाला निर्देश दिले आहेत. २८ सप्टेंबरच्या दौ-यात शरद पवार दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई तसेच शेतकरी आणि ग्रामीण भागातील समस्यांचा आढावा घेणार आहेत. त्यांच्या या दौ-याकडे राजकीय तसेच शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

## बँकांच्या गोंधळामुळे कर्जमाफीला

योजनेत सुमारे ५६ लाख शेतक-यांना लाभ देण्याचे नियोजन आहे. मात्र, बँकांकडून आलेल्या माहितीतील त्रु टींमुळे पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित करण्यापूर्वी खात्यांची पुन्हा पडताळणी केली जात आहे. त्यामुळे साडेपाच लाख कर्जखात्यांच्या विशेष ऑडिटचा निर्णय शेतक-यांसाठी महत्त्वाचा ठरला आहे. शासनाकडून आता बँकांच्या नोंदी आणि उपलब्ध अधिकृत माहिती यांचा मेळ घालण्यात येत आहे. तपासणी पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतक-यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची प्रक्रिया पुढे नेली जाणार आहे. त्यामुळे संबंधित शेतक-यांनी कर्जखात्याची माहिती आणि कर्जमाफीच्या यादीतील तपशील तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## IIT बॉम्बे आत्महत्या प्रकरणात प्राध्यापक

आणि मृत्यूपूर्वीच्या घटनांचा क्रम याबाबत पोलिस तपास महत्त्वाचा ठरणार आहे. साहिल यांच्या मृत्यूनंतर IIT बाम्बे कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. ४०० हून अधिक विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाल्याचे वृत्त असून मिड-सेमिस्टर परीक्षांवरही परिणाम झाला. विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे १८ मागण्यांचा दस्तऐवज सादर केला. त्यामध्ये संबंधित अधिका-यांवर कारवाई, संस्थेची सार्वजनिक माफी, पारदर्शक चौकशी आणि विद्यार्थी कल्याणाशी संबंधित उपाययोजनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी प्रा. दुल्ला यांना केवळ डीनपदावरू न नव्हे तर प्राध्यापक पदावरू नही निलंबित करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे संस्थेने केलेली सध्याची कारवाई आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण मागणीपेक्षा मर्यादित आहे.

**संचालकांच्या राजीनाम्याबाबत IIT बाम्बेचे स्पष्टीकरण**

दरम्यान, IIT बाम्बेचे संचालक प्रा. शिरीष बी. केदारे यांनी राजीनामा दिल्याच्या बातम्या संस्थेने फेटाळल्या आहेत. संचालकांनी राजीनामा दिलेला नाही, असे IIT बाम्बेने स्पष्ट केले असून विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत पुढील प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले आहे.

**दोन दशकांत किमान १६० IIT विद्यार्थी आत्महत्येने मृत**

साहिल यांच्या मृत्यूनंतर IITमधील विद्यार्थी मानसिक आरोग्य आणि संस्थात्मक सहाय्याचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. Global IIT-IIM Alumni Support Group ने सरकारी अधिकारी आणि विविध क्षक्ष्त्रमधून संकलित केलेल्या स्वतंत्र आकडेवारीनुसार, गेल्या सुमारे दोन दशकांत किमान १६० क्षक्ष्त्र विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांची नोंद झाली असून त्यापैकी ६९ घटना अलीकडील पाच वर्षांतील आहेत. हा अधिकृत केंद्र सरकारचा एकत्रित आकडा नसून स्वतंत्रपणे संकलित केलेली आकडेवारी आहे. साहिल यांच्या मृत्यूचे नेमके कारण, पालकांनी केलेले छळाचे आरोप आणि संबंधित अधिका-यांची भूमिका याबाबत अधिकृत तपास सुरू असून त्यातून पुढील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

## अंधभक्त बिहारच्या घटनेलाही

अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. तसेच, ही घटना १९ सप्टेंबरची असेल तर आरोपी अद्याप तुरुंगात का नाहीत, असा सवालही त्यांनी केला. संध्याकाळी ७ वाजता बिहारच्या रस्त्यांवर एखादी मुलगी सुरक्षित का नाही? असा सवाल करत राहुल गांधी यांनी बिहार सरकारकडे या घटनेबाबत उत्तर मागितले.

## कर्जमुक्तीचे उद्दिष्ट्य पूर्ण

देणे गरजेचे आहे. त्याकरिता तहसीलदार यांच्याकडून देण्यात येणारे वारसदाराचे प्रमाणपत्र प्रमाण मानून कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. कामात दिरंगाई केल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांवर गुन्हे दाखल करावे असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

जिल्ह्यात शेती व सार्वजनिक उपयोगात येणारी वीज सतत खंडित होत असल्याच्या तक्रारी पाहता उचित यंत्रणा राबवून ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा करण्याचे निर्देश बावनकुळे यांनी महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. ज्या ठिकाणी विद्युत रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) उभारण्याची गरज आहे तेथे ती उभारावी व त्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. यावर्षी पाऊस कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात यावे, त्यासाठी मालगुजारी काळातील गावोगावी बांधण्यात आलेल्या विहिरी पुनर्जीवित कराव्या अशा सूचना त्यांनी दिल्या. सर्व प्रशासकीय यंत्रणांनी या संदर्भात आपल्या परिक्षेत्रातील यादी तयार करावी, सिमेंट रस्त्यांची कामे घेऊ नये, जिल्ह्यात जमिनीतील जलस्तर २०० फुटांनी वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी दूरदृष्टी प्रणालीद्वारे उपस्थित असलेल्या सर्व तहसीलदारांशी त्या-त्या भागातील प्रश्नांबाबत त्यांनी माहिती जाणून घ्या सूचना दिल्या. नशा मुक्त अभियानांतर्गत अमरावती ग्रामीण पोलिसांच्या वतीने तयार केलेल्या डॉक्युमेंटरीचे यावेळी बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

या आढावा बैठकीस खासदार बळवंत वानखडे, आमदार सर्व प्रवीण तायडे, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रताप अडसड, प्रवीण पोटे, संजय खोडके, सुलभा खोडके, उमेश यावलकर, विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक निकेतन कदम, मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले आदी उपस्थित होते.

## मारेकरी पती अद्याप पसार

**माहिती -** वैशालीची सासू संगीता हिने सुमारे वर्षभरापूर्वी फोन करून ललितकडून वैशालीला मारहाण होत असल्याची माहिती तिच्या माहेरच्या मंडळींना दिली होती, असे दिनेश ठाकरे यांनी तक्रारीत म्हटले आहे. ललित दारू पिऊन घरी वाद घालत वैशालीला मारहाण करीत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**वैशालीचे तिसरे लग्न-**तक्रारीनुसार, वैशालीचे सुमारे १३ वर्षांपूर्वी लालखेड येथील एका तरुणासोबत पहिले लग्न झाले होते. त्यानंतर वैशालीचा नेर येथील एका तरुणासोबत दुसरा विवाह झाला. हे लग्न सुमारे दीड वर्ष टिकले. त्यानंतर तिने ललित मेहरे याच्यासोबत तिसरे लग्न केले होते. घटनेनंतर ललित मेहरे पसार झाला असून, पोलिसांनी त्याच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपीच्या संभाव्य ठिकाणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत. दरम्यान, घटनेच्या दिवशी नेमके काय घडले, वैशालीचा मृत्यू कोणत्या परिस्थितीत झाला आणि त्यानंतर मृतदेह घरात किती काळ ठेवण्यात आला, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## चांदूर रेल्वे, धामणगाव, नांदगाव

जगताप यांनी केली. तसेच पीक कापणी प्रयोगांची वाट न पाहता उत्पादनात मोठी घट निश्चित असल्याने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दिवाळीपूर्वी थेट दुष्काळी अनुदान आणि पंचवीस टक्के अग्रिम पीक विमा भरपाई जमा करावी, अशीही मागणी काँग्रेस शिष्टमंडळाने केली.यावेळी श्रीकांत गावंडे, गणेश आरेकर, पंकज वानखेडे, समीर दहातोंडे, निवास सूर्यवंशी, बाळासाहेब ठाकरे, सरफराज पठाण, अमोल होले, राजेंद्र रजनेकर, रावसाहेब शेळके, राम मार्डीकर, मनोहर राऊत, शरद घासले, दीपक भागात, मंगेश धावडे, हरिभाऊ गवई, रवी देशमुख, दिगंबर हिरोडे, गोविंदराव देशमुख, दिनेश जगताप, गितेश ठाकूर, संदीप दावेदार, किरण देशमुख, पिंटू कोपरकर, पावन चौधरी, प्रफुल कोकाटे, विनोद चौधरी, हरिभाऊ, प्रमोद इंदलकर, सुधीर पाटेकर, देवानंद खूने, अवी इंगळे, भाऊराव बामनोटे, सुशील थोरात हनुमान मोदक, सचिन कोल्हे, अतुल ठाकुर, प्रशांत ठाकरे, अशोकराव चौधरी, दीपक भागत, मंगेश जोगे, मोफिक, ऋषिकेश मुंडे, रमेश ठाकरे, मोरेश्वर दिवटे, अनिस पाठाण, प्रवीण लादे, मनीष जगणे, सक्षम वानखेडे, दीपक सावाई, मंगेश जोगे, संजय कुंभलकर, गजानन बडगे, ऋषिकेश मुंडे आदी काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## आयएनएसच्या ध्रलघु व मध्यम

प्रभावी माध्यमे आहेत. महानगरांपासून दूर असलेल्या जिल्हा, तालुका आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न शासन-प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम ही वृत्तपत्रे करतात. मात्र, वाढते मुद्रण खर्च, वृत्तपत्र कागदाच्या किमती, जाहिरात धोरणातील बदल, डिजिटल माध्यमांची स्पर्धा, वितरण खर्च, पत्रकार व कर्मचाऱ्यांचे प्रश्न तसेच केंद्र व राज्य शासनाच्या जाहिरात धोरणांमधील अडचणी यामुळे या वृत्तपत्रांसमोर अनेक गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत.

या पार्श्वभूमीवर लघु व मध्यम वृत्तपत्र समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. देशभरातील लघु आणि मध्यम वृत्तपत्रांच्या समस्या समजून घेणे, त्यांच्या हितासाठी आयएनएसच्या माध्यमातून प्रभावी पाठपुरावा करणे, शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधणे आणि वृत्तपत्र उद्योगाच्या शाश्वत भविष्यासाठी धोरणात्मक सूचना मांडणे, अशी व्यापक भूमिका या समितीकडून अपेक्षित आहे.

आयएनएससारख्या राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित संस्थेच्या महत्त्वपूर्ण समितीचे अध्यक्षपद अमरावतीतील वृत्तपत्र प्रतिनिधीकडे येणे ही विदर्भासाठी विशेष गौरवाची बाब आहे. या नियुक्तीचे वृत्त समजताच पत्रकार, संपादक, वृत्तपत्र मालक, वितरक, जाहिरातदार, सामाजिक संस्था, व्यापारी संघटना तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून विलास अरुण मराठे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लघु आणि मध्यम वृत्तपत्रांच्या अस्तित्वाशी निगडित प्रश्न, आर्थिक स्थैर्य, शासकीय जाहिरातींचे न्याय्य वितरण, डिजिटल संक्रमणासाठी आवश्यक साहाय्य आणि प्रादेशिक पत्रकारितेचे संरक्षण या विषयांना त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात नवी दिशा मिळेल, असा विश्वास वृत्तपत्र क्षेत्रातून व्यक्त करण्यात येत आहे.

## निवडणुक प्रचारादरम्यान गोंधळ

काढण्यात आले होते. त्यानंतर आज (दि.२१) नवनीत राणा दर्यापूर जिल्हा व सत्र न्यायालयात उपस्थित राहिल्या. त्यांच्या वतीने जामीन अर्ज दाखल करण्यात आला. बचाव पक्षाच्या वतीने अधिवक्ता अजिंक्य धर्माधिकारी व अधिवक्ता आदित्य धर्माधिकारी यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले. जामीन अर्जावर झालेल्या युक्तिवादानंतर जिल्हा व सत्र न्यायाधिश एस. टी. डोके यांनी नवनीत राणा यांना जामीन मंजूर केला. न्यायालयात हजेरी आणि त्यानंतर मिळालेला जामीन यामुळे खल्लार येथील प्रचारसभेतील गोंधळाच्या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे.

## ऑपरेशन कवचअंतर्गत अवैध दारू-

आणि इतर साहित्य असा १४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पाच पोलीस ठाण्यांत सात गुन्हे-

आसेगाव, चांदूर बाजार, बेनोडा, दर्यापूर आणि ब्राह्मणवाडा थडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध दारू विक्रीविरोधात स्वतंत्र कारवाया करण्यात आल्या. या कारवायांमध्ये सात गुन्हे दाखल करून सात जणांवर कारवाई करण्यात आली.

यामध्ये चांदूर बाजार येथील माळीपुरा परिसरातील ललित ज्ञानेश्वर हिवसे (वय २६) याच्यासह सहा जणांचा समावेश आहे. कारवाईदरम्यान १२२ नग देशी दारूच्या पावट्या व इतर साहित्य असा ९८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, मंगरूळ चव्हाळा आणि तळेगाव दशासर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत जुगारविरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये तीन गुन्हे दाखल करून एकूण २२ जणांवर कारवाई करण्यात आली. गौरव त्र्यंबक सावदे (वय ५३) याच्यासह अन्य २१ जणांचा त्यात समावेश आहे.

पोलिसांनी जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कम असा अंदाजे ७६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक दुर्गेश राजपूत, अंमलदार प्रशांत वैद्य, श्याम गावंडे, रविंद्र वऱ्हाडे, चालक प्रशिक वानखडे तसेच संबंधित पोलीस ठाण्यांच्या ठाणेदार आणि पथकांनी कारवाईत सहभाग घेतला.

## दर्यापूर तालुका तातडीने कोरडा

कर्जमाफीचा निर्णय घेऊन कर्जवसुलीला स्थगिती देणे, मनरेगाच्या माध्यमातून वर्षाला २०० दिवस रोजगार उपलब्ध करून देणे, मोफत चारा छावण्या सुरू करणे, पशुधनासाठी चारा व पाण्याची व्यवस्था करणे तसेच पिकनुकसानीचे तातडीने पंचनामे करून नियमानुसार नुकसानभरपाई देणे, या मागण्या करण्यात आल्या आहेत.

याशिवाय शेतमालाची ए२+५० टक्के सूत्रानुसार हमीभावाने खरेदी करावी, विदर्भ व मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष दूर करावा, उपलब्ध पाण्यात पिण्याचे पाणी व शेतीला प्राधान्य द्यावे, आत्महत्याग्रस्त शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना २५ लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, बटाईदार व वाटेकऱ्यांनाही मदत योजनांचा लाभ द्यावा, शेतीपंपांची वीजजोडणी खंडित करू नये तसेच थकीत विजबिल व कर्जवसुलीला परिस्थितीनुसार स्थगिती द्यावी, अशा मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या.

दर्यापूर तालुक्यातील प्रत्येक गावातील पाणीटंचाई, पिकनुकसान आणि पशुधनाची परिस्थिती यांची प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून सर्वंकष सर्वेक्षण व पंचनामा करावा आणि त्याचा अहवाल तातडीने शासनाकडे पाठवावा, अशी मागणी करण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकरी कुटुंबांना तातडीचा आर्थिक दिलासा देण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी डॉ. अभय गावंडे, दर्यापूर तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), इंजी. अनिकेत वाकपांजर, तालुकाध्यक्ष भारतीय कम्युनिस्ट पक्ष, सुनिल गावंडे, सभापती बाजार समिती दर्यापूर, अंकुश पाटील कावडकर युवासेना जिल्हाप्रमुख अमरावती, बबनराव विल्हेकर, पप्पू होले, पार्थ लोडम, गुड्डू पटेल, नमित हुतके, सौरभ जळमकर, मुन्ना शेख, बबलू शेख, अतिश शिरभाते, साहेबराव वाकपांजर, नितेश वानखडे, दिपक बगाडे, दिनकर गायगोले, बाळासाहेब टोळे, जाकीरभाई, कॉ. नितीन गादे, आसिफ भाई, दादाभाऊ इंगळे, भारत आठवले, भास्कर धोटे, संतोष हागे, प्रशांत धर्माळे, कॉ. अशोक कोकाटे, पवन पतंगे, अंकुश कोरडे, अब्दुल समीर, शुभम कडू यांच्यासह शेतकरी, शेतमजूर व नागरिक उपस्थित होते.

## प्राणघातक हल्ल्यातील चार

घरातून निघाले होते. दरम्यान, रात्री सव्वाआठच्या सुमारास कोठारी कंपनीसमोरील सतीश कॅन्टीनजवळ सागर परतेकी यांना त्यांच्या ओळखीच्या चार विधीसंघर्षित बालकांनी अडविल्याचा आरोप आहे. त्यांनी दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. मात्र, आपल्याकडे पैसे नसल्याचे परतेकी यांनी सांगितल्यानंतर चौघांनी त्यांना पकडून मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच, जिवे मारण्याच्या उद्देशाने चाकूने त्यांच्या पोटावर वार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या घटनेप्रकरणी राजापेठ पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला. गुन्ह्याची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. आरोपींचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखेची दोन पथके तातडीने रवाना करण्यात आली. समांतर तपास सुरू असताना गोपनीय बातमीदारामार्फत संशयित चौघे संजयगांधी नगर तसेच बेनोडा परिसरातील असल्याची माहिती पथकाला मिळाली.

या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने महादेवखोरी जंगल परिसरात शोधमोहीम राबवून चारही विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कार्यवाही व तपासासाठी त्यांना राजापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त यशवंत सोळंके, उपायुक्त श्याम घुगे, उपायुक्त (मुख्यालय/गुन्हे) प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर व पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने तसेच पोलीस अंमलदार सुनील लासुरकर, गजानन ठेवले, आस्तिक देशमुख, दीपक सुंदरकर, मंगेश परिमल, मनोज ठोसर, सचिन बाहाळे, जहीर शेख, अतुल संभे, नईम बेग, विकास गूडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे, चालक संदीप खंडारे आणि सायबर पथकाचे अश्विन यादव यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## कुख्यात 'छोटा डॉन'

अवैध शस्त्र बाळगणे तसेच तडीपारी आदेश व अधिसूचनेचे उल्लंघन यांसारख्या स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार यांनी सहायक पोलीस आयुक्त नयन आलुरकर आणि परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके यांच्या माध्यमातून एमपीडीए कारवाईचा प्रस्ताव सादर केला. पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्राजंली सोनवणे, सहायक पोलीस निरीक्षक निलेश ब्राम्हणे तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या एमपीडीए सेलने प्रस्तावाची प्रक्रिया पूर्ण केली. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी २० सप्टेंबर रोजी प्रस्तावाला मंजुरी देत स्थानबद्धतेचा आदेश जारी केला. त्यानंतर पोलिसांच्या विशेष पथकाने श्रावण बनारसे याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. आदेशाची अंमलबजावणी केल्यानंतर २१ सप्टेंबर रोजी त्याची अमरावती मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. परिमंडळ-१ च्या विशेष पथकातील पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, पोलीस अंमलदार सतीश देशमुख, सुभाष पाटील, मतीन शेख, सतीश पराळे तसेच फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या डीबी पथकातील पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलीस अंमलदार संदीप देशमुख आणि आनंद ठाकूर यांनी आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले.

**उत्सवांच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांवर नजर-** आगामी सार्वजनिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींची माहिती संकलित करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशाने तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली एमपीडीए सेलमार्फत पुढेही प्रभावी कारवाई करण्यात येणार आहे.

## मंगेश कळसकर कुटुंबीयांना

सेटल करण्यात आले. विमा कंपनी ५६ लाख रुपये क्षतिपूर्ती देण्यास तयार झाली. ज्याला तक्रारकर्त्याने मान्य केले आणि प्रकरणाचा निपटारा करण्यात आला. विधी क्षेत्रातील जानकारणानुसार हे अलीकडच्या काळातील जिल्ह्यातील सर्वात मोठे क्षतिपूर्ती प्रकरण राहिले आहे. रस्ता अपघातात मृत व्यक्तीच्या परिजनांना पहिल्यांदाच इतकी मोठी रक्कम लोक अदालतीने मंजूर केली आहे. कोर्टाने पीडित व्यक्ती जिवंत असताना होणारे आर्थिक लाभ आणि इतर प्रस्तुत मुद्द्यांचा विचार करून हा निकाल दिला, अशी माहिती विधी सूत्रांनी दिली.माहिती नुसार, अमरावती-अकोला रोडवर हिवरा बु. जवळ २२ मे २०२६ रोजी पहाटे ३ वाजता आरोपी समीर शेंडे याने सुझुकी कार क्रमांक एमएच-२७ डीआय -३२३९ ने मंगेश कळसकर यांना सडक दुर्घटनेत गंभीर जखमी केले. जखमी मंगेश यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.पोलिसांनी या प्रकरणी मोटर व्हेईकल अक्ट १८४ आणि भारतीय न्याय संहिता कलम २८१, सेक्शन १०६ (१), १२५ (ए), १२५ (बी) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.कार चालक आणि विमा कंपनीवर कळसकर परिवाराने क्षतिपूर्तीची केस दाखल केला होती. लोक अदालतीत या केसचा निपटारा करण्यात आला.

MAHAVITARAN

**E-Tender Notice**

Separate digitally sealed and signed two bid system e-tenders are invited from eligible/Registered and reputed firm/contractor/agencies for the works detailed as under.

T-06 E-Tender Work contract of servicing / repairing of 33KV PT-CT & 11kV PT-CT Unit at various 33 KV Sub Stations under Rural Division, Amravati. as and when required under Amravati Rural Dn.-(10.00 Lakhs) The tender documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ and is downloaded from our website from Dt. 22.09.2026. No hard copy of tender will be provided. Any change in e-tender schedule, corrigendum etc shall also be put up on website. Prospective bidders are therefore requested to regularly check the website for updates. Submit the Tender through e-tendering process only latest by dt. 28.09.2026 up to 17.00 hrs. While submitting the Tender, please attach the Tender fee stated above and EMD in the form of Cash / demand draft in favour of Executive Engineer, MSEDCL, Rural Division, Amravati. Technical will opened on Dt 29.09. 2026 Contact Person: - Dy. Executive Engineer (O), Amravati. Tel. No. 7875763743.

Executive Engineer
(PRO-187) O&M Division MSEDCL, Amravati Rural.

**सुधारीत जाहीरातीचा मसुदा खालील प्रमाणे**

राज्य राखीव पोलीस बल गट क्र ०९ अमरावती येथील जुने मेस भांडे, कपाट, खुर्च्या, संगणक, किट पेटी व इतर साहीत्य विक्री करावयाचे आहे त्याकरीता निवीदा प्रक्रीया राबवून कार्यवाही करावयाचे आहे.

तरी ईच्छुकांनी खालील नमुद अटि व शर्तीचा अधिन राहुन आपले सविस्तर माहीतीपत्रक / दरपत्रक या कार्यालयामध्ये दिनांक २३/०९/२०२६ रोजीचे १०.०० वा. पासुन तर दिनांक ३०/०९/२०२६ च्या सायंकाळी ०५.४५ वाजेपर्यत सिलबंद पॉकीटमध्ये या कार्यालयामध्ये स्विकारण्यात येईल.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे...१.** वरील नमुद साहीत्य बघायचे असल्यास दिनांक २४/०९/२०२६ ते दिनांक २९/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० वाजे पर्यतच कंपनी स्टोअर रुम खुले ठेवण्यात येईल.

**२.** ईच्छुकांनी आपले निवीदा हे वरील नमुद प्रमाणे वेळेचा आत कार्यालयास सादर करावी ठरवुन दिलेला वेळे नंतर निवीदा स्विकारले जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**३.** ज्यांचे दर सर्वात जास्त राहतील त्यांनाच ठरलेल्या दरानुसार साहीत्याची विक्री करण्यात येईल.

**४.** निवीद मंजुर केल्यानंतर सदर साहीत्यांची उचल हे ०७ दिवर्साच्या आत करावी लागेल.

**५.** सदचे साहीत्य घेवुन जाण्याकरीता येणारे वाहनांची आधी धर्मकाटयावर वजन करणे गरजेचे राहील.

**( त्यावेळी कार्यालयाचा प्रतिनिधी सोबत राहील)**

**६.** सदर वाहनामध्ये साहीत्य भरल्यानंतर पुन्हा धर्मकाटयावर वजन करणे गरजेचे राहील

**(त्यावेळी कार्यालयाचा प्रतिनिधी सोबत राहील.)**

**७.** नमुद साहीत्य हे स्वखर्चाने घेवुन जावे लागेल तसेच साहीत्य वाहनामध्ये भरण्याकरीता गटातील कोणीही मदत करणार नाही.

**८.** सदर साहीत्यांची उचल केल्यानंतर लगेच येणारी रक्कम ही शासकिय खात्या मध्ये जमा करण्यात यावी.

**(विश्व पानसरे)**
समादेशक
रा.रा. पो.बल गट क्र.९ अमरावती

वि.मा.का./अम./जाहि./५१८/२०२६-२०२७

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# जिल्ह्यात अवैध धंद्यांचा 'बाजार' तेजीत!

## सहाही तालुक्यांत वरली-मटका, जुगारासह विविध अवैध व्यवसायांना ऊत

## पोलिसांच्या धडक मोहिमेची नागरिकांची मागणी

## आपचे सागर कोकास यांचे पोलीस महासंचालकांना निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील शहरांसह ग्रामीण भागात वरली-मटका, जुगार, अवैध सावकारी, अवैध दारू, गुटखा यासह विविध गैरप्रकार सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने होत आहेत. मानोरा येथील मध्यवर्ती भाजी मंडी परिसरात जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत दहा जणांना पकडून ४४ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याने जिल्ह्यातील अवैध धंद्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण जिल्ह्यात पोलिसांनी विशेष धडक मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

वाशिम, रिसोड, मालेगाव, मानोरा, मंगरुळपीर आणि कारंजा या सहाही तालुक्यांतील शहरी तसेच ग्रामीण भागात विविध अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. काही ठिकाणी हे व्यवसाय लपूनछपून, तर काही ठिकाणी खुलेआम सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वरली-मटका व जुगाराच्या विळख्यात तरुणांसह आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटक अडकत असल्याने त्याचे आर्थिक व सामाजिक परिणाम कुटुंबांवर होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

### पोलिस महासंचालकांकडे निवेदन; स्वतंत्र चौकशीची मागणी

दरम्यान, आम आदमी पार्टीचे पश्चिम विदर्भ प्रवक्ता सागर कोकास यांनी २१ सप्टेंबर रोजी राज्याचे पोलीस महासंचालक यांच्याकडे निवेदन सादर करून वाशिम व अकोला जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात सुरू असल्याच्या तक्रारी असलेल्या मटका-जुगार, अवैध सावकारी व इतर अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या निवेदनात नागरिकांकडून गेल्या काही महिन्यांपासून अशा गैरप्रकारांबाबत तक्रारी समोर येत असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. या अवैध धंद्यांमुळे सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय कुटुंबे, छोटे व्यापारी, युवक तसेच शेतकरी कुटुंबांवर आर्थिक व सामाजिक परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जुगार व अवैध सावकारीच्या व्यवहारामुळे काही कुटुंबे कर्जबाजारी होत असून, मानसिक तणाव आणि आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

विशेषतः काही ठिकाणी स्थानिक पातळीवरील संबंधित यंत्रणांकडून या गैरप्रकारांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी असून, काही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबतही नागरिकांकडून संशय व्यक्त केला जात असल्याचे निवेदनात नमूद आहे. त्यामुळे संबंधित तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच चौकशी स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांपुरती मर्यादित न ठेवता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली जिल्हास्तरीय पद्धतीने करण्यात यावी, अशी मागणी सागर कोकास यांनी केली आहे.



### सहाही तालुक्यांत धडक मोहीम राबविण्याची मागणी

मानोरा येथील कारवाई आणि पोलिस महासंचालकांकडे सादर करण्यात आलेल्या निवेदनाच्या पार्श्वभूमीवर आता जिल्हा पोलिस प्रशासनाने केवळ एका तालुक्यापुरती कारवाई मर्यादित न ठेवता वाशिम, रिसोड, मालेगाव, मानोरा, मंगरुळपीर व कारंजा या सहाही तालुक्यांत विशेष धडक मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अवैध धंद्यांवर सातत्यपूर्ण आणि निष्पक्ष कारवाई झाल्यास कायद्याचा धाक निर्माण होऊन अशा गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



सागर कोकास

### एका कारवाईनंतर थांबणार का?

मानोरा येथील एलसीबीच्या कारवाईचे स्वागत होत असले तरी जिल्ह्यातील इतर भागांतही सातत्याने अशाच प्रकारची कारवाई होणे आवश्यक आहे. एखाद्या ठिकाणी छापा टाकून कारवाई करण्यापेक्षा अवैध धंद्यांची ठिकाणे शोधून त्यांच्यावर नियमित लक्ष ठेवण्याची गरज आहे. स्थानिक माहिती यंत्रणा अधिक सक्रिय करून अचानक तपासणी व कारवाई केल्यास या व्यवसायांना आळा बसण्यास मदत होऊ शकते.

# संपूर्ण वाशीम जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करा!

## शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून हेक्टरी भरीव मदत द्या

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पावसातील मोठे खंड, अपुरा पाऊस आणि निर्माण झालेल्या पाणीटंचाईमुळे वाशीम जिल्ह्यातील शेतकरी गंभीर संकटात सापडला असून, संपूर्ण वाशीम जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरीव आर्थिक मदत द्यावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि तहसीलदार, वाशीम यांना निवेदन देण्यात आले.

मनसेचे माजी जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी मनसेचे माजी शहर अध्यक्ष गणेश इगोले, वाशीम तालुका उपाध्यक्ष अनिल भगत, ज्येष्ठ महाराष्ट्र सैनिक अशोकराव सरनाईक, कडुबा गुडदे, केदार जोशी आदी उपस्थित होते. वाशीम जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये पावसाचे असमान व अपुरे प्रमाण तसेच पावसामध्ये पडलेल्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, ज्वारी, बाजरी, मका, भाजीपाला व फळपिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



### मनिष डांगे यांच्या नेतृत्वात अधिकाऱ्यांना निवेदन; मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा

त्यामुळे केवळ पर्जन्यमानाच्या आकडेवारीवर आधारित दुष्काळाचे मूल्यांकन न करता शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पिकांची पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, अशी मागणी मनसेने केली.

### शेतकऱ्यांसाठी मनसेच्या प्रमुख मागण्या

नुकसानग्रस्त कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १ लाख, हंगामी बागायतदारांना १.५० लाख आणि बागायतदार शेतकऱ्यांना २ लाखांची विशेष आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच प्रत्यक्ष नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांना किमान हेक्टरी १ लाखांची विशेष मदत तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतमजूर कुटुंबांना ५० हजारांची विशेष आर्थिक मदत, पीकविमा नुकसानभरपाई तातडीने देणे, पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करणे, फळबागांसाठी पाण्याची व्यवस्था, पशुधनासाठी चारा व पिण्याचे पाणी, आवश्यकतेनुसार चारा छावण्या सुरू करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करणे, दुष्काळग्रस्त कुटुंबांच्या वीजबिलाबाबत सवलत देणे आणि ग्रामीण भागातील नादुरुस्त रोहित्रांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली.

# शहरातील मोकळ्या व सार्वजनिक जागांवर गाजर गवताचे साम्राज्य

## साथीच्या आजारांचा धोका वाढला; तणनाशक फवारणीची गरज



■ प्रतिनिधी | रिसोड ■

शहरातील मोकळ्या भूखंडांसह सार्वजनिक जागा, रस्त्यांच्या कडेला आणि नाल्यांच्या परिसरात सध्या गाजर गवत मोठ्या प्रमाणात वाढले असून, थंडी तापाच्या रुग्णात वाढ झाली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे पावसाळ्यात सुरुवाती पासूनच तणनाशक फवारणी केली नसल्यामुळे आता डास निर्मूलन मोहीम राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

शहरातील मोकळे भूखंड, सार्वजनिक मोकळ्या जागा, मालेगाव नाक्यावरील दोन्ही स्मशानभूमी, तहसील कार्यालय, पंचायत समिती व बीडिओ यांच्या निवासस्थानाचा परिसर या व इतर ठिकाणी गाजर गवत व इतर तन मोठ्या प्रमाणात वाढले आहे परिणामी डासाचा प्रादुर्भाव झाला आहे पावसाळा संपत आला असला तरी नियमित तन नाशका ची फवारणी केली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे पावसाळ्यानंतर वाढलेल्या या तणामुळे परिसरात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले असून, डास व इतर कीटकांची पैदास वाढली आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून गाजर गवताचे निर्मूलन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच शहरातील मोकळ्या जागांकडे नगर परिषदे प्रशासनाच्या आरोग्य विभागाने दुर्लक्ष केले असल्याने या ठिकाणी गाजर गवताने अक्षरशः साम्राज्य निर्माण केले आहे. काही ठिकाणी गवताची उंची वाढल्याने परिसरातील कचरा, प्लास्टिक आणि साचलेले पाणीही झाकले गेले आहे. परिणामी नागरिकांना दुर्गंधी, डासांचा त्रास तसेच विविध कीटकांचा सामना करावा लागत आहे.

> मागील आठवडाभरापासून रुग्णाच्या संख्येत वाढ झाली आहे सर्वाधिक रुग्ण थंडी तापाचे आहेत आवश्यकता वाटल्यास भरती ठेवले जात आहेत तर काही रुग्णांना औषध उपचार करून घरी पाठविले जात आहे .
> **डॉ. प्रशांत पवार.**
> ग्रामीण रुग्णालय रिसोड.

गाजर गवतामुळे काही नागरिकांना त्वचेची जळजळ, खाज, श्वसनाशी संबंधित त्रास किंवा ॲलर्जीचा त्रास सहन करावा लागत आहे . विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि ॲलर्जीची संवेदनशीलता असलेल्या व्यक्तींना अशा वनस्पतींच्या वाढीमुळे अधिक त्रास होत आहे पावसाळ्यात तणनाशकाची फवारणी नियमित न केल्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली असून डेंग्यू, मलेरिया, यांसारख्या आजारांचा धोका वाढला आहे.

सध्या वातावरणात कमालीचा बदल झाला असून उष्णतेत वाढ झाली आहे थंडी तापीच्या रुग्णात कमालीची वाढ झाली आहे.

शहरात साथीचे आजार रोखण्यासाठी केवळ जनजागृती करून उपयोग नाही, तर सार्वजनिक परिसराची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे मोकळे भूखंड, शासकीय जागा, नाल्यांच्या कडा, रस्त्यांच्या दुतर्फा परिसर आणि नागरिकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी होत आहे .साथीचे आजार पसरण्याची वाट पाहण्यापेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची वेळ आली आहे.

# आरोग्य तपासणीत १९ मुलांच्या हृदयात दोष

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अजाणतेपणी गंभीर आजाराशी लढा देणाऱ्या लहान मुलांसाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम आणि शासकीय योजनांचे सुरक्षा कवच संजीवनी ठरत आहे. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय व जिल्हा रुग्णालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये नियमित आरोग्य तपासणी करण्यात येते. या उपक्रमादरम्यान वाशिम जिल्हा रुग्णालयात आयोजित विशेष 'टू-डी एको' (२ऊ म्प्द) संदर्भ सेवा शिबिरामध्ये बालकांच्या हृदयाची सखोल तपासणी केली असता, तब्बल १९ बालकांच्या हृदयात गंभीर दोष असल्याचे आणि त्यांच्यावर तातडीने हृदयशस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक असल्याचे निष्पन्न झाले.



अत्यंत गरिबी आणि तुटपुंज्या आर्थिक परिस्थितीमुळे आपल्या चिमुकल्यांवर महागडे उपचार कसे करायचे, या विवंचनेत असणाऱ्या पालकांसाठी शासनाचा हा पुढाकार अत्यंत दिलासादायक ठरला आहे. शासनाच्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत या सर्व १९ चिमुकल्यांना नवजीवन देण्यासाठी आणि त्यांच्यावर संपूर्ण मोफत उपचार व हृदयशस्त्रक्रिया करण्यासाठी २० सप्टेंबर रोजी 'आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' तसेच 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजने'च्या माध्यमातून भायखळा, मुंबई येथील बालाजी रुग्णालयात उपचारासाठी रवाना करण्यात आले. आपल्या काळजाच्या तुकड्यावर होणाऱ्या मोफत उपचारांमुळे चिमुकल्यांसह त्यांच्या पालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू आणि चेहऱ्यावर आशेचा किरण पाहायला मिळाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या संवेदनशील मार्गदर्शनाखाली या चिमुकल्यांना वैद्यकीय उपचारांसाठी निरोप देण्यात आला. या प्रसंगी जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, बाह्यरुग्ण संपर्क अधिकारी डॉ. प्रसाद शिंदे यांच्यासह राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक आकाश ढोके, जिल्हा कार्यक्रम सहाय्यक तुषार ढोबळे, प्रदीप भोयर, संगीता राजुरकर आणि सविता राठोड यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोफत हृदयशस्त्रक्रियेसाठी मुंबईला रवाना

# बोरखडा शाळेत 'एक शिक्षकच सर्वकाही'

## इयत्ता १ ते ५ साठी एकच शिक्षक; मुख्याध्यापकासह अध्यापनाचीही जबाबदारी, पालकांचा संताप; वारंवार निवेदने देऊनही दखल नसल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा तालुक्यातील खंडाळा परिसरातील ग्रामपंचायत भिली अंतर्गत येणाऱ्या बोरखडा येथील शाळेत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी केवळ एकच शिक्षक कार्यरत असल्याची बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, याच शिक्षकाकडे मुख्याध्यापकपदासह अध्यापनाची जबाबदारी असल्याने पाचही वर्गांचा शैक्षणिक भार एका व्यक्तीवर आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

शाळेतील शिक्षकांची संख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या यामध्ये योग्य समतोल नसल्याने एका शिक्षकाला एकाच वेळी अनेक वर्गांकडे लक्ष द्यावे लागत आहे. एका वर्गाचे अध्यापन सुरू असताना इतर वर्गातील विद्यार्थ्यांचे काय, असा प्रश्न पालकांकडून उपस्थित केला जात आहे. अध्यापनासोबतच मुख्याध्यापकपदाची तसेच शाळेतील प्रशासकीय कामांची जबाबदारीही एकाच शिक्षकावर असल्याने शैक्षणिक कामकाजावर अतिरिक्त ताण येत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.



### निवेदनांनंतरही प्रश्न कायम

शाळेत आवश्यक शिक्षकांची नियुक्ती करावी, यासाठी पालक व ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वारंवार लेखी व तोंडी मागण्या केल्याचे सांगण्यात येते. पालक, सरपंच व उपसरपंच यांच्या माध्यमातूनही संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याने पालकांमध्ये नाराजी आहे.

### आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न

ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात असताना प्रत्यक्षात शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र बोरखडा येथे दिसत आहे. शिक्षकांची कमतरता दीर्घकाळ कायम राहिल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता पालकांनी व्यक्त केली आहे.

शाळेतील विद्यार्थीसंख्या, मंजूर शिक्षक पदे, प्रत्यक्ष कार्यरत शिक्षकांची संख्या आणि शिक्षकांच्या नियुक्तीचे निकष यांची प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

### 'एक शिक्षक पाच वर्ग कसे सांभाळणार?'

'एकच शिक्षक पाच वर्ग शिकवणार, त्याच शिक्षकाकडे मुख्याध्यापकाची जबाबदारी आणि शाळेची इतर कामेही असतील, तर विद्यार्थ्यांना अपेक्षित गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळणार?' असा सवाल पालकांनी उपस्थित केला आहे. बोरखडा शाळेतील शिक्षकांची कमतरता तातडीने दूर करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करावा, अशी मागणी पालक व ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासन आता प्रत्यक्ष शाळेची पाहणी करून शिक्षक उपलब्ध करून देणार का, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

# महिला सक्षमीकरण करिता संविधान समूह गठित

■ प्रतिनिधी | मानोरा ■

महाराष्ट्र शासनाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम अंतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष तालुका मानोरा अंतर्गत स्त्रीशक्ती महिला प्रभाग संघ कुपटा मधील वापटा या गावातील संविधान समूह ऑनलाईन करण्यात आला. प्रकल्प संचालक किरण कोवे,जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे यांच्या मार्गदर्शनाखाली

महिलांचे समूह तयार करून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देऊन महिला सक्षमीकरण करण्यासाठी उमेद अभियान प्रयत्न करत आहे. त्या मध्ये नवीन समूहांची नोंदणी करणे चालू आहे. या वेळी ग्रामसखी माधुरी मनवर,प्रभाग समन्वयक नितीन भुसाळे आदी उपस्थित होते.

**Change In Name**

My old name is
**MOHAMMED HAFIZ MOHAMMED HASHAM**
Which now I am changing as new name
**MOHAMMAD HAFIZ MOHAMMAD HASHAM**
hence for my all correspondence will be done as per my new name please consider the same
Residential address:
MANGALWARI BEAS WASHIM DIST WASHIM
MAHARASHTRA - 444505
Mobile no. 9637447869

# शिरपुर जैन येथे दिगंबर जैन समाजाचा पोलीस स्टेशन वर धडक मोर्चा

## ठोस कारवाई न झाल्याने, शांततापूर्ण मूक मोर्चाद्वारे प्रशासनाला तात्काळ कारवाईबाबत निवेदन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

अंतरीक्ष पार्श्वनाथ महाराज संस्थान (दिगंबर जैन) तर्फे काल १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी पोलीस स्टेशन शिरपूर येथे प्रत्यक्ष सादर केलेला तक्रार अर्ज 'दिगबर जैन समाजाचा चालू असलेले अतिपवित्र 'दशलक्षण पर्युषण महापर्व'. उपरोक्त विषयान्वये समस्त दिगंबर जैन समाज, शिरपूर व देशभरातून आलेल्या भाविकांच्या वतीने आम्ही अत्यंत व्यथित व संतप्त अंतःकरणाने खालील बाबी आपल्या निदर्शनास आणून देत आहोत घटनेचे गांभीर्य व प्रशासनाची निष्क्रियता .

काल दिनांक १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान, श्वेतांबर पक्षाच्या सुमारे १०० दर्शनार्थींना गाभाऱ्यात बेकायदेशीरपणे घुसवून, पूर्वनियोजित कटानुसार वेदी क्रमांक २ मधील भगवान मुनिसुव्रतनाथ स्वामींच्या संगमरवरी मूर्तीचा डावा कान तोडून मूर्ती खंडित करण्यात आली. या अतिशय घृणास्पद व अक्षम्य कृत्याबाबत कालच आमच्या संस्थानतर्फे सर्व वस्तुस्थिती, सीसीटीव्ही जाणीवपूर्वक बंद ठेवण्याचा संशयास्पद प्रकार आणि कायदेशीर मागण्या नमूद करून सविस्तर तक्रार अर्ज दाखल करण्यात आला होता.परंतु, अत्यंत खेदाची बाब अशी आहे की, घटनेला इतके तास उलटूनही आणि चालू पर्युषण पर्वात समस्त दिगंबर समाजाच्या धार्मिक भावना तीव्रतेने दुखावल्या गेल्या असतानाही प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कायदेशीर कारवाई झालेली नाही; ना दोषींवर गुन्हे दाखल झाले, ना संबंधित समाजकंटकांना अटक झाली, ना सीसीटीव्ही यंत्रणेची जप्ती झाली. धार्मिक भावनांचा उद्रेक व मूक मोर्चा : सध्या सुरू असलेल्या पवित्र पर्युषण पर्वाच्या काळात देवाच्या मूर्तीची झालेली विटंबना आणि त्यानंतर पोलिसांची संथ व निष्क्रिय भूमिका यामुळे देशभरातील दिगंबर जैन समाजात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेचा निषेध नोंदविण्यासाठी आणि आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी आज दिनांक २० सप्टेंबर रोजी दुपारी १.०० वाजता ३०० दिगंबर जैन भाविकांचा शांततापूर्ण व सनदशीर मोर्चा पोलीस स्टेशन, शिरपूर येथे धडकला आहे आमच्या ठाम व तात्काळ मागण्या :१) भगवान मुनिसुव्रतनाथ स्वामींची मूर्ती तोडणाऱ्या, कट रचणाऱ्या व मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेरे जाणीवपूर्वक बंद करून पुरावा नष्ट करणाऱ्या संबंधितांवर भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलमांन्वये तातडीने प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करून संबंधितांना तात्काळ अटक करण्यात यावी.२) घटनास्थळाचा व खंडित मूर्तीचा न्यायवैद्यक (Forensic) तज्ज्ञांच्या उपस्थितीत अधिकृत पंचनामा पूर्ण करण्यात यावा.३ ) चालू पर्युषण पर्वात खंडित मूर्तीची पूजा शास्त्राने वर्ज्य असल्याने, मूळ मूर्ती जागेवर यथास्थिती (Status Quo) ठेवून भाविकांना नित्यपूजेचा हक्क बजावता यावा म्हणून तातडीने पर्यायी नवीन मूर्ती वेदीसमोर ठेवून पूजा करण्याची लेखी परवानगी देण्यात यावी. ४) मंदिरातील सर्व वेद्यांच्या व मूर्तींच्या सुरक्षेसाठी दिगंबर जैन संस्थानला स्वतंत्र सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यास तात्काळ पोलीस संरक्षण देण्यात यावे. प्रशासनास अखेरचा तीव्र इशारा सदर सूचना पत्राद्वारे पोलीस प्रशासनास आम्ही स्पष्टपणे इशारा देत आहोत की, जर आजच्या आज वरील मागण्यांवर ठोस कायदेशीर पावले उचलून दोषींवर गुन्हे दाखल केले नाहीत.



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९६ ■ मंगळवार २२ सप्टेबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# सातबारावर आता वनपट्टाधारकांचा हक्काचा शिक्का

**३२६ कुटुंबांच्या जमिनींची स्वतंत्र नोंद होणार. 'इतर हक्क'ची कोंडी फुटली. ७-ई आणि १२-ई नमुना तयार करण्याची धडाकेबाज प्रक्रिया**

**वर्धा जनमाध्यम-** वर्षानुवर्षे जंगलाच्या जमिनीवर हक्क मिळाल्यानंतरही सातबारावर स्वतंत्र ओळख मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या वनपट्टाधारकांच्या हक्काला आता अधिकृत बळ मिळणार आहे. वनहक्क कायदा २००६ अंतर्गत जिल्ह्यात ४१२ लाभार्थ्यांना जमिनीचे पट्टे मंजूर झाले आहेत. यापैकी ३२६ लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण झाली असून त्यांच्या जमिनींच्या स्वतंत्र नोंदीसाठी गाव नमुना ७-ई आणि १२-ई तयार करण्याचे काम सुरू आहे. प्रक्रिया पूर्ण होताच या लाभार्थ्यांच्या सातबारावर त्यांचे नाव मुख्य खातेदार किंवा भोगवटादार म्हणून नोंदविले जाणार आहे.

आतापर्यंत वनहक्काच्या जमिनीची नोंद सातबारावरील 'इतर हक्क' या सदरापुरती मर्यादित होती. जमीन मिळाली होती. मात्र सातबारावर स्वतंत्र खातेदार म्हणून ठोस नोंद नसल्याने वनपट्टाधारकांच्या हक्काला प्रशासकीय कागदोपत्री मर्यादा होत्या. आता स्वतंत्र गाव नमुना ७-ईमुळे ही परिस्थिती बदलणार आहे. संबंधित कुटुंबाचे नाव थेट मुख्य खातेदार किंवा भोगवटादार म्हणून नोंदविले जाणार असल्याने वनपट्टाधारकांच्या जमिनीला स्वतंत्र महसुली ओळख मिळणार आहे.

यासोबतच गाव नमुना १२-ईमध्ये वनहक्काच्या जमिनीवर घेतल्या जाणाऱ्या पिकांची नोंद होणार आहे. त्यामुळे या जमिनीवर प्रत्यक्ष शेती करणाऱ्या लाभार्थ्यांची शेतकरी म्हणून अधिकृत नोंद होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

**हक्क मिळाला. आता योजनांचाही मार्ग मोकळा**

सातबारावरील स्वतंत्र नोंदीमुळे वनपट्टाधारक शेतकऱ्यांना पीएम किसान, पीक विमा, कृषी अनुदान, कर्ज सुविधा तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळातील मदतीसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. म्हणजेच जंगलातील जमिनीचा हक्क आता सरकारी कागदोपत्री व्यवस्थेत अधिक ठोसपणे उमटणार आहे.

**जमीन विकता येणार नाही**

वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेली जमीन विक्री किंवा हस्तांतरित करता येणार नाही. या जमिनीचा हक्क वारसाहक्काने कुटुंबाकडे पुढे जाऊ शकतो. त्यामुळे वनपट्टाधारकांच्या जमिनीला संरक्षण देतानाच त्यांच्या हक्काची महसुली नोंदही स्वतंत्रपणे होणार आहे.

**कुठे किती पट्टे**

समुद्रपूरमध्ये ४४ घरपट्टे आणि ९४ शेतपट्टे आहेत. हिंगणघाटमध्ये ८ घरपट्टे आणि २७ शेतपट्टे आहेत. सेलूमध्ये ५० घरपट्टे आणि २० शेतपट्टे आहेत. वर्ध्यात ५९ घरपट्टे, देवळीत १२ आणि आर्वीत १४ घरपट्टे आहेत. कारंजात सर्वाधिक ८४ घरपट्टे आहेत.

एकूण लाभार्थी ४१२. ई केवायसी पूर्ण ३२६. घरपट्टे १४१. शेतपट्टे २७१.

# शेतकरी प्रश्नांवर प्रशासनाला धक्का प्रवीण उपासेंचे जमिनीत गाडून आंदोलन



**कापसाला १५ हजार तर सोयाबीनला १० हजारांचा भाव देण्याची मागणी**

**पंधरा दिवसांत निर्णय न झाल्यास देवळी येथे रास्ता रोकोचा इशारा**

**हिंगणघाट जनमाध्यम-** शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रभाताई राव विचार मंचाचे कार्याध्यक्ष प्रवीण उपासे यांनी सोमवारी थेट जमिनीत गाडून घेत अनोखे आंदोलन केले. उपासे यांच्या या आंदोलनामुळे एसडीओ कार्यालय परिसरात प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. तब्बल साडेतीन तासांनंतर तहसीलदार एम. एस. भलावी यांनी घटनास्थळी पोहोचून निवेदन स्वीकारले. वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या पोहोचविण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपासे खड्ड्यातून बाहेर आले. प्रभाताई राव विचार मंचाच्या वतीने मुख्यमंत्री यांना पाठविण्यासाठीचे निवेदन देण्यासाठी सकाळी ११ वाजता कार्यकर्ते एसडीओ कार्यालयासमोर जमले होते. यावेळी उपासे यांनी कार्यकर्त्यांच्या मदतीने कार्यालयासमोर खड्डा खोदून स्वतःला त्यात गाडून घेतले. प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी भूमिका त्यांनी घेतली.

कापसाला प्रतिक्विंटल १५ हजार रुपये आणि सोयाबीनला १० हजार रुपये भाव मिळावा, कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून पुढील हंगामासाठी बँकेमार्फत पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, तसेच २०२५-२६ च्या पीकविम्यापोटी हेक्टरी १७ हजार ५०० रुपये तातडीने द्यावेत, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांवर पंधरा दिवसांत निर्णय न झाल्यास देवळी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा उपासे यांनी दिला.

आंदोलनात रामेश्वर वाघ, डॉ. रामकृष्ण खुजे, गुणवंत कोठेकर, उदय डफळे, डॉ. पवन गोसेवाडे, अभय वानखेडे यांच्यासह विचार मंचाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# शेतातील मोटारपंप चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**सावंगी पोलिसांची कारवाई; २.०४ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन गुन्हे उघडकीस**



**वर्धा जनमाध्यम,** सावंगी मेघे पोलिसांनी शेतातील विहिरीवरील मोटारपंप चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करून पाच आरोपींना अटक केली. त्यांच्या ताब्यातून मोटारपंप, वाहने, मोबाईल आणि तांब्याच्या तारा असा एकूण २ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पडेगाव येथील राजेंद्र डायगव्हाणे यांच्या शेतातील ५ एचपी मोटार व केबलसह शेजारील दोन शेतकऱ्यांच्या मोटारी १६ ते १७ सप्टेंबरदरम्यान चोरीला गेल्या होत्या. याप्रकरणी सावंगी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांना एका विधिसंघर्षित बालकाचा चोरीत सहभाग असल्याची माहिती मिळाली. चौकशीत त्याने ओम पठाडे, सम्यक भरणे, कुणाल उर्फ किष्णा राऊत, जितेंद्र कांबळे आणि आशिष आत्राम यांच्या मदतीने मोटारपंप चोरल्याची माहिती दिली.

पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली. चौकशीत चोरीच्या मोटारी सावंगीतील भंगार विक्रेता गोविंद गदई याला विकल्याचे समोर आले. त्याच्याकडून तीन मोटारी तसेच यापूर्वी वडद, सेलसुरा आणि नागठाणा परिसरातून चोरी केलेल्या चार मोटारींचे पार्ट जप्त करण्यात आले.

याशिवाय सावंगी मेडिकल चौक परिसरातील बांधकाम यंत्रणेची केबल चोरी करून तांबे काढल्याचेही आरोपींनी कबूल केले. या प्रकरणातील तांब्याची तारही जप्त करण्यात आली. पोलिसांनी दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार विनोद गिरी व पथकाने केली.

# पाईपलाईनसाठी रस्ते उखडले, आता गट्टूची मलमपट्टी कशाला

**खराब रस्ता आधी काँक्रिटचा करा; सेलूच्या प्रभाग क्रमांक एकमधील नागरिकांचा संताप**



**सेलू जनमाध्यम :** शहरात शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असले तरी या कामामुळे प्रभाग क्रमांक एकमधील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. खोदकामानंतर रस्त्यांवर माती टाकून थातूरमातूर मलमपट्टी केली जात असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. खराब झालेल्या रस्त्यावर गट्टू बसविण्याऐवजी प्रथम दर्जेदार सिमेंट काँक्रिटचा रस्ता तयार करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

प्रभाग क्रमांक एकमध्ये आदित्य बोरकर यांच्या घरापासून दत्त सारे यांच्या घरापर्यंत रस्त्याच्या कडेला गट्टू बसविण्याचे काम नगरपंचायतीकडून सुरू आहे. मात्र, या भागातील जुना रस्ता आधीच खराब झाला असून अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे गट्टू बसविण्यापेक्षा संपूर्ण रस्त्याची दुरुस्ती करून मजबूत सिमेंट काँक्रिटचा रस्ता उभारण्याची मागणी होत आहे.

पावसाळ्यात या रस्त्यावर चिखल आणि पाणी साचत असल्याने नागरिकांना ये-जा करणे कठीण होते. त्यातच रात्री काही भागातील पथदिवे बंद असल्याने नागरिकांच्या अडचणीत भर पडत आहे.

पाईपलाईनच्या कामासाठी रस्ते खोदून पुन्हा केवळ माती टाकली जात असल्याने विकासकामाच्या नावाखाली नागरिकांची गैरसोय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुरू असलेले गट्टूचे काम थांबवून रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करावी आणि नागरिकांच्या गरजेनुसार सिमेंट काँक्रिटचा दर्जेदार रस्ता करावा, अशी मागणी भाजप कार्यकारिणी सदस्य धीरज पवनारकर यांच्यासह मोहल्ल्यातील नागरिकांनी केली आहे.

# बिबट्याची दहशत वाढली, केळझरमध्ये वासराचा फडशा

**दोन दिवसांत दुसरी घटना; शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण**

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. केळझर येथे शेतातील गोठ्यात शिरलेल्या बिबट्याने वासराचा फडशा पाडल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. अवघ्या दोन दिवसांत बिबट्याच्या हल्ल्याची ही दुसरी घटना असल्याने ग्रामस्थांमध्ये चिंता वाढली आहे.



केळझर येथील शेतकरी सुमित्रा ज्ञानेश्वर तेलरांधे यांच्या शेतातील गोठ्यात २० सप्टेंबरच्या मध्यरात्री किंवा २१ सप्टेंबरच्या पहाटे बिबट्या शिरला. गोठ्यात दोन गायी, एक कारवड आणि वासरू बांधलेले होते. दबा धरून बसलेल्या बिबट्याने वासराला उचलून मुख्य कालव्यालगतच्या झुडपात नेले आणि ठार केले.

सोमवारी सकाळी सुमित्रा तेलरांधे यांचा मुलगा नरेश तेल आणण्यासाठी शेतात गेला असता त्याला हा प्रकार निदर्शनास आला. त्याने तत्काळ ग्रामस्थांसह वनविभागाला माहिती दिली. केळझर बिटचे वनरक्षक दत्ता मुसळे आणि वनमजूर बापुराव सोनटक्के यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला.

दरम्यान, १९ सप्टेंबर रोजी खापरी मुंगापूर येथे शेतकरी पुरुषोत्तम वैद्य यांच्या गोठ्यातील बोकड आणि बकरीचा बिबट्याने फडशा पाडला होता. त्यानंतर केळझरमधील घटनेने भीती आणखी वाढली आहे.

# १३५ ठेवीदारांच्या २.४१ कोटींवर डल्ल्याचा आरोप

**पतसंस्थेचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात. अध्यक्ष उपाध्यक्षांसह १३ संचालकांवर गुन्हा**

**हिंगणघाट जनमाध्यम** ठेवी सुरक्षित समजून पतसंस्थेत पैसा ठेवणाऱ्या ग्राहकांसमोर आता मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. रावसाहेब पटवर्धन अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या हिंगणघाट शाखेतील सुमारे १३५ ग्राहकांच्या २ कोटी ४१ लाख ५० हजार रुपयांच्या ठेवींबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. ठेवींच्या रकमेचा अपहार आणि फसवणूक झाल्याच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी शाखा अध्यक्ष उपाध्यक्षांसह १३ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पतसंस्थेची ग्राहक समीक्षा नंदकिशोर शिवणकर यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यांनी २०२४ मध्ये दरमहा एक हजार रुपयांची आरडी सुरू केली होती. त्यानंतर एक लाख रुपयांची वार्षिक एफडी केली. एफडीची मुदत २७ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण झाल्यानंतर ३ लाख ३१ हजार ३८७ रुपये काढण्यासाठी त्या शाखेत गेल्या. मात्र शाखा प्रमुख केशव उमाटे आणि उपशाखा प्रमुख मधुरा पहाडे यांनी संस्थेत निधी उपलब्ध नसल्याचे सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे.

अधिक चौकशी केली असता हिंगणघाट शाखेतील सुमारे १३५ ग्राहकांच्या ठेवींची २ कोटी ४१ लाख ५० हजार रुपयांची रक्कम यवतमाळ येथील मुख्य शाखेत पाठविण्यात आल्याचे समोर आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. २५ ऑगस्ट रोजी ग्राहकांनी यवतमाळ येथील मुख्य शाखेत धाव घेत संचालक मंडळाकडे ठेवी परत करण्याची मागणी केली. ३१ ऑगस्टपर्यंत रक्कम परत करण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र मुदत उलटूनही पैसे मिळाले नसल्याचा आरोप आहे.

**स्थानिक पदाधिकाऱ्यांवरही टाळाटाळीचा आरोप**

रक्कम परत मिळत नसल्याने ग्राहकांनी स्थानिक शाखेतील पदाधिकाऱ्यांकडे विचारणा केली. मात्र मुख्य शाखेकडून निधी उपलब्ध होत नसल्याचे सांगून टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत आहे.

**१३ जणांविरुद्ध गुन्हा**

आशिष भालचंद्र सोमन वैशाली राजेश पाटणे अनिल विठ्ठल बांद्रे रुपेश जनार्धन येंडे कीर्ती अतुल महाजन सचिन पुंडलिक बनकर राहुल शरद अडगुलवार सारंग मुकुंद औदार्य निलेश कैलासचंद्र लष्करी निखीलेश प्रकाश जोशी संदीप शंकर जिरकर नितेश विलास बेंद्रे आणि कुंदन बालकृष्ण चुलपार यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हिंगणघाट पोलिस करीत आहेत.

# काजू बदाम खाण्याची चिंता नको. शेतकऱ्यांच्या सोयाबीनची चिंता करा

**वर्धा दुष्काळग्रस्त जाहीर करा. नुकसानग्रस्तांना एकरी ५० हजारांची मदत द्या**

**राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे तहसीलदारांना निवेदन. अतुल वांदिले यांचा सरकारला इशारा**



**समुद्रपूर जनमाध्यम .** सोयाबीनच्या शेतात शेतकऱ्यांचा घाम वाहतोय आणि सरकार मात्र कागदी पंचनाम्यांच्या सावलीत बसले आहे. प्रतिकूल हवामान आणि पावसाच्या अनियमिततेने सोयाबीन उत्पादनाला मोठा फटका बसला असताना आता शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. काजू बदाम खाण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या सोयाबीन नुकसानीची चिंता करा, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी सरकारला सुनावले.

समुद्रपूर तालुक्यासह संपूर्ण वर्धा जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपये तातडीने भरपाई द्यावी, प्रतिकूल हवामान आणि पावसाच्या अनियमिततेने सोयाबीन उत्पादनाला मोठा फटका बसला असताना आता शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. काजू बदाम खाण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या सोयाबीन नुकसानीची चिंता करा, या मागणीसाठी वांदिले यांच्या नेतृत्वात तहसीलदारांमार्फत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन देण्यात आले. सोयाबीनचे उत्पादन आणि गुणवत्ता घटल्याने बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीचा खर्चही निघणे कठीण झाले आहे. त्यामुळे तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत, पीकविम्याची भरपाई मिळवून द्यावी आणि दुष्काळग्रस्त घोषित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांना आश्वासन नको, हक्काची मदत हवी. सरकारने ठोस निर्णय घेतला नाही तर आंदोलन तीव्र करू, असा इशारा अतुल वांदिले यांनी दिला. यावेळी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वामनराव तरासे यांचे निधन



वर्धा : शहरातील केळकरवाडी येथील निवासी ज्येष्ठ नागरीक वामनराव मोतीरामजी तरासे यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर स्थानिक मोक्षधाम येथे अंतिम संस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात मुलगा अविनाश तरासे, आराधना दिवटे, सोनाली वरकड, पुतने बाळाभाऊ तरासे, विवेक तरासे, रविशंकर तरासे, नातवंड व मोठा आप्त परिवार आहे. वामनराव तरासे हे सहकार विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी आहेत.


## कार्यालय नगर परिषद, वर्धा

कार्यालय दुरध्वनी क्र. (०७१५२) २४३२७८, फॅक्स क्र. (०७१५२) २३१७११ ई मेल - co.wardha@gmail.com

**निविदा सूचना (१ली वेळ) (सन २०२६-२७)**

क्रमांकः ५०५४ /बांध/निविदा २६ दिनांकः २१/०१/२०२६

सर्व सार्वजनिक बांधकाम विभाग पंजीबध्द कंत्राटदारास याव्दारे सूचित करण्यात यते की, नगर परिषद निधी सन २०२६-२७अंतर्गत खालील निर्देशित कामाकरिता निविदा मागविण्यात येत आहे. १z इसार रक्कम दिलेल्या मुदतीत भरावयाची आहे. दिलेल्या मुदतीत न येणा-या निविदा स्वीकृत करता येणार नाही. तसेच निविदा मंजुरीचे व नामंजुरीचे संपूर्ण अधिकार मुख्याधिकारी वर्धा यांनी राखून ठेवले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय किंमत | १% इसार रक्कम | निविदा किंमत (ना परतावा नगदी रक्कम) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ४ मधील संतोषी माता मंदिर मंदिर येथे गेट बसविणे. | ८,१९,२७७/- | ८,२००/- | ५००/- | ६० दिवस |

**प्रसिद्धीचे वेळापत्रक**

| अ. क्र. | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी करणे | दि. २२/०९/२०२६ ला सकाळी १०.०० वाजता. |
| २ | कोरी निविदा प्रसिद्ध करणे | दि. २२/०९ / २०२६ ला सकाळी १०.०० वाजता पासून दि. ०१/१०/२०२६ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | सील बंद निविदा सादर करणे | दि. २२/०९/२०२६ ते दि.०/१०/२०२६ ला वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन सुटीचा दिवस वगळून) |
| ४ | निविदा उघडणे | दि. ०५/१०/२०२६ ला वेळ सकाळी १०.०० वाजता (शक्य झाल्यास) |

सदर कामांचा सविस्तर तपशील बांधकाम विभाग नगर परिषद, वर्धा येथे कार्यालयीन वेळेत बघण्यासाठी उपलब्ध आहे.

**(श्रीमती. राखी पांडे)** बांधकाम सभापती नगर परिषद, वर्धा

**(श्री. प्रदीपसिंग ठाकूर)** उप-नगराध्यक्ष नगर परिषद, वर्धा

**(श्री. सुधीर पांगुळ)** नगराध्यक्ष, नगर परिषद, वर्धा

**(श्री. विक्रम शिर्के)** मुख्याधिकारी नगर परिषद, वर्धा

# आपले सिम दुस-याला दिल्यास ५० लाखांचा दंड: ३ वर्षांचा तुरूंगवासही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** तुमच्या कागदपत्रांवर घेतलेले सिमकार्ड दुस-या व्यक्तीला देणे महागात पडू शकते. दूरसंचार विभागाने २१ सप्टेंबर रोजी नवीन मार्गदर्शक सूचना जारी करून सांगितले आहे की, बनावट ओळखपत्राद्वारे सिमकार्ड खरेदी किंवा विक्री केल्यास अथवा मोबाइलच्या क्ष्क्क्ष क्रमांकात छेडछाड केल्यास ३ वर्षांचा तुरुंगवास आणि ५० लाखांपर्यंत दंड होउ शकतो. सरकारने सर्व नागरिकांना संचार साथी पोर्टल किंवा अपवर जाउन त्वरित तपासणी करण्याचा सल्ला दिला आहे . दूरसंचार विभागाने छत्तीसगडमध्ये झालेल्या एका मोठ्या सायबर फसवणुकीनंतर हे पाउल उचलले आहे. तेथे एका सिम विक्री करणा-या एजंटने लोकांच्या कागदपत्रांचा गैरवापर करून त्यांच्या नकळत २५ बनावट सिम कार्यान्वित केल्या होत्या.

प्रकरण उघडकीस येताच DoT ने त्या एजंटला ब्लॅकलिस्ट केले आणि री-व्हेरिफिकेशनमध्ये अपयशी ठरल्यानंतर सर्व २५ बनावट क्रमांक तातडीने बंद केले.

**सिम भाड्याने दिल्यास मूळ ग्राहकही अडचणीत येईल**-दूरसंचार विभागाने स्पष्ट केले आहे की, तुम्ही तुमच्या नावावर सिम खरेदी करून ती दुस-याला विकली, भाड्याने दिली किंवा सायबर फसवणुकीसाठी वापरू दिली, तर तुमच्याविरुद्धही पोलिसांत गुन्हा दाखल होउन कायदेशीर कारवाई केली जाईल.

याशिवाय बनावट कागदपत्रे सादर करून सिम घेणे, ओळख लपवून फसवणूक करणे किंवा दुस-याच्या नावावरील सिमचा गैरवापर करणे हेदेखील गंभीर गुन्हे आहेत.




जेव्हा एखादा ठग कोणत्याही ओळखपत्राच्या आधारे सिम मिळवतो किंवा पैशांचे आमिष दाखवून एखाद्याची सिम घेतो आणि तिचा वापर करून सायबर गुन्हा करतो, तेव्हा त्या सिमला 'म्यूल सिम' म्हटले जाते.

**IMEI क्रमांक आणि कालिंग ID बदलण्यावरही बंदी**

ॲडव्हायझरीनुसार, ज्या फोनच्या IMEI क्रमांकात छेडछाड किंवा बदल करण्यात आला असेल, त्याचा वापर करणे बेकायदेशीर आहे. तसेच, ॲप्स किंवा वेबसाइट्सद्वारे दुस-या व्यक्तीचा क्रमांक दाखवून काल करणे (कालिंग ID बदलणे) अशा साधनांचा वापर करणेही गुन्हा आहे. सरकारने हे देशाच्या सुरक्षेसाठी आणि नेटवर्कसाठी मोठा धोका मानला आहे. भारतात एका व्यक्तीच्या नावावर जास्तीत जास्त ९ सिम कार्ड ठेवण्याचा नियम खूप जुना आहे. मात्र, जम्मू-काश्मीर, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांसाठी हा नियम थोडा वेगळा आहे. सुरक्षेच्या कारणास्तव या राज्यांमध्ये राहणारे लोक आपल्या नावावर जास्तीत जास्त ६ सिम कार्डच ठेवू शकतात.

सरकारने दूरसंचार कंपन्यांना डिजिटल इंटेलिजन्स प्लॅटफार्मचा वापर करण्यास सांगितले आहे. या पोर्टलवर देशातील सर्व मोबाइल वापरकर्त्यांचा डेटा उपलब्ध आहे.

नवीन सिम अक्टिव्हेट करण्यापूर्वी कंपन्या या पोर्टलवर तुमच्या नावावर एकूण किती सिम सुरू आहेत, हे तपासतील.

नियम अधिक कडक करण्यासाठी सरकारने २३ ऑगस्टपासून डिजिटल इंटेलिजन्स प्लॅटफार्मवर एक नवीन फीचर जोडले आहे.यानुसार, ज्या लोकांकडे सिम कार्डची निर्धारित मर्यादा (९ सिम) पेक्षा जास्त सिम आहेत, त्यांचे फोटो या पोर्टलवर दिसू लागतील. यामुळे सिम विकताना कोणत्या ग्राहकाला नवीन सिम देण्यास नकार द्यायचा आहे, हे डीलरना त्वरित समजेल.

**३० नोव्हेंबरपर्यंत कंपन्यांना यंत्रणेत सुधारणा करण्याची मुदत**- दूरसंचार विभागाने सर्व दूरसंचार कंपन्यांना त्यांच्या प्रणाली या नव्या सरकारी प्लॅटफार्मशी पूर्णपणे जोडण्यासाठी ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंतची मुदत दिली आहे. तोपर्यंत कंपन्यांना त्यांची संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थित करावी लागेल, जेणेकरून कोणतेही अतिरिक्त सिम सक्रिय होउ शकणार नाही.

# खरीप हंगामातील ऊत्पादन ५० टक्क्यांहून कमी सोयाबीन, कडधान्यांना मोठा फटका

## परतीच्या पावसाचा तूर, कापसाला दिलासा शक्य

**मुंबई/प्रतिनिधी :**मोसमी पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. परतीच्या प्रवासात राज्यात काही ठिकाणी पाउस पडत असला तरीही खरीप हंगामातील वाळून गेलेल्या पिकांना त्याचा फायदा होणार नाही. पिकेच करपून गेल्यामुळे खरीप हंगामातील पिकांचे उत्पादन ५० टक्क्यांहून कमी होईल, असा प्राथमिक अंदाज आहे. कृषी विभाग पहिला अधिकृत अंदाज सप्टेंबरअखेर जाहीर करणार आहे. परतीचा पाउस चांगला झाल्यास तूर आणि कापूस पिकाला काहीसा दिलासा मिळू शकतो.राज्यात सरासरीच्या तुलनेत यंदा खरीप हंगामातील पेरण्यांमध्ये ५ ते ७ टक्क्यांची घट झाली आहे. एकूण सुमारे १ कोटी ३९ लाख ६ हजार ७६ हेक्टरवर पेरणी झाली आहे. त्यापैकी सोयाबीन मुख्य पीक असून, ४९ लाख ६३ हजार ९३३ हेक्टरवर पेरणी झाली आहे. अपवाद वगळता राज्यातील सोयाबीनच्या पिकाला मोठा फटका बसला आहे. सिंचनाची सोय असलेल्या ठिकाणीही सरासरी इतके सोयाबीन उत्पादन होण्याची शक्यता नाही. गत काही वर्षांपासून राज्यात सरासरी १०० लाख टन सोयाबीन उत्पादन होते, यंदा त्यात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्या खालोखाल मूग, उडीद या कमी काळातील पिकांची पेरणी होते. पण, पावसाअभावी कडधान्य पिके जळून गेली



आहेत. उर्वरीत खरीप ज्वारी, बाजरी, रागी, वरई, आदी तृणधान्यांची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. राज्यात कोकण किनारपट्टीसह सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये, विदर्भात भाताची शेती होते. यंदा सरासरी १३ कोटी ९७ लाख ७०६ हेक्टरवर भाताची लागवड झाली आहे. पण, तळकोकणासह सह्याद्री आणि विदर्भातही पावसाने ओढ दिल्यामुळे भाताच्या वाढीवर परिणाम झाला आहे. पूर्व विदर्भात पावसाची स्थिती बरी असली तरीही भाताचे अपेक्षित उत्पादन होण्याची शक्यता नाही. त्यामुळे किनारपट्टीपासून, विदर्भापर्यंत भात पिकाला फटका बसला आहे. मोसमी पावसाने परतीचा प्रवास सुरू केला आहे. राज्यात सोमवारपासून काही ठिकाणी पाउस सुरू झाला आहे. वाळून गेलेल्या पिकांना फायदा होणार नसला तरीही उशिराने काढणी होणा-या तूर आणि कापूस पिकाला काहीसा दिलासा मिळू शकतो. हंगामात तुरीची सुमारे १२ लाख तर कापसाची ३८ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. तूर, कापसाची लागवड प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भात होते. सिंचनाची सोय असलेल्या ठिकाणी तूर, कापसाचे पीक जीवंत असले तरच परतीचा पावसाचा काहीसा फायदा होउ शकतो. पण, वाढीवर परिणाम झाल्यामुळे सरासरी इतक्या उत्पादनाची अपेक्षा नाही. राज्याच्या बहुतांश भागातील पिके पावसाअभावी वाळून गेली आहेत, त्या ठिकाणी शेतक-यांच्या हाताला काहीच लागणार नाही. सिंचनाची सोय असलेल्या ठिकाणी स्थिती बरी आहे. त्यामुळे खरीप हंगामातील एकूण पीक उत्पादनात मोठी घट होणार आहे. कृषी विभाग सप्टेंबरअखेर अधिकृत पहिला अंदाज जाहीर करेल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

# पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य द्या

**मुंबई/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील सर्व जलस्त्रोतांची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा आणि संभाव्य वापराचे तातडीने लेखापरीक्षण करून पुढील ऑगस्टपर्यंतचा पाणीपुरवठा आराखडा तयार करावा. नागरिकांसह पशुधनासाठी पाणी आणि चा-याची उपलब्धता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया, अपर जिल?हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी



शशिकांत हदगल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जालना जिल्ह्यातील धरणे, तलाव, विहिरी, लघुपाटबंधारे आणि अन्य नैसर्गिक जलस्त्रोतांतील पाणीसाठ्याचे लेखापरीक्षण पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना दिले. जायकवाडी प्रकल्पातून होणा-या उपल पाणीपुरवठ्याची स्थिती आणि अंबड व जालना शहरांना उपलब्ध होणा-या पाण्याचा कालावधी यांचा अचूक अंदाज घ्यावा. सध्याचा पाणीसाठा मार्चपर्यंत पुरण्याची शक्यता असली, तरी पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी उपलब्ध न झाल्यास निर्माण होणा-या परिस्थितीचा विचार करून पर्यायी नियोजन करावे, असे पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले. पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, महानगरपालिका, नगरपंचायती, मोठ्या ग्रामपंचायती तसेच दुर्गम व डोंगराळ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे स्रोत आतापासून निश्चित करावेत. या स्रोतांतील पाणीसाठ्याचे नियमित निरीक्षण करून आवश्यकतेनुसार पर्यायी स्रोत तयार ठेवावेत. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी शेती, उद्योग, मोठी बांधकामे आणि अन्य पाणीखाउ वापरांचा आढावा घेउन आवश्यक उपाययोजनांचा प्रस्ताव तयार करावा.

# लोकसंवादातून शासनाच्या योजनांची माहिती गरजूंपर्यंत पोहोचविण्यास गणेशोत्सव मंडळांनी पुढाकार घ्यावा

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणा-या योजनांची माहिती गरजू महिला व बालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी गणेशोत्सव मंडळांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या लोकसंवाद २०२६ उपक्रमांतर्गत शासनाच्या विविध विभागांच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. अखिल खोताची वाडी सार्वजनिक गणेश मंडळाला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे बोलत होत्या. यावेळी कौशल्य विकास व रोजगार तसेच सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचीही माहिती नागरिकांना देण्यात आली. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी लेक लाडकी योजना राबविण्यात येत आहे. तसेच पोषण माहच्या माध्यमातून शहरासह राज्यातील पालकांमध्ये पोषणाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. अनाथ बालकांसाठी बालकाश्रम, काम करणा-या महिलांसाठी वसतिगृहे, तसेच उच्च शिक्षण घेणा-या मुलींना गुणवत्तेच्या आधारे मुंबई व उपनगरातील वसतिगृहांमध्ये प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. महिला व बालकांच्या सुरक्षेसह त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षीच्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागांच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे, असे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.महिला व बालकांच्या आरोग्यासाठी आरोग्य विभाग, महिलांना विविध लघुउद्योग सुरू करण्यासाठी उद्योग विभाग, शेतकरी महिलांना लाभ मिळवून देण्यासाठी कृषी विभाग, सामाजिक न्याय विभाग, कौशल्य व रोजगार विभाग तसेच सुरक्षेसाठी गृह विभाग यांच्या समन्वयाने महिला व बालविकास विभाग विविध योजना राबवित आहे.ग्रामीण भागासह शहरातील महिलांनाही उद्योग सुरू करता यावेत यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ कार्यरत आहे. महिलांना कायदेशीर सहाय्य व सुरक्षेसाठी राज्य महिला आयोग, बालकांच्या हक्क व सुरक्षेसाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, तसेच बालक व मातांच्या आरोग्यासह शिक्षणासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यरत असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी मंडळाचे अध्यक्ष संतोष मोगरे, सचिव सतीश फटकरे , खजिनदार सुशांत कवळे , उपाध्यक्ष विजय फटकरे, विभागीय संपर्क अधिकारी संध्या गरवारे, श्रद्धा मेश्राम, अश्विनी पुजारी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि नागरिक उपस्थित होते.

# येत्या काही महिन्यांत जगभरात महाप्रलय

**न्यूयार्क/वृत्तसंस्था :** देशातील १८० हून अधिक पर्यावरण व हवामान शास्त्रज्ञांनी एल निनोबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. २०२६-२७ चा एल निनो सर्वसामान्यापेक्षा अधिक प्रभावशाली असू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतातील जंगले, नद्या, समुद्र, पर्वत आणि वन्यजीवांवर यांचा परिणाम होउ शकतो, अशी भीती आहे. यासंदर्भातील संशोधनपर अभ्यास नुकताच झेनोडो प्लॅटफार्मवर सुपर एल निनोची धडक-इकोलाजिस्टसाठी इशारा आणि आव्हान या नावाने प्रसिद्ध झाला आहे. वैज्ञानिकांच्या मते, या वेळी प्रशांत महासागरातील समुद्राचे तापमान असामान्यपणे वाढत आहे. त्यामुळे येणा-या काही महिन्यांवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. ही परिस्थिती सामान्य एल-निनो असणा-या वर्षांपेक्षा खूप वेगळी असू शकते. म्हणून त्याचा परिणाम समजून घेण्यासाठी आणि नोंदवण्यासाठी आतापासूनच मोठ्या प्रमाणावर देखरेख करणे आवश्यक आहे. एल-निनोचा प्रभाव केवळ जमिनीपुरता मर्यादित राहणार नाही. भारताच्या आसपासच्या सागरी क्षेत्रात समुद्राचे तापमान वाढल्याने सागरी उष्णतेची लाट येउ शकते. याचा परिणाम सागरी जीवांवर होउ शकतो. दरम्यान काही वैद्यानिकांच्या मते सध्या जगभरात हवामान बदलामुळे आणि अल निनो या नैसर्गिक घटकामुळे अनेक देशांमध्ये पूर, चक्रीवादळे आणि अतिवृष्टी सारख्या तीव्र हवामान बदलांच्या घटना घडत आहेत. वैज्ञानिक संस्थांच्या मते, समुद्राचे तापमान वाढल्याने बाष्पीभवन वेगवान झाले असून त्यामुळे काही भागात ढगफुटी आणि मुसळधार पाउस होत आहे, ज्याला स्थानिक पातळीवर प्रलय सारखी परिस्थिती म्हटले जात असले तरी हा संपूर्ण जगाचा अंत किंवा महाप्रलय नाही. पाउस कमी झाल्यास पाण्याची टंचाई वाढू शकते, ज्याचा थेट परिणाम शेती, जंगले आणि पशुपालनावर होईल. नोव्हेंबर २०२६ पासून पुढच्या वर्षापर्यंत भारताच्या अनेक भागांमध्ये सामान्यपेक्षा जास्त उष्ण आणि कोरडे हवामान पाहायला मिळू शकते, अशी भीती वैज्ञानिकांना आहे. जलस्रोतांवरील ताण वाढल्याने केवळ कृषी उत्पादनावर परिणाम होणार नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही ताण येउ शकतो. शहरांमध्येही उष्णतेचा प्रभाव वाढू शकतो. दीर्घकाळ टिकणारी तीव्र उष्णता लोकांच्या आरोग्यासाठी आणि शहरांमधील झाडे व वनस्पतींसाठी आव्हान बनू शकते.

# गणेश मंडळांच्या माध्यमातून लोकसंवादाचा जागर

**मुंबई/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन आणि लोकजागृतीला चालना देत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या लोकसंवाद २०२६ उपक्रमाला मुंबई उपनगरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गणेश मंडळांच्या माध्यमातून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, सेवा, उपक्रम आणि उपलब्ध सुविधांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. गणेशभक्तांसह रहिवासी, विद्यार्थी, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांशी यावेळी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला.वांद्रे आणि खार परिसरातील विविध गणेश मंडळांना भेट देत विभागीय संपर्क अधिकारी आणि संबंधित विभागांच्या अधिका-यांनी नागरिकांशी संवाद साधला. शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणा-या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांनी कसा घ्यावा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे कोणती, संबंधित सेवा कुठे उपलब्ध आहेत, तसेच विविध शासकीय उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली.वांद्रे पूर्व येथील वांद्रेचा सम्राट वांद्रे सार्वजनिक उत्सव मंडळ, खेरवाडी येथे अध्यक्ष सागर रेड्डी, सचिव स्वप्निल मोरे आणि खजिनदार निखिल कारंडे यांच्या उपस्थितीत लोकसंवाद साधण्यात आला. उपखजिनदार सचिन चावला यांनीही उपक्रमास सहकार्य केले.वांद्र्याच्या महाराजा खेरवाडी सार्वजनिक गणेश व नवरात्र उत्सव मंडळ, खेरवाडी रोड क्रमांक ४, वांद्रे येथे अध्यक्ष सौरभ ननावरे, उपाध्यक्ष विशाल सहानी आणि उपसचिव अनंत बोरसे यांच्या उपस्थितीत नागरिकांना शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.खार येथील शिव शक्ती मित्र मंडळ येथे अध्यक्ष विजय मिश्रा, सचिव अनिल सिंग आणि खजिनदार विजू मेनन यांच्या उपस्थितीत गणेशभक्त व रहिवाशांशी संवाद साधण्यात आला. खेरवाडी येथील शांतीलाल कंपाउंड श्री गणेश उत्सव मंडळात अध्यक्ष प्रवीण शेलार, सचिव सागर जयस्वाल आणि खजिनदार जीत भानुशाली यांच्या उपस्थितीत लोकसंवाद उपक्रम राबविण्यात आला.खार येथील किंग डालर गणेश उत्सव मंडळात अध्यक्ष भूपेंद्र सिंग, सचिव रवी वाघेला आणि खजिनदार विनोद सरोज यांच्या सहकार्याने नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांची माहिती देण्यात आली.

# देशनिहाय स्किल पासपोर्ट, अद्ययावत प्रशिक्षण आणि सुरक्षित भरती प्रक्रियेवर राज्य शासनाचा भर- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक रोजगाराच्या बदलत्या गरजांनुसार महाराष्ट्रातील युवक-युवतींना कौशल्य आणि भाषा प्रशिक्षण देउन आंतरराष्ट्रीय रोजगारासाठी सक्षम करण्यात येत आहे. विविध देशांची कुशल मनुष्यबळाची गरज ओळखून देशनिहाय स्किल पासपोर्ट तयार करावा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि अन्य प्रशिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम अद्ययावत करावा. तसेच महाराष्ट्रासाठी जागतिक कार्यबल गतीशिलता धोरणांतर्गत परदेशातील रोजगारासाठी सुरक्षित भरती व्यवस्था विकसित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित आंतरराष्ट्रीय कामगार गतिशीलतेवरील एकदिवसीय उच्चस्तरीय परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फार ट्रान्सफार्मेशन (मित्रा), राजशिष्टाचार विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि महाराष्ट्र एजन्सी फार होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड अडव्हान्समेंट (महिमा) यांनी संयुक्तपणे या परिषदेचे आयोजन केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जागतिक स्तरावरील बदलती लोकसंख्या आणि वाढते वृद्धत्व यामुळे कुशल मनुष्यबळाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. भारतातील युवा मनुष्यबळाची क्षमता लक्षात घेउन जागतिक मागणीशी कुशल मनुष्यबळाची प्रभावी सांगड घालावी लागेल. त्यातून सर्क्युलर मोबिलिटी ऑफ टॅलेंट ही संकल्पना अधिक सक्षम होईल आणि महाराष्ट्र या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल.



भारताने सुमारे २८ देशांसोबत कामगार गतिशीलतेसंदर्भात करार केले आहेत. या देशांमध्ये अभियांत्रिकी, आरोग्यसेवा, बांधकाम आणि विविध तांत्रिक क्षेत्रांतील कुशल मनुष्यबळाला मोठी मागणी आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या फ युचर ऑफ जाब्स रिपोर्ट २०२५नुसार २०३० पर्यंत जगभरात सुमारे १७ कोटी नवीन रोजगार निर्माण होतील, तर सुमारे ९ कोटी २० लाख रोजगार विस्थापित होण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय कार्यबल गतिशीलतेच्या क्षेत्रात पुढाकार घेईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. विविध देशांच्या मनुष्यबळ विषयक गरजांची माहिती प्रशिक्षण संस्थांपर्यंत पोहोचवण्यासाठी भरती संस्थांच्या अनुभवाचा उपयोग करावा. पारंपरिक प्रशिक्षणासह डिजिटल आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा संमिश्र वापर करावा. ऑनलाइन भाषा प्रशिक्षणासाठी निश्चित कालावधी, किमान चाचण्या तसेच डिजिटल भाषांतर आणि इंटरप्रिटेशन साधनांचा उपयोग करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. राज्य शासनाच्या धोरण मसुद्यात कौशल्य विकास, जागतिक मागणीनुसार प्रशिक्षण, भाषा प्रशिक्षण, प्रमाणपत्र, कागदपत्रांसाठी सहाय्य आणि प्रस्थानपूर्व मार्गदर्शनाला प्राधान्य दिले आहे. परदेशातून परतलेल्या कुशल मनुष्यबळाला राज्यातील उद्योगांशी जोडण्यावरही शासन भर देईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**युवक युवतींना भाषा प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार**

महाराष्ट्रातील युवक युवतींना परदेशातील रोजगार संधी सुलभ व्हाव्यात आणि भाषिक अडचणी दूर व्हाव्यात यासाठी केंद्र शासनाचा डिजिटल इंडिया भाषिणी, मित्रा आणि महिमा यांच्यात सामंजस्य करार झाला. भाषांतर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उमेदवारांना परदेशी आणि व्यवसायनिहाय भाषांचे मोफत व सुलभ प्रशिक्षण मिळणार असून, या प्रायोगिक प्रकल्पाचा औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्रनिकेतनमधील विद्यार्थ्यांना लाभ होईल.

राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, आंतरराष्ट्रीय कामगार गतिशीलता ही केवळ मनुष्यबळाच्या स्थलांतराची प्रक्रिया नसून कौशल्य, गुंतवणूक, प्रवासी भारतीय समुदाय आणि जागतिक बाजारपेठेला जोडणारी आर्थिक भागीदारी आहे. मुंबईतील परदेशी वाणिज्य दूतावासांचे नेटवर्क, उद्योग, विद्यापीठे आणि कौशल्य विकास संस्थांचा समन्वय साधून महाराष्ट्रातील प्रतिभेला जागतिक संधींशी जोडण्यात येईल. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, जागतिक रोजगारासाठी आवश्यक कौशल्य आणि भाषा प्रशिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना संबंधित देशातील स्थानिक संस्कृतीशी समरस होण्यासाठी सक्षम करण्यावर शासन भर देत आहे. परदेशात जाणारे कामगार महाराष्ट्र आणि संबंधित देशांमधील मैत्री अधिक दृढ करणारे दूत म्हणूनही भूमिका बजावतील. यावेळी जर्मनीचे वाणिज्य दूत क्रिस्टाफ हेलियर, जपानच्या सातो हितोमी, फ्रान्सचे पॅट्रीक लिवेरिनो, रशियाचे इव्हान पेटीसोव, इंग्लंडचे जान निकेली, मित्राचे उपाध्यक्ष राजेश क्षीरसागर, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, केंद्रीय कौशल्य विकास विभागाचे अपर मुख्य सचिव निरंजन कुमार सुधांशू, राष्ट्रीय कौशल्य मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुणकुमार पिलाई, आयुक्त डा. अमित सैनी, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांडे, मित्राचे सहसचिव अमन मित्तल आणि आंतरराष्ट्रीय रोजगार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# वाशिम जिल्हा होणार 'मोतीबिंदू मुक्त'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जे.एम. फायनान्शिअल फाऊंडेशनसोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :**वाशिम जिल्ह्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागातील नागरिकांना आता अत्यंत दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध होणार असून जिल्ह्याला मोतीबिंदू मुक्त करण्याच्या दिशेने राज्य शासनाने एक मोठे पाउल उचलले आहे. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत वाशिम जिल्हा प्रशासन आणि जे. एम. फायनान्शिअल फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या ऐतिहासिक करारावर वाशिम प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि जे.एम. फायनान्शियल फाउंडेशनच्या वतीने कार्यकारी संचालक पूजा दवे यांनी स्वाक्ष-या केल्या.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, गेली अनेक वर्षे आपण 'मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र' घडविण्याचे स्वप्न पाहत आहोत. प्रशासनाच्या प्रयत्नांना जेव्हा जे. एम. फायनान्शिअल फाउंडेशनसारख्या जबाबदार संस्थेची साथ मिळते, तेव्हा विकासाचे आणि सेवेचे हे प्रयत्न अनेक पटींनी वाढतात. शासनाला समांतर व्यवस्था उभी न करता, शासनाच्याच यंत्रणेला बळ देण्याचा फाउंडेशनचा विचार अत्यंत स्तुत्य आणि विचारपूर्वक आहे. या करारामुळे वाशिम जिल्ह्यालाच नव्हे, तर भविष्यात सार्वजनिक-खासगी भागीदारीतून काम करण्यासाठी संपूर्ण राज्याला एक उत्तम 'माडेल' मिळेल.



**एकही व्यक्ती नेत्रसेवेपासून वंचित राहणार नाही- निमेश कंपानी**

जे.एम. फायनान्शियल फाउंडेशनचे अध्यक्ष निमेश कंपानी यांनी यावेळी फाउंडेशनच्या उद्देशावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, आम्हाला शासनाशी स्पर्धा करायची नसून त्यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काम करायचे आहे. वाशिममधील एकही गरजू व्यक्ती दर्जेदार नेत्रसेवेपासून वंचित राहू नये, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जिल्हा प्रशासनाचे समर्पण पाहून आम्ही केवळ वाशिम जिल्ह्यावर लक्ष केंद्रित करून न येथील नेत्रसेवा अधिकाधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध आहोत. वाशिमचे जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी जिल्ह्यातील नेत्रसेवेची सध्याची स्थिती, आवश्यक उपाययोजना आणि या भागीदारीतून साध्य होणारे अपेक्षित परिणाम याविषयी माहिती दिली.

**प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये आणि गुंतवणूक:** या सामंजस्य करारामुळे वाशिम जिल्ह्यातील वाड्या-वस्त्यांवर आणि ग्रामीण भागात राहणा-या गरजू रुग्णांना दर्जेदार नेत्रतपासणी, आवश्यक शस्त्रक्रिया आणि अत्याधुनिक उपचार सुविधा सहज उपलब्ध होतील. जे. एम. फायनान्शियल फाउंडेशन २०२६ ते २०३२ या कालावधीसाठी जिल्ह्यात गुंतवणूक आणि सहकार्य करणार आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पहिल्या वर्षी फाउंडेशनतर्फे दीड कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. या कराराअंतर्गत कार्पोरेट सोशल रिस्पान्सिबिलिटीच्या माध्यमातून वाशिम जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा आधुनिक आणि सुसज्ज करण्यावर भर दिला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा, उपजिल्हा रुग्णालयांसाठी अद्ययावत वैद्यकीय उपकरणे पुरवणे, प्राथमिक आरोग्य केंद्रांचा विकास करणे आणि आपत्कालीन आरोग्य सुविधा बळकट करणे या बाबींचा समावेश असेल.या सकारात्मक आणि लोकाभिमुख करारामुळे वाशिम जिल्ह्याच्या आरोग्य क्षेत्रात एक नवी क्रांती घडणार असून हजारो रुग्णांच्या जीवनात प्रकाशाची नवी पहाट येणार आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डा. श्रीकर परदेशी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, जे. एम. फायनान्शिअल फाउंडेशनचे अध्यक्ष निमेश कंपानी, जे. एम. फायनान्शियल होम लोन्सचो व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष शेठ आणि वाशिमचे जिल्हा शल्यचिकित्सक डा. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक पुरी आदी उपस्थित होते.

# राज्यात 29 सप्टेंबरला एक हजार रोजगार मेळावे

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत २९ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एक हजार रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. या पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ महाराष्ट्र रोजगार मेळाव्यांमध्ये युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले. माहिती व जनसंपर्क विभागाच्या लोकसंवाद२०२६ अभियानांतर्गत गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगरातील विविध गणेश मंडळांमध्ये नागरिकांशी संवाद साधून रोजगार मेळावे आणि उपलब्ध रोजगाराच्या संधींबाबत माहिती देण्यात आली.मलबार हिल येथील मीनल क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रशांत जाधव, उपाध्यक्ष निंगेश कोरे, राजीव मेहता, सागर पेंढारक, आयेशा कुरेशी इतर पदाधिकारी, सदस्य व भक्तगण यावेळी उपस्थित होते. यावेळी मुंबई शहर जिल्ह्यातील रोजगार मेळाव्याबाबत कौशल्य विकास अधिकारी विद्या शिंगे, समन्वयक अजय कांबळे, तसेच माहिती व जनसंपर्क विभागाच्या विभागीय संपर्क अधिकारी संध्या गरवारे, श्रद्धा मेश्राम आणि अश्विनी पुजारी यांनी नागरिकांशी संवाद साधून रोजगार महाकुंभाची माहिती दिली.राज्यातील युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य आणि आवडीनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. प्रत्येक तालुक्यात रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून स्थानिक युवकांना विविध आस्थापना व उद्योगांमधील रोजगाराच्या संधींची माहिती मिळणार आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौद्ध, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तृतीयपंथीय तसेच इतर दुर्बल घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. मॅट्रिकोत्तर, सावित्रीबाई फुले व राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य दिले जाते. स्वाधार व शासकीय वसतिगृह योजनांतून निवास व आवश्यक सुविधा उपलब्ध होतात.

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ‘खेला होबे’चा फुटबॉल

पश्चिम बंगालच्या राजकारणात तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत संघर्षाने आता निर्णायक वळण घेतले आहे. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीनंतर पक्षातील मतभेद उघडपणे समोर आले आणि काही आठवड्यांतच त्याचे रूप संघटनात्मक फुटीत झाले. या संघर्षाचा परिणाम आता थेट निवडणूक चिन्ह आणि पक्षाच्या नावावर झाला असून, आगामी पोटनिवडणुकांमध्ये तृणमूलच्या दोन्ही गटांना स्वतंत्र ओळखीने मैदानात उतरावे लागणार आहे. १७ सप्टेंबरला निवडणूक आयोगाने अंतरिम आदेश देत दोन्ही गटांना ‘ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस’ हे नाव आणि ‘गवतफुलाची जोडी’ हे राखीव चिन्ह वापरण्यास मनाई केली. त्यानंतर १८ सप्टेंबरला आयोगाने दोन्ही गटांना अंतरिम स्वरूपात स्वतंत्र ओळख दिली. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाला ‘ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस’ हे नाव आणि ‘फुटबॉलपटू’ हे चिन्ह देण्यात आले; तर ऋतब्रत बॅनर्जी यांच्या गटाला गटाला ‘डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस’ हे नाव आणि ‘लिफाफा’ हे चिन्ह देण्यात आले. ही व्यवस्था सध्या संबंधित पोटनिवडणुकांपुरती अंतरिम आहे; तृणमूलच्या मूळ नाव आणि चिन्हावर अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. ममता बॅनर्जी यांनी हा अंतरिम निर्णय मान्य नसल्याचे स्पष्ट केले आहे. मूळ पक्षाचे नाव व चिन्ह परत मिळवण्यासाठी राजकीय तसेच कायदेशीर लढाई लढण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. १९ सप्टेंबरला त्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यामुळे तृणमूलच्या नाव-चिन्हाचा वाद आता न्यायालयीन प्रक्रियेतही गेला आहे. दरम्यान, पक्षातील फुटीची पहिली मोठी राजकीय परीक्षा प. बंगालमधील नंदीग्राम आणि रेजीनगर विधानसभा पोटनिवडणुकांमध्ये होणार आहे. दोन्ही मतदारसंघांसाठी ६ ऑक्टोबरला मतदान आणि ९ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. त्यात नंदीग्रामची निवडणूक विशेष लक्षवेधी आहे. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत येथून सुवेंदू अधिकारी विजयी झाले होते. आता या दोन्ही जागांवर तृणमूलच्या दोन गटांना स्वतंत्र नाव आणि चिन्हासह निवडणूक लढवावी लागू शकते. तथापि, ममता गटाच्या नंदीग्राममधील उमेदवाराने माघार घेतली असून, ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. मतदारांसमोर उमेदवाराबरोबरच पक्षाची नवी ओळख आणि नवे चिन्हही महत्त्वाचे ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीत ममता यांना सत्ता गमवावी लागली. त्यानंतरपासून त्यांच्यासमोरील राजकीय आव्हाने वाढत गेली. सत्तेवरून पायउतार झाल्यावर ज्यांनी वीस- पंचवीस वर्षे साथ दिली असे अनेक नेते त्यांना सोडून गेले. विधानसभा निवडणुकीत ममता यांच्या तृणमूल काँग्रेसचे ८० आमदार निवडून आले होते. पण, त्यातील ५८ आमदारांनी बंडाचा झेंडा फडकवला. बंडखोर गटाने ऋतब्रत बॅनर्जी यांची नेता म्हणून निवड केली व नंतर त्यांनी तृणमल काँग्रेस पक्षावर दावा केला. दोन गटांनी पक्षावर आपला हक्क सांगितला. भारतीय राजकारणात पक्षफुटी ही नवी घटना नाही. मात्र, अलीकडच्या काळात पक्षातील अंतर्गत संघर्ष केवळ नेतृत्व बदलण्यापुरता मर्यादित न राहता थेट पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह आणि विधिमंडळातील संख्याबळ यांच्याशी जोडला जात आहे. महाराष्ट्रातील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनंतर आता बंगालमधील तृणमूल काँग्रेसमधील संघर्षांनी या प्रश्नाला पुन्हा ऐरणीवर आणले आहे. अशा फुटींमुळे केवळ पक्षांचे राजकीय समीकरण बदलत नाही, तर मतदारांसमोरही ‘मूळ पक्ष कोणता?’ हा प्रश्न उभा राहतो. या परिस्थितीत निवडणूक आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. आयोग ही निवडणूक प्रक्रिया आणि पक्षांच्या मान्यतेशी संबंधित घटनात्मक संस्था आहे. पक्षाची नोंदणी, मान्यता आणि निवडणूक चिन्हांचे वाटप ही त्याच्या प्रमुख जबाबदाऱ्यांपैकी आहेत. मात्र, आयोगाच्या निर्णयानंतरही राजकीय वाद संपतोच असे नाही. उलट, पक्षाचा इतिहास, संघटनात्मक नियंत्रण, निवडून आलेल्या प्रतिनिधींचे समर्थन आणि पक्षाच्या रचनेवरील दावा या सगळ्यांचा प्रश्न पुढे येतो. आयोगाचा निर्णय न्यायालयीन पुनरावलोकनाच्या कक्षेबाहेर नाही. आताही तृणमूल काँग्रेसच्या प्रकरणात ममता बॅनर्जी यांच्या गटाने आयोगाच्या अंतरिम निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. पक्षफुटीमुळे जुने नाव आणि चिन्ह अचानक उपलब्ध न राहिल्यास पक्षाशी दीर्घकाळ जोडलेली मतदारांची ओळख बदलू शकते. विशेषतः स्थानिक आणि पोटनिवडणुकांमध्ये चिन्हाची ओळख महत्त्वाची ठरू शकते. पक्षफुटीच्या अशा घटनांमध्ये सर्वाधिक महत्त्वाचा घटक असतो तो मतदारांचा. एखाद्या पक्षाशी दीर्घकाळ जोडलेले नाव आणि चिन्ह अचानक बदलल्यास मतदार संभ्रमात पडू शकतात. विशेषतः ग्रामीण आणि स्थानिक पातळीवर पक्षाची ओळख ही अनेकदा चिन्हाशी जोडलेली असते. त्यामुळे नव्या नावाने आणि नव्या चिन्हाने निवडणूक लढवणे हे केवळ तांत्रिक आव्हान राहत नाही, तर संघटनात्मक ताकद आणि मतदारांशी असलेल्या संपर्काचीही परीक्षा ठरते. दुसरीकडे, फुटीनंतर दोन्ही गटांकडून मूळ पक्षाच्या वारशावर दावा केला जात असल्याने कार्यकर्त्यांची निष्ठा, स्थानिक नेतृत्व आणि बूथपातळीवरील संघटन यांनाही महत्त्व प्राप्त होते. पक्षांतील संघर्ष वाढला की निवडणूक आयोगाची संस्थात्मक भूमिका अधिक संवेदनशील बनते. अशा वेळी आयोगाच्या निर्णयांमध्ये पारदर्शक प्रक्रिया, स्पष्ट निकष आणि सर्व पक्षांसाठी समान पद्धतीचे पालन यांना विशेष महत्त्व प्राप्त होते. तृणमूलच्या बाबतीत आयोगाने सध्या घेतलेला अंतरिम निर्णय हा अंतिम निर्णय नाही. पुढील सुनावणी, दोन्ही गटांकडून सादर होणारे पुरावे आणि न्यायालयीन प्रक्रिया यानंतर या वादाचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. दरम्यान, पोटनिवडणुका मात्र दोन्ही गटांसाठी राजकीय संदेश देणाऱ्या ठरणार आहेत. नव्या नाव-चिन्हाची मतदारांमध्ये ओळख निर्माण करणे, संघटना सक्रिय ठेवणे आणि आपापल्या गटाची राजकीय ताकद दाखवणे, ही दोन्ही बाजूंची कसोटी असेल. पश्चिम बंगालच्या राजकारणात ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व, तृणमूलची संघटनात्मक ताकद आणि फुटीनंतर निर्माण झालेले नवे राजकीय समीकरण यांचा पुढील काळात परस्परांवर परिणाम होणार आहे. मात्र, या संघर्षाचा अंतिम निकाल केवळ पक्षांच्या दाव्यांतून नव्हे; तर न्यायालयीन निर्णय, निवडणूक प्रक्रियेतील नियम आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदारांच्या कौलातून स्पष्ट होईल. त्यामुळे बंगालमधील ही पक्षफूट केवळ तृणमूलचा अंतर्गत प्रश्न न राहता, भारतीय पक्षव्यवस्था आणि निवडणूक संस्थांसमोरील व्यापक प्रश्नांचीही चाचणी ठरत आहे.

# यूपीआय शुल्कवाढीचा फास

**भारतीय डिजिटल वित्तीय विश्वामध्ये क्रांती घडवून आणण्यात यूपीआयचा सिंहाचा वाटा राहिला आहे. याबाबत सरकारने देशातच नव्हे तर जगासमोर आपली पाठ थोपटून घेतली. तथापि, या अफाट लोकप्रियतेचे आणि अभूतपूर्व यशाचे मुख्य कारण आहे ते यूपीआयची ‘झीरो एमडीआर’ धोरणावर आधारित संपूर्ण मोफत सेवा. मात्र आता एनपीसीआयद्वारे दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या पर्सन–टू–मर्चंट व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर आकारण्याचा घेतलेला निर्णय या संपूर्ण डिजिटल परिसंस्थेच्या पायालाच हादरा देणारा ठरू शकतो. या यूपीआय शुल्कवाढीचा फास डिजिटल अर्थव्यवस्था मंदावण्याची तसेच रोख व्यवहार वाढवून करचोरी आणि काळय़ा पैशाचा प्रश्न वाढण्याची भीती आहे.**

भारतीय वित्तीय विश्वामध्ये क्रांती घडवून आणणारी प्रणाली म्हणून ‘युनिफाईड पेमेंट इंटरफेस’ म्हणजेच यूपीआयचे कौतुक गेल्या दशकभरामध्ये संपूर्ण देश सातत्याने ऐकत आहे. यूपीआयमुळे वित्तीय व्यवहारांमध्ये गतिमानता आली हे वास्तव नाकारता येणार नाही. २०१६ मध्ये लाँच झाल्यापासून गेल्या १० वर्षांमध्ये अगदी महानगरांपासून ते दूरवरच्या ग्रामीण भागातील लहान-मोठय़ा विक्रेत्यांपर्यंत डिजिटल व्यवहारांचे जाळे पसरवण्यात यूपीआयचा वाटा सिंहाचा राहिला आहे. या अफाट लोकप्रियतेचे आणि अभूतपूर्व यशाचे सर्वात मुख्य मूळ कारण म्हणजे ‘झीरो एमडीआर’ धोरणावर आधारित संपूर्ण मोफत सेवा. कोणत्याही अतिरिक्त शुल्काविना अविरत चालणाऱ्या या डिजिटल सुविधेमुळे रोख रकमांवर आधारित अर्थव्यवस्था वेगाने कॅशलेस स्वरूपाकडे वळली. मात्र आता नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाद्वारे २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या पर्सन-टू-मर्चंट व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर आकारण्याचा घेतलेला निर्णय या संपूर्ण डिजिटल परिसंस्थेच्या पायालाच हादरा देणारा ठरू शकतो.

भारतातील बहुतांश किरकोळ व्यापारी, व्यापारी संघटना आणि सूक्ष्म व्यावसायिक अत्यंत कमी नफ्याच्या मार्जिनवर काम करतात. अमेरिका किंवा युरोपसारख्या प्रगत देशांमध्ये व्यापा-यांचे नफ्याचे प्रमाण २५ ते ३५ टक्क्यांपर्यंत असते; त्यामुळे तिथे १ ते २ टक्क्यांचा एमडीआर सोसणे व्यापा-यांना शक्य होते. याउलट, भारतीय व्यापा-यांचे नफ्याचे प्रमाण हे केवळ ८ ते १० टक्क्यांच्या आसपास किंवा त्याहूनही कमी असते. अशा स्थितीत २,००० रुपयांवरील व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर देणे व्यापा-यांच्या थेट नफ्यावर गदा आणणारे ठरते. उदाहरणार्थ, जर एखाद्या ग्राहकाने ५,००० रुपयांची खरेदी केली, तर व्यापा-याला त्यावर २० रुपये शुल्क भरावे लागेल. १ लाख रुपयांची उलाढाल पार करणा-या मध्यम व्यापा-यांसाठी हे शुल्क महिन्याकाठी मोठा आर्थिक भार ठरते. या शुल्काच्या भीतीपोटी व्यापारी एकतर २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेचे यूपीआय पेमेंट स्वीकारणे बंद करतील किंवा ग्राहकांना रोखीने व्यवहार करण्याचा आग्रह धरतील.




यूपीआयवर लादले जाणारे हे शुल्क केवळ मर्चंट म्हणजे व्यापा-यांवर असेल आणि ग्राहकांसाठी यूपीआय पूर्णपणे मोफत राहील असा दावा केला असला, तर तो आर्थिक सिद्धांताच्या दृष्टीने निव्वळ भ्रम आहे. अर्थशास्त्रात शुल्काचे हस्तांतरण (इन्सिडेन्स ऑफ टॅक्सेशन / फी) असे एक तत्त्व आहे. त्यानुसार जेव्हा सरकार एखाद्या उत्पादकावर, व्यापा-यावर किंवा सेवा पुरवठादारावर कोणताही नवीन कर किंवा प्रक्रिया शुल्क (उदा. एमडीआर किंवा उत्पादन शुल्क) लादते, तेव्हा तो व्यापारी हे शुल्क स्वतच्या खिशातून देत नाही. व्यापारी या खर्चाचा समावेश वस्तू किंवा सेवेच्या अंतिम विक्री किंमतीत करतो. अशा प्रकारे, कराचा किंवा शुल्काचा हा भार पुढे ढकलून तो शेवटी खरेदीदाराच्या माथीच मारला जातो. इंधनावरील अबकारी कराचे गणित याचे उत्तम उदाहरण आहे. सरकार हा कर थेट तेल कंपन्यांवर लावते, परंतु कंपन्या तो खर्च पेट्रोल आणि डिझेलच्या किरकोळ किमती वाढवून सर्वसामान्य नागरिकांकडूनच वसूल करतात. यूपीआयच्या बाबतीतही हेच घडण्याची दाट शक्यता आहे.

जागतिक स्तरावर व्हिसा आणि मास्टर कार्ड या दोन अमेरिकन बलाढय़ कंपन्यांचे डिजिटल कार्ड व्यवहारांमध्ये एकाधिकारशाही किंवा दुहेरी मत्तेदारी राहिलेली आहे. या कंपन्या व्यापा-यांकडून १.५ ते ३ टक्क्यांपर्यंत प्रचंड एमडीआर वसूल करून अब्जावधींचा नफा कमावत होत्या. भारतात २०१६ मध्ये यूपीआयच्या आगमनाने आणि त्याच्या ‘झीरो एमडीआर’ धोरणामुळे या अमेरिकन कंपन्यांच्या व्यवसायाला मोठा हादरा बसला. भारतीय बाजारपेठेत यूपीआयने मिळवलेले वर्चस्व आणि आता भारत सरकारकडून सिंगापूर, फ्रान्स, यूएई, मॉरिशस आणि श्रीलंके सारख्या देशांमध्ये यूपीआयचा केला जाणारा विस्तार यामुळे व्हिसा आणि मास्टर कार्डच्या जागतिक मत्तेदारीलाच थेट आव्हान निर्माण झाले आहे.

युनायटेड स्टेटस् ट्रेड रिप्रेझेंटेटिव्हच्या अहवालातही भारताच्या या मोफत धोरणावर आक्षेप नोंदवण्यात आला होता. प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन कंपन्यांना समान संधी देण्याच्या उद्देशाने आणि दबावाला बळी पडत भारताने हे मोफत धोरण गुंडाळल्याची टीका होत असून त्यात तथ्य आहे, असे मानण्यास जागा आहे.

### पुन्हा रोखीकडे

जुलै महिन्यामध्ये यूपीआयवर २,३६६ कोटी रुपयांचे व्यवहार झाले होते, तर ऑगस्टमध्ये व्यवहार संख्या २,४५१ कोटींवर गेली. म्हणजे एका महिन्यात सुमारे ८५ कोटी व्यवहार वाढले. यूपीआयचा वापर किती झपाटय़ाने वाढत आहे हे यावरून दिसून येते. नुकत्याच पार पडलेल्या ब्रिक्स परिषदेमध्ये भारताने आपल्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा जो डंका वाजवला त्यामध्ये यूपीआय केंद्रस्थानी होते. यूपीआयची अफाट यशोगाथा ही सदर प्रणाली वापरण्यास अत्यंत सोपी आणि पूर्णपणे निःशुल्क होती म्हणूनच शक्य झाली. अचानक एमडीआरसारख्या शुल्काची कु-हाड चालवून सरकारने आपल्याच यशाच्या मुळावर घाव घातला आहे. यामुळे लहान आणि मध्यम व्यापा-यांमध्ये असंतोष पसरून ते पुन्हा एकदा समांतर अशा रोख अर्थव्यवस्थेकडे वळण्याची चिन्हे आहेत.

ऑनलाईन बँकिंगच्या सुरुवातीच्या काळात एका खात्यातून दुस-या खात्यात पैसे पाठविण्यासाठी एनईएफटी आणि आरटीजीएसच्या काही व्यवहारांवर शुल्क आकारले जात होते. व्यवहारावरील अशा खर्चामुळे डिजिटल माध्यमांचा सरसकट वापर करण्यास ग्राहकांना प्रोत्साहन मिळत नव्हते. पुढे डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी या शुल्काचा भार टप्प्याटप्प्याने कमी करण्यात आला. रिझर्व्ह बँकेने १ जुलै २०१९ पासून एनईएफटी आणि आरटीजीएस व्यवहारांसाठी बँकांकडून घेतले जाणारे प्रक्रिया शुल्क रद्द केले; त्यानंतर १ जानेवारी २०२० पासून बचत खातेदारांच्या ऑनलाईन एनईएफटी व्यवहारांवर शुल्क न आकारण्याचे निर्देश बँकांना देण्यात आले.

यूपीआयवरील शुल्क आकारणी मुळे अनौपचारिक रोख व्यवहार वाढून करचोरी आणि काळ्या पैशाचा प्रश्न पुन्हा डोके वर काढू शकतो. विशेष म्हणजे याला लगाम घालण्यासाठीच डिजिटल इंडियाचा नारा दिला गेला होता. त्यामुळे, महसूल वाढवण्याच्या किंवा आंतरराष्ट्रीय दबावाला सामोरे जाण्याच्या घाईत घेतलेला हा निर्णय ‘झीरो एमडीआर’च्या मूळ संकल्पनेला हरताळ फासणारा ठरत आहे.

या शुल्क आकारणीचा फेरविचार झाला नाही, तर भारताला डिजिटल क्रांतीला शिखरावर नेणारी यूपीआय यंत्रणा स्वतच्याच शुल्कपाशात अडकून मंदावण्याची भीती आहे.

**सीए संतोष घारे**

## पोटनिवडणुकीतील नाट्यमय घडामोडी!

पश्चिम बंगालमधील नंदिग्राम आणि रेजीनगर या दोन विधानसभा मतदारसंघात ६ ऑक्टोबर रोजी पोटनिवडणूक होणार असून मतमोजणी ९ ऑक्टोबर रोजी होईल, अशी घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. ही पोटनिवडणूक मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी आणि आम जनता उन्नयन पक्षाचे प्रमुख हुमायून कबीर यांनी आपल्या एका जागेचा राजीनामा दिल्याने होत आहे. सुवेंदू अधिकारी यांनी २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत नंदिग्राम आणि भवानीपूर या दोन्ही जागांवर विजय मिळवला होता. त्यांनी भवानीपूरची जागा राखून नंदिग्रामच्या जागेचा राजीनामा दिला. अधिकारी यांनी २०२१ आणि २०२६ अशा दोन्ही वेळा नंदिग्राममधून माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता. दुसरीकडे हुमायून कबीर यांनी रेजीनगर आणि नोवडा या दोन मतदारसंघातून विजय मिळवला होता. त्यांनी नोवडाची जागा राखून रेजीनगरचा राजीनामा दिल्याने तिथे पोटनिवडणूक लागत आहे. नंदिग्राममध्ये सत्ताधारी भाजपने विक्रमी मताधिक्याने विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. तर रेजीनगरमध्ये मुस्लिम मतांचे विभाजन होऊन भाजपला फायदा मिळण्याची शक्यता राजकीय निरीक्षक वर्तवत आहेत. या दोन्ही जागांसाठी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ११ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होईल.

**अभय गोखले**

**माझेही मत**

## इच्छाशक्तीचा श्री गणेशा

या वर्षी फ्रेंच ओपन जिंकल्यानंतर अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धा जिंकून टेनिस खेळाडू अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांनी जीवनातील मोठे यश मिळवले. वयाच्या चौथ्या वर्षी टाईप-१ मधुमेहाचे निदान झाले, तरी त्यांनी आजाराला स्वप्नांच्या आड येऊ दिले नाही. पराभव आणि अनेक अपयशांनंतरही ते पुन्हा उभे राहिले. महाराष्ट्रातील माऊली अडकुर हिलाही जन्मापासून दोन्ही हात नाहीत; तरी कला, शिक्षण आणि नोकरीत प्रगती करत ती आज मुंबई महानगरपालिकेत अधिकारी आहे. या दोघांनी साधनांपेक्षा ध्येय आणि इच्छाशक्ती महत्त्वाची असल्याचे दाखवून दिले. आज मात्र प्रेमभंग, परीक्षेतील अपयश किंवा किरकोळ नकारामुळे तरुण खचताना दिसतात. नैराश्य हा आजार आहे, कमकुवतपणा नव्हे. मानसिक अडचणींशी झुंजणाऱ्यांना केवळ ‘खंबीर व्हा’ असे सांगण्याऐवजी त्यांना आधार आणि आवश्यक मदत देणे गरजेचे आहे.

शक्ती आणि चांगली बुद्धी मिळवण्यासाठी प्रतिदिन श्री गणेशाचे पूजन करणे अत्यंत गरजेचे आहे. श्री गणेश मनुष्याच्या बुद्धीमध्ये विवेक निर्माण करणारा आहे. श्रीगणेश विसर्जन आपल्याला सोडून देण्याची आणि नव्याने उभे राहण्याची शिकवण देते. ‘पुढच्या वर्षी लवकर या’ हा निरोप शेवट नसून नव्या सुरुवातीचे आमंत्रण आहे.

**लीना गाडगीळ**

## अमेरिकेचे मनसुबे

भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध हे चर्चेचे आणि तितकेच गुंतागुंतीचे झाले आहेत दोन्ही देशातील धोरणात्मक भागीदारी एका बाजूला दृढ होत असतानाच दुसरीकडे व्यापारातील मतभेद आणि टॅरिफ वॉर म्हणजे आयात शुल्काचे युद्ध दोन्ही देशांमधील संबंधांना वरचेवर अडचणीत आणत आहे. सद्या अनिश्चिततेचे वारे असताना अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाने मंजूर केलेले नवीन विधेयक दोन्ही देशांच्या संबंधांमधील आणखी तणाव वाढविणारे ठरले आहे. रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या देशांवर शंभर टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लादण्याचे अधिकार अमेरिकेच्या अध्यक्षांना बहाल करणारे हे विधेयक भारतासारख्या प्रगतिशील अर्थव्यवस्थेसाठी गंभीर इशारा आहे. या संपूर्ण घडामोडीत भारताचे परराष्ट्र धोरण, देशाची ऊर्जा, सुरक्षा आणि अमेरिकेचे दबावतंत्र या मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे ‘लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट २०२६’ या नवीन विधेयकावर स्वाक्षरी करून त्याचे कायद्यात रूपांतर केले आहे, ज्यामुळे रशियाकडून मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल खरेदी करणाऱ्या भारत आणि चीनसारख्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क अर्थात टॅरिफ लादण्याचा अधिकार अमेरिकेला मिळाला आहे ट्रम्प टॅरिफच्या आडून जागतिक पटलावर वर्चस्ववादातून राजकारण करत असल्याचे यातून स्पष्ट होत आहे हे त्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील मनसुबे उधळून लावणे हेच त्यांना प्रतिउत्तर ठरेल.

**राजू जाधव**

## शेतकरी उपाशी आणि बैठकीत सुक्या मेव्याची मेजवानी!

एकीकडे राज्याच्या ५० टक्के भागात दुष्काळाचे सावट आहे, पाणी टंचाई आहे, अल निनोमुळे पीक करपले आहे आणि शेतकऱ्यांचे अर्थचक्र बिघडले आहे, तर दुसरीकडे प्रशासकीय बैठकांमध्ये काजू-बदामाची मेजवानी होत असल्याने संताप व्यक्त होत आहे. राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे हे कोरडा दुष्काळ पाहणी दौऱ्यावर मराठवाड्यात असताना नांदेडमधील प्रशासकीय बैठकीत मंत्री, आमदार, खासदारांनी अधिकाऱ्यांनी आणलेल्या काजू-बदामावर ताव मारल्याचा व्हिडिओ समोर आला. यामुळे टीकेची झोड उठली आहे. या घटनेनंतर सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी ‘अधिकाऱ्यांमुळे आम्ही बदनाम होतो’ असा संताप व्यक्त केला. मात्र अनेक बैठकींमध्ये सुकामेवा ठेवण्याची पद्धतच आहे आणि त्याची मागणी लोकप्रतिनिधींकडूनच होते, असा आरोप होत आहे. चूक झाल्यावर त्याचे खापर केवळ अधिकाऱ्यांवर फोडणे योग्य नाही, अशी चर्चा आहे.

आज शेतकरी, शेतमजूर यांचे हाल आहेत. महागाई आभाळाला भिडली आहे, बेरोजगारी गंभीर आहे. अशा वेळी लोकप्रतिनिधींनी संवेदनशीलता दाखवणे अपेक्षित आहे. काजू-बदाम पिकवणारा शेतकरीच तो खाऊ शकत नाही, कारण त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. एकीकडे शेतकऱ्याकडे जमीन असूनही तो आर्थिकदृष्ट्या अडचणीत आहे आणि दुसरीकडे पाच वर्षांसाठी निवडून आलेला लोकप्रतिनिधी सर्व सोयी-सुविधा मिळवतो, हे चित्र दुर्दैवी आहे. मुख्यमंत्री म्हणाले की बैठकांमध्ये प्रशासन ड्रायफ्रूट आणून ठेवते. पण सरकारने ही पद्धतच बंद करायला हवी. जनतेच्या पैशातून होणारा हा खर्च टाळला तर राज्याचा खर्च वाचेल आणि शेतकऱ्यांप्रती माणुसकी दिसेल. सुका मेवा खाण्यास कोणाची मनाई नाही, पण तो स्वतःच्या पैशाने खावा, जनतेच्या पैशातून नको. दुष्काळाच्या बैठकीत चटणी-भाकर ठेवून शेतकऱ्याचा सन्मान करावा, हीच अपेक्षा आहे.

**रमेश लांजेवार,**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

## दुष्काळाच्या बैठकीत काजू-बदाम आणि त्यावरून सुरू झालेले राजकारण

आज राज्यात एकीकडे महागाईच्या वाढत्या आलेखा मुळे सर्वसामान्य माणूस कसा बसा सण साजरा करत आहे, तर दुसरीकडे विविध आंदोलने, दुष्काळसदृश परिस्थिती आणि इतर मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये दावे-प्रतिदाव्यांचे घमासान सुरू आहे. त्यातच आता मराठवा ड्यातील आढावा बैठकीतील काजू-बदामावरून नवे महाभारत सुरू झाले आहे.

वरुणराजाने ऐन मोसमात पाठ फिरवल्यामुळे बळीराजाने भरवशावर केलेली पेरणी वाया गेली आहे. अतिवृष्टीने आधीच गांजलेल्या शेतकऱ्याचे हातचे खरीप पीक जळून गेले असून त्याची स्थिती ‘दुष्काळात तेरावा महिना’ अशी झाली आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड येथे दुष्काळाचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. पण बैठकीतील एका व्हिडिओमध्ये खासदार काजू-बदाम खाताना दिसल्याने मूळ प्रश्न बाजूला राहिला आणि नाश्त्याच्या प्लेटवर चर्चा सुरू झाली. या बैठकीनंतर विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. विधान परिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी सरकार शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत असल्याचे म्हटले आहे, तर इतर नेत्यांनी तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची आणि विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे.

खरे तर शासकीय बैठकांना अल्पोपहार ठेवणे ही सामान्य प्रशासकीय बाब आहे. मात्र कालची बैठक दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत कशी द्यायची या संवेदनशील विषयावर होती. अशा वेळी सुकामेवा ठेवणे हे अयोग्यच होते. सामा जिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी अधिकाऱ्यांना दोष दिला असला तरी, ज्यांनी तो खाल्ला त्यांनाही पूर्णपणे निर्दोष म्हणता येणार नाही.

**माझेही मत**

खासदार संजय जाधव यांनी ‘दुष्काळ पडला म्हणून कोणी जेवण सोडतो का? ५०-१०० रुपयांचा सुकामेवा खाल्ला तर बिघडले कोठे?’ असे वक्तव्य केले, तेही या परिस्थितीत योग्य नव्हते.

आज ५०-१०० रुपयांत सुकामेवा मिळत नाही आणि अशा नाजूक परिस्थितीत संवेदनशील ता दाखवणे अपेक्षित असते. दुसरीकडे अकोला येथील बैठकीत अधिकारी मोबाईलमध्ये व्यस्त असल्याचे आणि झोपा काढत असल्याचे व्हिडिओ समोर आले, हेही असंवेदनशीलतेचेच दर्शन आहे. दत्तात्रय भरणे यांनी हिंगोलीत जमिनीवर बसून बेसन-भाकरी खाऊन सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. शेतकरी कर्जमाफी आणि नुकसान भरपाई हे प्रश्न आता नित्याचेच झाले आहेत. कोणाचेही सरकार असले तरी शेतकऱ्यांना १०० टक्के मदत मिळत नाही, हे वास्तव आहे. त्यामुळे या प्रश्नावर राजकारण टाळायला हवे. विरोधकांचे काम सरकारच्या चुका दाखवणे हेच आहे, पण केवळ काजू-बदामासारख्या मुद्द्यावरून मूळ प्रश्न - पंचनामे कधी होणार, पीकविमा आणि मदत कधी मिळणार, पाणीटंचाईवर उपाय काय - हे प्रश्न मागे पडू नयेत, याची काळजी घ्यायला हवी. थोडक्यात, दुष्काळ हे मानवनिर्मित नव्हे तर नैसर्गिक संकट आहे. सरकारने नुकतीच कर्जमाफीची घोषणा केली आहे. अशा वेळी सत्ताधाऱ्यांनी आपल्या वागण्या-बोलण्यातून सरकारची बदनामी होणार नाही याची काळजी घ्यावी आणि विरोधकांनीही केवळ राजकारण करण्याऐवजी शेतकऱ्यांना मदत कशी मिळेल याकडे लक्ष द्यावे.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक
८७६७५९२९८०

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शेतकऱ्यांची 21 वर्षा पासून प्रतीक्षा,वाढीव मोबदल्यासाठी दांपत्याची फरफट..!

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या मतदारसंघातील शेतकऱ्यांना न्याय कधी?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**नेर, दि. २१ :** न्यायालयाचा आदेश, शासनस्तरावरील निवेदने आणि लोकप्रतिनिधींच्या शिफारशींचा पत्रव्यवहार होऊनही वाढीव भूसंपादन मोबदल्यापासून शेतकरी वंचित राहत असल्याचा प्रकार नेर तालुक्यात समोर आला आहे.

मौजा वाळकी (लघुसिंचन) येथील शेतजमिनीच्या वाढीव मोबदल्यासाठी संबंधित शेतकरी दांपत्याने सन २०१२ पासून शासनदरबारी पाठपुरावा सुरू ठेवला आहे. मात्र, न्यायालयीन आदेश होऊनही अद्याप मोबदला मिळाला नसल्याने मृद व जलसंधारण विभागाच्या कार्यवाहीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत असून त्याच खात्याचे मंत्री व यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देणार का? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहे. मौजा वाळकी, ता. नेर, जि. यवतमाळ येथील सर्व्हे क्र. ३५/२ व २९ ही शेती सन २००५ मध्ये लघु प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात आली. वाढीव मोबदल्यासाठी दाखल LAC क्र. ९२०/२०१२ व ९२२/२०१२ या प्रकरणांत मा. न्यायालयाने ८ ऑगस्ट २०१८ रोजी EXH क्र. २९ व ३२ अन्वये वाढीव मोबदला देण्याचे आदेश दिल्याचे अर्जांमध्ये नमूद आहे. तथापि, आदेशाच्या अंमलबजावणीबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याची तक्रार आहे. या प्रश्नावर २८ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. त्याच्या प्रती व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर, तसेच संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. यापूर्वी मुख्यमंत्री यांच्याकडे केलेल्या निवेदनावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १ मे २०२६ रोजी नियमोचित कार्यवाही व सहकार्य करण्याची विनंती केली होती. त्यानंतरही मोबदला मिळाला नसल्याचा दावा करण्यात येत आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने २६ एप्रिल २०२६ रोजी उपमुख्यमंत्री यांच्याकडे, तसेच माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी १२ सप्टेंबर २०२६ रोजी मृद व जलसंधारण विभागाच्या सचिवांकडे याच विषयासंदर्भात कार्यवाहीची मागणी केल्याचे कागदपत्रांतून दिसून येते. पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या नेर मतदारसंघातील शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी विभागीय अधिकाऱ्यांना जाब विचारला जाणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी, विलंबाची कारणे आणि मोबदला वितरणाची निश्चित मुदत याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी. अन्यथा शेतकरी व सामाजिक संघटनांकडून आंदोलन करून हा प्रश्न मंत्रालयापर्यंत नेण्याचा इशारा दिला जाण्याची शक्यता आहे

क्रमशः

# घंटागाड्या बंद,कचरा स्वच्छता कारभारावर प्रश्नचिन्ह..!

## ठेकेदारावर वचक कुणाचा? यवतमाळ नगर परिषदेचा स्वच्छता कारभार कचऱ्यात!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. २१ :** शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी असलेल्या यवतमाळ नगर परिषदेच्या स्वच्छता कारभाराचा बोजवारा उडाल्याचे चित्र शहरातील विविध भागांत दिसून येत आहे. अनेक ठिकाणी घंटागाड्या नियमित पोहोचत नसल्याने घरगुती कचरा रस्त्यावर पडत असून, कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

घनकचरा व्यवस्थापनाचा ठेका देऊनही स्वच्छता व्यवस्था सुरळीत होत नसेल, तर प्रशासनाचा नेमका वचक कुणावर आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. नगर परिषदेत स्वच्छतेबाबत बैठका आणि सूचना दिल्या जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्ष शहरातील परिस्थिती कायम असल्याने या बैठका केवळ कागदोपत्रीच सुरू आहेत का, असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. घंटागाड्यांच्या फेऱ्या, कचरा संकलनाचे नियोजन आणि ठेकेदाराच्या कामावर नियंत्रण ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप होत आहे. नागरिकांच्या तक्रारींमुळे नगरसेवक यांच्यावरही दबाव वाढला आहे. ठेकेदाराकडे वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. प्रशासनाकडे दाद मागूनही प्रश्न सुटत नसेल, तर लोकप्रतिनिधींनी न्यायासाठी कुणाकडे जावे, असा सवाल उपस्थित होत आहे. कचऱ्याचे ढीग आरोग्यसंकटात बदलण्यापूर्वी नगर परिषद प्रशासनाने तातडीने मैदानात उतरून पाहणी करावी. घंटागाड्यांचे वेळापत्रक लागू करावे, कंत्राटदाराच्या कामाची तपासणी करून हलगर्जी पणाची जबाबदारी निश्चित करावी आणि विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा नागरिकांकडून देण्यात येत आहे.

## थोडक्यात



### ऑल इंडिया बंजारा सेवा संघाच्या तालुका अध्यक्ष पदी संजय आडे

**घाटंजी :** येथील सामाजिक कार्यकर्ते संजय नामदेवराव आडे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत ऑल इंडिया बंजारा सेवा संघाच्या घाटंजी तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली असूनयवतमाळ येथे जिल्हास्तरीय चर्चा सत्र या कार्यक्रमात राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. टी. सी. राठोड यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.सदर संघटना स्व. वसंतरावजी नाईक यांच्या संकल्पनेतून १९५३ साली स्थापन करण्यात आली होती. ७४ वर्षांपासून समाजाच्या न्याय हक्कासाठी ही संघटना अविरत काम करीत आहे. सदर संघटना जवळपास २७ राज्यामध्ये काम करीत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.टी. सी.राठोड (राष्ट्रीय अध्यक्ष - ऑल इंडिया बंजारा सेवा संघ) बाबूराव राठोड (प्रदेशाध्यक्ष, ऑल इंडिया बंजारा सेवा संघ, महाराष्ट्र), एन टी.जाधव (राष्ट्रीय कोषाध्यक्ष)एड.जगदीश पवार (राष्ट्रीय महासचिव), डी.एस.चव्हाण (जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया बंजारा सेवा संघ),डॉ.बंडू चव्हाण महागाव, डॉ.वर्षा चव्हाण, पूजा राठोड (महिला जिल्हाधक्ष) राहुल ठाकुरदास चव्हाण (जिल्हाध्यक्ष युवाविंग) व शेकडो पदाधिकारी समाज बांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन संतोष पवार यांनी केले तर आभार अनिता पवार यांनी मानले.संजय आडे यांच्या निवडीने तालुक्यात संघटना अधिक मजबूत होईल आणि संघटनेच्या माध्यमातून समाजहित नक्कीच जपल्या जातील असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

### ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी काँग्रेसचे आज निवेदन

**ऊसाला प्रती टन ४ हजार रुपये एक रकमी उचल देण्यात यावी या मागणीसाठी निवेदन**

**महागाव :** जिल्हा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली अध्यक्ष सचिन नाईक यांच्या उपस्थितीत मंगळवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी गुंज साखर कारखाना येथे यावर्षीच्या उसाचा भाव तात्काळ जाहीर करावा तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाची एक रकमी उचल प्रतिटन चार हजार रुपये देण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन नाईक,, महागाव तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुनील राठोड, शहर काँग्रेसचे अध्यक्ष शैलेश कोपरकर, महिला काँग्रेसच्या अध्यक्षा जयश्री नरवाडे, इम्रान पठाण अध्यक्ष उमरखेड महागाव विधानसभा, महेंद्र कावळे अध्यक्ष यवतमाळ जिल्हा अनुसूचित जाती विभाग, यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात येणार आहे. करीता जिल्हा व तालुका काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी सदस्य व काँग्रेस पक्षाच्या विचारधारेशी सहमत असणाऱ्या मान्यवरांनी तसेच तालुक्यातील जास्तीत जास्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या न्याय हक्कासाठी आवाज बुलंद करावा आणि दिनांक २२ सप्टेंबर रोज मंगळवारी सकाळी ११ वाजता गुंज साखर कारखाना साईडवर निवेदन देण्यासाठी लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे महागाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील राठोड यांनी केले आहे.

### शेंबाळपिंपरी महसूल मंडळात सरसकट कर्ज माफी व तात्काळ आर्थिक मदत द्या..!

**शेतकऱ्यांची निवेदनाव्दारे मागणी**



**पुसद:**तालुक्यातील शेंबाळ पिंपरी महसुल मंडळातील हिवळणी (पा.), आमदरी,धानोरा,जगापुर, गौळ (खु), देवगव्हाण,तसेच शेंबाळ पिपरी येथील शेकडो हेक्टर जमिनीवरील हाती आलेले सोयाबीन पावसाळ्यातील समाधानकारक पाऊस न पडल्यामुळे पावसा आभावी पिक वाळुन गेले आहे.त्यामुळे हातबल झालेल्या परिसरातील शेकडो शेतकऱ्यांचे दि.१५ सप्टेंबर २०२६ रोजी तहसिलदार पुसद यांना निवेदनाद्वारे आपली कैफियत मांडली आहे की या वर्षी पावसाळ्यात पावसाचा आविरत खंड पडल्यामुळे चालू खरीप हंगामात शेतकऱ्यांचे कापुस, सोयाबीन,ज्वारी, उडीद, मूग हे पिक वाळुन गेले त्यामुळे शेतकरी कर्ज काढुन लावलेले पैसे कसे निघेल या चिंतेत आहे, तसेच पुढे निवेदनात म्हटले आहे की गेल्या वर्षीचा विमा मिळाला नाही, बँकेचे थकबाकीदार असुन फक्त बँकेने केलेल्या नव्या जुन्या पुनर्गठन झालेल्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले नाही फसवी कर्जमाफी मुळे शेतकरी आणखी कर्जाच्या बोज्यात दबला आहे, त्यामुळे तात्काळ सरसगट नुकसान भरपाई मिळावी या मागण्यांचे निवेदन तहसिलदार रेखा वाणी यांच्यामार्फत उपविभागीय अधिकारी यांना शेतकरी नेते लक्ष्मण मनवर हिवळनी (पालमपट) हयानी तालुक्यातील शेकडो शेतकर्याना सह्या घेऊन निवेदन सादर केले आहे. या निवेदनावर, उत्तम मनवर, दिलीप पातोडे,चंद्रभान मनवर सह अनेक शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

# किशोर पिपलवा मृत्यू प्रकरणी नोटिशीपलीकडे कारवाई कधी?

## नगरपरिषद प्रशासनाच्या जबाबदारीवर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २१ :** पांढरकवडा शहरात मोकाट गाढवांच्या हल्ल्यात किशोर बालमुकुंद पिपलवा यांचा मृत्यू झाल्यानंतर नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

१८ सप्टेंबर रोजी गोपालकृष्ण मंदिर परिसरात झालेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या पिपलवा यांचा १९ सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर युवा टायगर फोर्स आणि ब्राह्मण समाज बहुउद्देशीय संस्थेने प्रशासनाच्या निष्काळजीपणाची निष्पक्ष चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे. नगरपरिषद प्रशासनाने १५ सप्टेंबर रोजी मोकाट जनावरे पकडून कोंडवाड्यात जमा करण्याचे निर्देश दिल्याचे २१ सप्टेंबरच्या कंत्राटदाराला बजावलेल्या नोटिशीत नमूद आहे. मात्र, आदेशानंतर अवघ्या काही दिवसांत हल्ला होऊन नागरिकाचा जीव गेला. त्यामुळे आदेशाची अंमलबजावणी झाली का, कंत्राटदाराने कर्तव्य पार पाडले का आणि अधिकाऱ्यांनी देखरेख केली का, याचा तपास होणे गरजेचे आहे.



कोंडवाडा कंत्राटदार पंकज रामदास डाकूर यांना २४ तासांत खुलासा सादर करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. मात्र, नागरिकाचा मृत्यू झाल्यानंतर केवळ नोटीस देऊन प्रशासनाची जबाबदारी संपते का? असा बोचरा सवाल युवा टायगर फोर्सने उपस्थित केला आहे. निष्काळजीपणा किंवा कर्तव्यच्युती सिद्ध झाल्यास संबंधितांवर कायद्यानुसार फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी आहे. BNS कलम १०६(१) व २९१च्या अनुषंगाने तपास, घटनास्थळ पंचनामा, CCTV फुटेज, वैद्यकीय कागदपत्रे, पोस्टमॉर्टेम अहवाल, तक्रार नोंदी व कोंडवाडा नोंदवही तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. FIR नोंदवली नाही तर कायदेशीर मार्गाने वरिष्ठ पोलिस अधिकारी व न्यायालयाकडे दाद मागण्याचा इशाराही देण्यात आला आहे. पिपलवा यांच्या पश्चात दोन अविवाहित पाल्यांचे पितृछत्र हरपले असून, कुटुंबाला तातडीची मदत व १ कोटी नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. कंत्राटदाराची गंभीर कसूर सिद्ध झाल्यास कंत्राट रद्द करून काळ्या यादीत टाकावे, तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची भूमिका तपासावी, अशी मागणी आहे. युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार यांनी २६ सप्टेंबर रोजी मुख्याधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. कारवाई न झाल्यास नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्याचेही सांगण्यात आले. संयोजक अंकित नैताम व ब्राह्मण समाज संस्थेचे अध्यक्ष नटवर शर्मा यांनी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी केली आहे.

# वाकी परिसरात वादळीवारांचा तडाखा..! बहरलेली पिके जमीनदोस्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ , दि. २१ :** तालुक्यातील शेवटच्या टोकाला असलेला आणि घाटंजी तालुक्याला लागून असलेला गाव वाकी, परिसरात रविवारी सायंकाळच्या सुमारास अचानक आलेल्या वादळीवारासह जोरदार पावसाने शेतकऱ्यांच्या बहरलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. डोळ्यांसमोर उभी पिके आडवी होताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली असून, ऐन हंगामात निसर्गाने घातलेल्या या घावामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

यंदा पावसाने साथ दिल्याने परिसरातील अनेक शेतांमध्ये पिकांची चांगली वाढ झाली होती. पिके बहरात आल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. मात्र, रविवारी अचानक आलेल्या जोरदार वादळी वाऱ्याने काही वेळातच परिस्थिती बदलली. शेतातील उभी पिके वाऱ्याच्या तडाख्याने जमीनदोस्त झाली. त्यामुळे आगामी उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पेरणीपासून पिकांची निगा राखण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला होता. खत, बियाणे, औषध फवारणी, मशागत तसेच मजुरीवर खर्च करून पीक बहरात आणले होते. मात्र, वादळामुळे पिकांचे नुकसान झाल्याने केलेला खर्चही वसूल होईल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे वादळामुळे नुकसान झालेल्या शेतांची कृषी व महसूल विभागाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. नुकसानग्रस्त पिकांचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून शासनाने पात्र शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.नैसर्गिक आपत्तीमुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना या नुकसानीचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे प्रशासनाने विलंब न करता नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून आर्थिक मदत मिळावी अशी परिसरातील शेतकऱ्यातून मागणी जोर धरत आहे.

# श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रमांतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने देशात विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्यातीलच गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्रीगणेशा आरोग्याचा हा महत्वाचा उपक्रम असून त्यानिमित्ताने काल दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त "श्रीगणेशा आरोग्याचा" या उपक्रमांतर्गत पार्डी सर्कलमधील कुऱ्हाड व घोटी बूथवर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये विविध आजारांचे निदान करून अनेक नागरिकांनी तपासणी व औषधोपचाराचा लाभ घेतला.आ.प्रा.राजु तोडसाम यांच्या मार्गदर्शनात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. महेश चव्हाण(अस्थीरोग तज्ञ् )डॉ. भोसीकर (तालुका आरोग्य अधिकारी), डॉ. शेख (भांबोरा PHC), भाजपा तालुका अध्यक्ष विजय बैस,विनय जाधव (तालुका सरचिटणीस, भाजपा) तसेच रामसिंग राठोड, नरेश पेंदोर, जुंगेश तोडसाम, प्रशिक लढे, निरंजन राठोड, प्रमोद राठोड,पंकज राठोड, प्रमोद महल्ले, उमेश बोबडे, सूरज जैस्वाल, रुपेश रोहनकर, अविनाश टेकाम, रुपेश चट्टेकार, लक्ष्मण आंबेडकर, रोहन उइके, मोंटू मंडपाची, स्वप्नील मडकाम, शुभम मडकाम यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# प्लास्टिक बंदीला हरताळ, नगर परिषदेची धडक कारवाई!

## १० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त, २५ हजारांचा दंड वसूल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** शहरात प्लास्टिकबंदी लागू असतानाही प्रतिबंधित प्लास्टिकची विक्री व वापर सुरू असल्याच्या तक्रारींची दखल घेत नगर परिषद प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. नगर परिषद पथकाने शहरातील विविध भागांतील १० प्रतिष्ठानांची तपासणी करून सुमारे १० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त केले. या कारवाईत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित प्रतिष्ठानांकडून एकूण २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.




नगर परिषद पथकाने वार्ड क्रमांक १२ मधील गंगा डिस्पोजल आणि ओम प्लास्टिक या प्रतिष्ठानांची तपासणी केली. या तपासणीदरम्यान प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आल्याने ते जप्त करण्यात आले. प्लास्टिकबंदीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या विक्रेते व दुकानदारांवर झालेल्या कारवाईमुळे व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. नगर परिषद प्रशासनाने प्रतिबंधित प्लास्टिकच्या विक्री व वापराविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील तीन-चार दिवस शहरातील विविध दुकाने व प्रतिष्ठानांमध्ये तपासणी आणि तलाशी अभियान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा, विक्री किंवा वापर आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, शहरातील दुकानदारांनी प्लास्टिकबंदीच्या नियमांचे पालन करावे आणि प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर तसेच विक्री टाळावी, असे आवाहन नगर परिषद प्रशासनाने केले आहे. ही कारवाई स्वच्छता निरीक्षक जीतू बघेल, प्रफुल्ल जनबंधू, करण चव्हाण, कुणाल चव्हाण तसेच वार्ड सिपायांच्या पथकाने संयुक्तपणे केली.

# दीनी तालीमच्या विस्तारासाठी पुसदेत उलेमांचे प्रशिक्षण अधिवेशन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २१ :** पुसद येथे दीनी तालीमी बोर्डच्या मोहिमेअंतर्गत १३ सप्टेंबर २०२६ रोजी उलेमा-ए-किराम यांचे महत्त्वपूर्ण प्रशिक्षण अधिवेशन (इज्तिमाअ) पार पडले. धार्मिक शिक्षणाचा विस्तार, दीनी मकातिबचे सक्षमीकरण आणि समाजात धार्मिक शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या अधिवेशनाला जिल्ह्यातील विविध भागांतील व गावांमधील सुमारे ६० ते ७० उलेमांनी सहभाग नोंदविला. याशिवाय पुसद शहरातील दहा प्रतिष्ठित व्यक्तीही अधिवेशनास उपस्थित होत्या.

या अधिवेशनात मकातिब-ए-दीनिया अर्थात दीनी मकतिब अधिक संघटित व सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. अस्तित्वात असलेल्या मकातिबचे बळकटीकरण, नवीन मकातिब सुरू करणे, मुलांमध्ये धार्मिक शिक्षणाची गोडी निर्माण करणे, तसेच महिला व प्रौढ व्यक्तींसाठी धार्मिक शिक्षणाच्या संधी वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आपापल्या कार्यक्षेत्रात दीनी तालीमचे काम अधिक नियोजनबद्ध व प्रभावीपणे पुढे नेण्याचे आवाहन उलेमा-ए-किराम यांना करण्यात आले. धार्मिक शिक्षणाचा प्रसार व्यापक करण्यासाठी स्थानिक पातळीवर सातत्याने प्रयत्न करण्याची गरज अधिवेशनातून अधोरेखित करण्यात आली. अधिवेशनादरम्यान 'जमीयत उलेमा' कमेटीचे पुनर्गठन करण्यात आले. उलेमांमध्ये एकता, परस्पर सलोखा आणि संघटनात्मक समन्वय वाढवून समाजाच्या धार्मिक मार्गदर्शन व सुधारणेच्या कार्याला अधिक प्रभावी दिशा देण्याचा उद्देश यामागे असल्याचे सांगण्यात आले. या वेळी मुफ्ती एजाज साहब, मौलाना अबू तलहा हुसामी, हाफिज मोहम्मद खालिद सैफुल्लाह, मुफ्ती नासिर कासमी, वसीम खान, काशिफ पटेल, मौलाना इमरान सईद (तालुका अध्यक्ष), हाफिज झीशान रब्बानी (शहर अध्यक्ष), मुफ्ती आफि मिल्ली (सेक्रेटरी), मौलाना निसार मिल्ली (उपाध्यक्ष), हाफिज शेख समीर रब्बानी (जनरल सेक्रेटरी), तनवीर खान (सेक्रेटरी), हाफिज अताउल्लाह मिर्झा, मुफ्ती अक्रम अशरफी, मौलाना उमर राशिदी, हाफिज अताउल्लाह खान, यांच्यासह मुफ्तीयान व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# दुष्काळाच्या यादी बनाव, अफवांवर विश्वास ठेवू नका!

## जिल्हाधिकारी विकास मीना यांचे शेतकऱ्यांना आवाहन.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** राज्य शासनाने अद्याप दुष्काळग्रस्त तालुक्यांची कोणतीही अधिकृत यादी जाहीर केलेली नसताना समाजमाध्यमांवर बनावट यादी मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे.



ही यादी फेक असून, शेतकऱ्यांनी अशा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.जिल्ह्यात पावसाच्या खंडामुळे शेतकरी अडचणीत असताना दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीवरून संभ्रम निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत अधिकृत निर्णयाआधी याद्या प्रसारित करून शेतकऱ्यांच्या आशा आणि भावनांशी खेळण्याचा प्रकार गंभीर आहे. शासनाकडून दुष्काळग्रस्त (ट्रिगर) तालुक्यांची यादी अद्याप जाहीर झालेली नाही. त्यामुळे अधिकृत शासकीय घोषणेची प्रतीक्षा करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांबाबत शासनाचा अधिकृत निर्णय झाल्यानंतर प्रशासनामार्फत माहिती प्रसिद्ध केली जाईल. तोपर्यंत समाजमाध्यमांवरील अप्रमाणित संदेश, याद्या आणि दावे पुढे पाठवू नयेत. शेतकऱ्यांनी दुष्काळ किंवा अनुदानासंदर्भातील माहिती जिल्हा प्रशासन, संबंधित विभाग आणि अधिकृत शासकीय संकेतस्थळांवरून तपासून घ्यावी. अफवा पसरविणाऱ्यांच्या खोडसाळपणाला बळी न पडता अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

# पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवक-युवतींसाठी नेहरू स्टेडियमचे शुल्क माफ करा — डॉ. निरज वाघमारे यांची मागणी

**यवतमाळ, दि. २१ :** पोलीस दलात भरती होऊन समाजाची आणि देशाची सेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगून मैदानी सराव करणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील युवक-युवतींना नेहरू स्टेडियममध्ये विनामूल्य प्रवेश देऊन मैदानी सरावासाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णतः माफ करण्यात यावे, अशी मागणी डॉ. निरज वाघमारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील मोठ्या संख्येने युवक-युवती पोलीस भरतीची तयारी करीत आहेत. यामध्ये ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कामगार तसेच सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांचा मोठा समावेश आहे. शिक्षण, अभ्यासिका, प्रवास, भरती अर्ज आणि शारीरिक प्रशिक्षणाचा खर्च त्यांना आधीच सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत मैदानावर सराव करण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क अनेक विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त आर्थिक भार ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः एखाद्या दिवशी विद्यार्थ्याकडे मैदानाचे शुल्क भरण्यासाठी पैसे उपलब्ध नसल्यास त्याला स्टेडियममध्ये प्रवेश मिळत नाही आणि सरावापासून वंचित राहावे लागते. पोलीस भरतीसारख्या अत्यंत स्पर्धात्मक प्रक्रियेत मैदानी सरावातील प्रत्येक दिवस महत्त्वाचा असल्याने केवळ आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही युवक-युवतीची संधी हिरावली जाऊ नये, अशी भूमिका डॉ. वाघमारे यांनी मांडली आहे. नेहरू स्टेडियम ही सार्वजनिक क्रीडा सुविधा असून पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवकांसाठी ते केवळ मैदान नसून त्यांच्या स्वप्नांना आकार देणारी जागा आहे. आज हेच युवक स्वतःच्या भविष्यासाठी मेहनत घेत असून उद्या पोलीस दलात दाखल होऊन समाजाच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारणार आहेत. त्यामुळे त्यांच्या मार्गातील आर्थिक अडथळे दूर करणे ही प्रशासनाची सकारात्मक सामाजिक जबाबदारी असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यामुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या सर्व पात्र युवक-युवतींसाठी नेहरू स्टेडियममध्ये मैदानी सरावासाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णतः माफ करावे आणि त्यांना नियमित सरावासाठी विनामूल्य प्रवेश देण्याचे स्पष्ट आदेश तातडीने निर्गमित करावेत, अशी प्रमुख मागणी डॉ. निरज वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

"पैशाअभावी कोणत्याही युवकाचे पोलीस होण्याचे स्वप्न मैदानाच्या प्रवेशद्वारावर थांबू नये." या भूमिकेतून प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही डॉ. वाघमारे यांनी व्यक्त केली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### सोमवारी 'माहिती अधिकार दिन'

**अमरावती**-नागरिकांमध्ये माहितीच्या अधिकाराबाबत जनजागृती व्हावी आणि ही प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक व्हावी, यासाठी सोमवार, २८ सप्टेंबर रोजी 'माहिती अधिकार दिन' साजरा करण्याचे आवाहन राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठाने दिले आहेत.माहिती अधिकार दिनानिमित्त माहिती अधिकार कायद्याच्या (कलम २६) अनुषंगाने सर्वसामान्य नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांमध्ये या कायद्याबाबत साक्षरता निर्माण करण्यासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयांसोबतच शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विद्यार्थ्यांसाठी माहिती अधिकार जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. कायद्याच्या कलम ४ नुसार प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपील अधिकारी यांचे नाव व पदनाम दर्शवणारे फलक लावणे आणि ते वेळेवर अद्यावत ठेवणे बंधनकारक केले आहे.तसेच नागरिकांना अर्ज करणे सोपे जावे म्हणून मार्गदर्शक सूचना कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात याव्यात, तसेच अर्जावर भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी नमूद करण्याची कार्यवाही करण्याचे आवाहन राज्य माहिती आयुक्त कार्यालयाने केले आहे.



### भौतिकशास्त्र विभागात फिजिक्स क्लबचे उद्घाटन

**अमरावती** -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात 'फिजिक्स क्लब २०२६-२७' चा उद्घाटन सोहळा नुकताच उत्साहात संपन्न झाला. यावेळी आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. ए. वाघुळे, प्रमुख अतिथी म्हणून उपयोजित परमाणू व विद्युत विभागप्रमुख डॉ. सुजाता काळे, प्रमुख वक्ते म्हणून आय.आय. एल. संचालक डॉ. स्वाती शेरेकर, डॉ. जी. जी. मुळे, प्रा. आर. ए. पारखी, प्रा. वैदेही बोंबटकर, प्रा. गौरव सातव, प्रा. विजय लोडे प्रामुख्याने उपस्थित होते.याप्रसंगी डॉ. सुजाता काळे यांनी मार्गदर्शन करताना कृत्रिम बुध्दीमत्ता (एआय) चे महत्त्व विषद केले. प्रमुख वक्ते डॉ. स्वाती शेरेकर यांनी फिजिक्स क्लबचे महत्त्व, क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होणा-या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले.आंतर महाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांचे भौतिकशास्त्र विषयातील ज्ञान, आकलन आणि तत्परतेची कसोटी घेण्यात आली. स्पर्धेचे सूत्रसंचालन सार्थक गाडगे यांनी केले. या स्पर्धेत शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीच्या संघाने प्रथम, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय संघाने द्वितीय, तर विद्याभारती महाविद्यालय संघाने तृतीय क्रमांक मिळविला.प्रा. राज पारखी आणि संशोधक विद्यार्थिनी प्रियंका गोळे यांनी प्रश्नमंजूषा स्पर्धेचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगतांना अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचा विषयज्ञानासोबतच आकलन, तर्कशक्ती आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. विजेत्या संघांना पारितोषिकांचे याप्रसंगी वितरण करण्यात आले. समारोप कार्यक्रमाचे आभार संकेत गुजर यांनी मानले.संचालन चंदन बावनकर व कोमल तायडे यांनी केले. अतिथी व वक्त्यांचा परिचय डॉ. जी. जी. मुळे यांनी करून दिला.

### 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**अमरावती**-जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागासाठी एकूण ६५५ जागांवर 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपाची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे.त्यानुसार शहरी व ग्रामीण भागात एकूण ६५५ जागा उपलब्ध आहेत. अर्ज प्रक्रिया दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजेपासून सुरू झाली आहे. इच्छुकांना asskamravati.in या संकेतस्थळावर अर्ज करण्याची अंतिम मुदत ही दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत असणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत केवळ ऑनलाईन पद्धतीनेच दिलेल्या संकेतस्थळावर जाऊन आपले अर्ज सादर करायचे आहेत.याबाबत अधिक माहिती आणि मदतीसाठी उमेदवारांनी तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### नाट्य महोत्सवातून स्व.राजाभाऊ मोरे यांच्या स्मृतींना देणार उजाळा

**अमरावती**-शताब्दी महोत्सवाकडे वाटचाल करणारे आझाद हिंद मंडळ हे आपले ९९ वा गणेशोत्सव यावर्षी साजरा करत आहे. अमरावतीचा सांस्कृतिक वारसा इथली संस्कृती जोपासण्यात आझाद हिंद मंडळ अग्रस्थानी आहे. हाच सांस्कृतिक वारसा आपल्या कलेतून ज्यांनी जोपासला असे स्व. राजाभाऊ मोरे यांच्या स्मृतीना समर्पित करून यावर्षी मंडळाने नाट्यमहोत्सव घेण्याचे ठरवले. आज २२ सप्टेंबरला सायंकाळी ७ वाजता, आझाद हिंद मंडळ, बुधवारा चौक, अमरावती येथे विशाल रमेश तराळ लिखित भावस्पर्शी नाटक चित्रांगदा तर स्वाती तराळ लिखित तुफान विनोदी नाटक रमश्याची कि सुरश्याची...? या दोन नाटकांचे सादरीकरण होणार आहे. अमरावती सांस्कृतिक वारसा त्याच ताकदीने समोर नेणारे युवा नाट्यकर्मी विशाल रमेश तराळ, तुषार ठवकर, विनोद सुरुशे, राजेश अंबुलकर, सौरभ शेंडे, विष्णू आवंडे, सोनू तारापुरे, प्रियंका नवाथे, वैष्णवी कोळपकर, ताश्वी देशमुख, शुभ्रा बहाळे, स्वेहा तराळ, बालकलावंत अद्वैत तराळ, तृप्ती मेश्राम तसेच डॉ. श्याम देशमुख, संजिवनी पुरोहित या सर्व कलावंतांच्या अभिनयाने नाट्यमहोत्सव संपन्न होणार आहे.

### हाडांची तपासणी शिबीर

अमरावती- वाढत्या वयात हाडे पातळ, ठिसूळ होत जातात. हाडांची झीज आणि घर्षण आयुष्यभर चालू राहते, हाडांची निर्मिती आणि नाश होत राहतो. वयानुसार, हाडांच्या झीज होण्याचा दर वाढतो आणि तो निर्मितीच्या दरापेक्षा जास्त असतो. परिणामी, हाडांची घनता कमी होते, ज्यामुळे हाडे सच्छिद्र आणि कमकुवत होतात. यामुळे ऑस्टियोपोरोसिसची स्थिती निर्माण होऊ शकते. यामुळे हाडांची तपासणी आवश्यक असून डॉ. हेडगेवार हॉस्पिटलमध्ये बीएमडी नि:शुल्क तपासणी ( हाडांची ठिसूळता , घनता तपासणी) शिबीर२३ सप्टेबर रोजी सकाळी १२ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत आयोजित केले आहे., सर्जन डॉ.अभिलाष पोहोकार आणि डॉ.मंगेश नवले करतील . तपासणी नंतर रुग्णांना त्यांच्यात हाडांच्या ठीसुळते नुसार योग्य उपचार सुचवतील .

# जिल्ह्यात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय अधिकाऱ्यांना 'अलर्ट'

## पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडल्यास थेट फौजदारी गुन्हा

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यासह निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना युद्धपातळीवर राबवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत परिपत्रक जारी करून पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडल्यास थेट फौजदारी गुन्हा करण्याचा इशारा दिला आहे.



या परिपत्रकानुसार, दुष्काळी परिस्थिती अत्यंत संवेदनशील असल्याने महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, भूमी अभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा व जलसंधारण या विभागांतील सर्व जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पूर्णवेळ मुख्यालयी हजर राहून दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन आणि शेतकरी मदतीची कामे सर्वोच्च प्राधान्याने पार पाडणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच वैद्यकीय आणीबाणी वगळता इतर कोणत्याही प्रकारच्या रजेसाठी केवळ जिल्हाधिकाऱ्यांचीच पूर्वपरवानगी आवश्यक राहील. मूळ प्रशासकीय प्रमुखांकडून परस्पर रजा मंजूर करून अनुपस्थित राहता येणार नाही.

जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय रजेवर जाणाऱ्या किंवा गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर 'महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९' अंतर्गत तात्काळ निलंबनाची कारवाई केली जाईल.

तसेच, 'आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५' च्या कलम ५१, ५५ व ५६ अंतर्गत कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणी संवेदनशीलतेने ऐकून घेऊन जागेवरच तातडीने निवारण करण्याचे स्पष्ट आदेश सर्व यंत्रणांना देण्यात आले आहे. या कामात कोणतीही कुचराई खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## 'ओलाचिंब झाला देह' या गाण्याला कवी अरुण सांगोळे यांच्या शब्दकलेचा स्पर्श!

**अमरावती/का.प्र.**

येथील प्रसिद्ध कवी गझलकार प्रा अरुण सांगोळे यांचे 'ओलाचिंब झाला देह ' हे भावपूर्ण आणि भावनाप्रधान नवीन गाणे येत्या २७ तारखेला सुरमयी संगीत परिवार या युट्यूब चॅनेलवर रसिकांच्या भेटीला येत आहे. मराठी संगीत विश्वात एक नवा आविष्कार या गाण्याच्या माध्यमातून रसिकांना अनुभवता येणार आहे. संगीत आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची बुद्धिमत्ता याचा सुंदर मेळ या गाण्याद्वारे साधल्या गेला आहे.

या भावमधुर गाण्याला संगीतकार निलेश मानव यांच्या सुरांचे अधिष्ठान लाभले आहे. या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे हे



गाणे ए आय निर्मित गायिका आणि व्हिडिओ यांच्या माध्यमातून साकारले गेल्यामुळे उत्कृष्ट काव्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा एक अत्यंत दुर्मिळ व प्रयोगशील मिलाफ रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. गाण्याचा व्हिडिओ अत्यंत आकर्षक पद्धतीने तयार करण्यात आला असून येत्या २७ तारखेला समाजमाध्यमांवर प्रदर्शित होणारे हे गाणे संगीतप्रेमी आणि काव्य रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे.'ओलाचिंब झाला देह ' हे गाणे केवळ एक शब्दरचना नसून निसर्ग, भावना आणि मानवी अंतरंगाचा सुरेख संगम साधणारा एक काव्यप्रवाह असल्याचे मत कवी अरुण सांगोळे यांनी सदर प्रतिनिधीजवळ व्यक्त केले.

## २८ सप्टेंबरला फसव्या नागपूर कराराची होळी

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्ह्याची बैठक बाबूजी ताजंने सभागृह येथे विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष माजी आमदार वामनराव चटप यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

बैठकीला पश्चिम विदर्भ प्रमुख प्राचार्य डॉक्टर पृथ्वीराज राजपूत व महिला आघाडी अध्यक्षा प्राध्यापक मंजुषा तिरपुडे, जनाब आयुब शेख, शंकरराव पारे विभागीय अध्यक्ष दिलीप भोयर जिल्हा समन्वयक, अकोला जिल्हा प्रमुख भटकर यांनी मार्गदर्शनपर भाषणे झाली. या बैठकीत सर्वानुमते अमरावती शहरासह नांदगाव खंडेश्वर, चांदुर रेल्वे ,धामणगाव, चांदूरबाजार, तिवसा, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, अचलपूर, धारणी, चिखलदरा,



वरुड मोर्शी या ठिकाणी फसव्या नागपूर कराराची होळी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याची जबाबदारी प्रत्येक प्रमुखावर देण्यात आली. या बैठकीत जिल्हाप्रमुख राजेंद्र आगरकर ,महानगर प्रमुख रियाज खान,पद्मा राजपूत को.क सदस्य, जिल्हा महिला अध्यक्ष सुषमा मुळे, अशोक हांडे, दिनकर निस्ताने, बाळकृष्ण राऊत, अफसर भाई, सतीश प्रेमलवार धनराज गजभिये पिंटू जंजाळ ज्योती बाळकृष्ण राऊत उपसरपंच साहेबराव इंगळे सत्यप्रकाश गुप्ता अनिल वानखडे शेख बशीर भाई संकेत चौधरी पश्चिम विदर्भ सोशल मीडिया प्रमुख, सागर राऊत यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## लोकसंवाद' उपक्रमात कठोरा गावकऱ्यांनी घेतली 'जल व माती' वाचविण्याची शपथ

### रोजगार महाकुंभात सहभागी होण्याचा कठोऱ्याच्या युवकांचा संकल्प

**अमरावती/का.प्र.**

'माती व पाणी वाचल्याने जगाचा पोशिंदा शेतकरी व त्याची शेती 'वाचेल पर्यायाने माणूस वाचेल' हे मार्मिक उत्तर देणारे कठोरा बु. येथील चिमुकले शाळकरी दक्ष सोनोने आणि रुद्र मेश्राम हे येणाऱ्या पिढीचे संदेश वाहक ठरावे असे, चित्र 'लोकसंवाद' कार्यक्रमात दिसून आले. गावकऱ्यांनी घेतलेली मृद व जलसंधारणाची शपथ आणि २९ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात १५ ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार महाकुंभात सहभागी होण्याचा गावातील युवकांनी व्यक्त केलेला मनोदय म्हणजे 'लोकसंवाद' उपक्रमाचे महत्व अधोरेखित करून गेले.

माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर सुरु असलेल्या सेवा संकल्पांतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाने कठोरा बु. येथील भवानी गणेशोत्सव मंडळात 'लोकसंवाद' उपक्रम राबविला.या उपक्रमात मृद व जलसंधारण विभाग कार्यकारी अभियंता कार्यालय तसेच जिल्हा कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता केंद्र सहभागी झाले. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी



रितेश भुयार यांनी राज्यभर व अमरावती जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद' उपक्रमाची माहिती दिली व उभय विभागांच्या प्रतिनिधींकडून देण्यात आलेल्या माहितीपश्चात उपस्थित नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे संबंधितांकडून देण्यात समन्वय साधला. कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता केंद्राचे जिल्हा समन्वयक प्रथमेश सोहळे यांनी विभामार्फत दर तिसऱ्या आठवडयात राबविण्यात येत असलेला रोगार मेळावा आणि त्यात सहभागी होण्याची प्रक्रिया व युवकांना प्रत्यक्ष मिळत असलेला रोजगार आदींविषयी माहिती दिली. यावेळी उपस्थित युवकांकडून अभिषेक काळबांडे यांनी प्रातिनिधीक प्रश्न विचारले व त्यांची समाधानकारक उत्तरे देण्यात आली. अमरातवी जिल्ह्यात तालुका मुख्यालयांसह १५ ठिकाणी आयोजित होणाऱ्या 'रोजगार महाकुंभा'ची माहिती देण्यात आली. या मेळाव्यात सहभागी होण्याचा संकल्प उपस्थित युवकांनी केला. 'मातीची धूप थांबवण्यासाठी आणि पाण्याचा थेंबन् थेंब जोपासण्यासाठी मी नेहमी प्रयत्न करेन. 'अशी मृद व जलसंधारणाची शपथ यावेळी जयभवानी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष तेजस काळबांडे यांनी उपस्थित नागरीक व युवकांना दिली. उपाध्यक्ष रोहित सोनोने, सचिव सार्थक खोड, सदस्य ओम सोनोने आणि मिना काळबांडे,उद्योजक अरुण काळबांडे यांच्यासह नागरीक, युवक व शाळकरी यावेळी उपस्थित होते. माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे राज्यभर जिल्हा माहिती कार्यालयांच्या माध्यमातून १६ ते २४ ऑक्टोबर दरम्यान लोकसंवाद उपक्रम राबविण्यात येत आहे.

## रासेयो स्वयंसेवकांनी विद्यापीठाचा नावलौकीक उंचवावा-कुलगुरू

**अमरावती/का.प्र.**

विद्यापीठाच्या रासेयो स्वयंसेवकांनी राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करुन विद्यापीठाच्या नावलौकीकात भर घातली असून निवड झालेल्या रासेयो स्वयंसेवकांनी यापुढेही असाच नावलौकीक मिळवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित विद्यापीठस्तरीय निवड चाचणी शिबीराचे उद्घाटन झाले. त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. उद्घाटक म्हणून एनसीसी मुख्यालय, अमरावती येथील ८ महाराष्ट्र बटालियनचे ए.ओ. लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा, रासेयो



संचालक डॉ. निलेश कडू, अमरावती शहर रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. विशाल गजभिये, ग्रामीण समन्वयक डॉ. विकास देशमुख, यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निलिमा दवणे, वाशिम जिल्हा समन्वयक डॉ. अशोक वाघ, लेफ्टनंट प्रा. ऋषभ डहाके, कमांडन्ट डॉ. नितीन बनसोड आदी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, १७७ गुणवंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय फेरीत स्थान मिळविले आहे. यशाची पहिली पायरी विद्यार्थ्यांनी ओलांडली आहे. मागील वर्षी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत स्वयंसेवकांनी अनेक पारितोषिके जिंकली होती. आव्हान स्पर्धेचे विद्यापीठातील आयोजन लक्षवेधी ठरले.सर्वप्रथम प्रमुख अतिथी लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, विद्यार्थ्यांची मेहनत व महाविद्यालयातील शिक्षकांनी घेतलेले परिश्रम आणि मार्गदर्शन यामुळेच विद्यार्थ्यांची या शिबिरामध्ये निवड झाली आहे.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दीपप्रज्वलन आणि कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविका डॉ. निलेश कडू यांनी विशेष शिबिर चाचणी आयोजनामागील भूमिका विषद केली. डॉ. निलिमा दवणे यांनी, तर आभार डॉ. विशाल गजभिये यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय समन्वयक, कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

## ओझोन दिनानिमित्त ऑनलाइन प्रश्नमंजुषा

**चांदूर रेल्वे**-राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथील



रसायनशास्त्र विभागातर्फे जागतिक ओझोन दिनानिमित्त बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांमध्ये ओझोन थराचे महत्त्व, ओझोन थराचा ऱ्हास होण्याची कारणे, पर्यावरण संरक्षण तसेच ओझोन थराच्या संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. तसेच विद्यार्थ्यांची पर्यावरणीय रसायनशास्त्रातील रुची व ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीने या प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले. या ऑनलाइन प्रश्नमंजुषेत बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी ओझोन रसायनशास्त्र व पर्यावरणाशी संबंधित विविध प्रश्नांची उत्तरे देत आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन केले.या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर. वडनेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.ए.डी. बानसोड यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी या उपक्रमाचे समन्वय व आयोजन केले. रसायनशास्त्र विभागातर्फे सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.

# माणसाने नेहमी जमिनीवर रहावे

## डॉ. अविनाश आवलगावकर : प्रकट मुलाखत

**अमरावती/का.प्र.**

माणसाने नेहमी जमिनीवर राहावं, जमिनीवरच चालावं, ही भावना महानुभाव साहित्याच्या एकेका पंक्तीतून अतिशय सुंदर पध्दतीने व्यक्त केलेली आहे, असे रिध्दपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी तिस-या महानुभाव साहित्य संमेलनात प्रकट मुलाखती वेळी सांगितले. तुम्ही ज्या पातळीवर मला पाहता तिथे पोहोचायला मला पुन्हा प्रयत्न करावे लागेल असा नम्रभाव संदेश त्यांनी उपस्थिताना दिला. त्यांची प्रकट मुलाखत मराठी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांनी घेतली.

महानुभाव अध्यासन केंद्र, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी सोहळा समिती मोर्शी, भारतीय महाविद्यालय मोर्शी, विदर्भ साहित्य संघ शाखा रिध्दपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिस-या महानुभाव साहित्य संमेलनाच्या दुस-या दिवशी चौथ्या सत्रात महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान या परिसंवादाचे



अध्यक्षस्थान डॉ. कोमल ठाकरे यांनी भूषविले. यावेळी प्रा. संदीप तडस, डॉ. मीनाक्षी भांदककर, डॉ. कल्पना मेहरे यांनी सहभाग घेतला.पाचव्या सत्रात महानुभाव दर्शनशास्त्र : सरुप व वैशिष्ट्ये या परिसंवादाचे अध्यक्षस्थान आचार्य महंत अष्टूरकर बाबा यांनी भूषविले. महंत श्रीसारंगधरबाबा शास्त्री पुसदेकर, नितीन बांधकर हे सहभागी झाले होते. सूत्रसंचलन प्रा. सीमा मेटकर यांनी केले.

संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आचार्य श्री पाचराऊतबाबा, रिध्दपूर यांनी भूषविले. तर प्रमुख अतिथी म्हणून, डॉ. महंत सोनपेठकर बाबा, समन्वयक महानुभाव अध्यासन केंद्र, संत गाडगेबाबा विद्यापीठ, भैय्यासाहेब मेटकर, व्यवस्थापन समिती सदस्य, डॉ. कोमल ठाकरे, अधिष्ठाता मराठी भाषा विद्यापीठ, डॉ. रविंद्र कडू, सदस्य व्यवस्थापन परिषद, ॲड. अमोल ठाकरे, अधिसभा सदस्य, परसराज कारंजेकर, डॉ. संतोष आगरकर, प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, डॉ. अण्णा वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सोनपेठेकर बाबा यांनी, सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले. कार्यक्रमासाठी श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती सदस्य, भारतीय महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच साहित्यिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महानुभाव अध्यासन केंद्राचा उपक्रम**

# खरा मुद्दा शिक्षणाच्या वस्तूकरणाचा

**समानतेची संधी देणारे शिक्षण विषमतेला कारणीभूत ठरते आहे. हे बदलायचे असेल, तर शिक्षणाचे वस्तूकरण थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाकडे बाजारपेठ म्हणून पाहण्याचे थांबवावे लागेल. सर्वांना समान दर्जाचे शिक्षण देणे ही आजची खरी गरज आहे.**

राज्यातील एका खासगी वैद्यकीय विद्यापीठाने आपल्या वार्षिक शुल्कात एकदम ५६ टक्क्यांनी वाढ करून ते आता २२ लाख रुपयांपर्यंत नेल्याने, उच्च शिक्षण सर्वसामान्यांच्या आवाक्याच्या बाहेर जात असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. वास्तविक, आपल्याकडील खासगी क्षेत्रातील केवळ उच्च शिक्षणाचेच नव्हे, तर शालेय आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाचे शुल्कही केव्हाच सर्वसामान्यांच्या क्रयशक्तीच्या पलीकडे गेले आहे. मात्र, उर्ध्वगामी मध्यमवर्ग आणि काटकसर करणारे, प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन आपल्या मुला-मुलींना उत्तम शिक्षण देण्यासाठी धडपडणारे पालक यांमुळे महागडे शिक्षण ही 'असामान्य बाब' न राहता 'नवसामान्य बाब' बनली आहे.

इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळेतून शालेय शिक्षण आणि अभियांत्रिकी, वैद्यकीय किंवा अन्य व्यावसायिक शाखांच्या खासगी महाविद्यालयांतून वा विद्यापीठांतून पदवी शिक्षण म्हणजे यशाची हमी, असे समीकरण बिंबवले गेल्याचा हा परिणाम; त्यामुळे खासगी संस्थांतील शुल्क परवडत नसतानाही आपल्या मुलांना महागडे शुल्क भरून तिथे पाठवणारे पालक वाढत आहेत. गेल्या तीन दशकांत राज्यातील आणि देशातील शिक्षणाचा परीघ मोठ्या प्रमाणावर विस्तारण्यात खासगी क्षेत्राचा मोठा वाटा आहे, यात शंका नाही. मात्र, यामुळेच शिक्षणाकडे वैयक्तिक आणि सामाजिक प्रगतीची संधी देणारे साधन म्हणून न पाहता 'विक्रीला असलेली वस्तू' म्हणून पाहण्याचे प्रमाण वाढले आणि वस्तू जितकी उंची. तितकी ती महाग हा बाजारपेठेचा नियमही लागू झाला, हे नाकारता येणार नाही. गेल्या काही वर्षांत खासगी शाळांतील आणि महाविद्यालयांतील सामाजिक-आर्थिक कमकुवत घटकांमधील विद्यार्थ्यांना सरकारकडून मदत मिळत असली, तरी शिक्षण महाग होत असल्याच्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करता येत नाही. खासगी वैद्यकीय विद्यापीठातील शुल्कवाढीच्या निमित्ताने ही वस्तुस्थिती समजून घेण्याची आणि एकंदरीत शिक्षणाच्या वस्तूकरणाच्या लाभ-हानीचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाची एका वर्षाची फी २२ लाख रुपये असणे ही अपवादात्मक बाब नाही. राज्यात वीस खासगी वैद्यकीय महाविद्यालये असून, तेथील शुल्क वेगवेगळे आहे. किमान आठ लाख रुपयांपासून कमाल अठरा लाख रुपयांपर्यंतचे शुल्क ही महाविद्यालये आकारतात. या शुल्कात दर वर्षी वाढ होते. त्यांचे शुल्क निश्चित करण्यासाठी 'शुल्क नियामक प्राधिकरण' आहे. महाविद्यालयांच्या शुल्कवाढीच्या प्रस्तावाची छाननी या प्राधिकरणाकडून केली जाते; महाविद्यालयांनी केलेली गुंतवणूक, होत असलेला खर्च आणि आकारत असलेले शुल्क यांचा मेळ घालून मोठ्या प्रमाणावर नफेखोरी होत नाही ना, हे प्राधिकरणाकडून पाहिले जाते. ही यंत्रणा योग्य प्रकारे काम करीत असली, तरी शुल्कवाढीसाठी अनेक महाविद्यालये विविध क्लृप्त्या वापरतात, हे कटू सत्य आहे. अभिमत आणि खासगी विद्यापीठांचे शुल्क महाविद्यालयांपेक्षा अधिक असते. राज्यात पंधरा अशी विद्यापीठे असून, तेथील शुल्क १५ लाख ते ३० लाख रुपयांच्या घरात आहे. शिवाय व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेणाऱ्यांना याच्या काही पटीने अधिक शुल्क भरावे लागते. खासगी महाविद्यालयांच्या

शुल्कनिश्चितीसाठी जसे प्राधिकरण आहे, तसे ते अभिमत वा खासगी विद्यापीठांसाठी नाही. तेथील शुल्क तुलनेने अधिक असणे आणि त्यांच्यासाठी प्राधिकरण नसणे यांमधील सहसंबंध दुर्लक्षून चालणार नाही. त्यांचे शुल्कही प्राधिकरणाद्वारे ठरवण्याची मागणी म्हणूनच होत असते.

या दोहोंत आणखी एक फरक आहे. खासगी महाविद्यालयांतील सुमारे ८० टक्के जागांवरील विद्यार्थ्यांना सरकारकडून सवलती मिळतात. अनुसूचित जाती/जमाती आणि सर्व प्रवर्गांतील मुलींना पूर्ण शुल्कमाफी दिली जाते; इतर मागासवर्गीय आणि आर्थिक मागासवर्गीयांना निम्मी शुल्कमाफी दिली जाते. याचा अर्थ असा, की या विद्यार्थ्यांचे पूर्ण वा निम्मे शुल्क सरकार खासगी महाविद्यालयांना देते. खासगी महाविद्यालयांतील सर्व अभ्यासक्रमांसाठी ही सवलत असून, त्याकरिता राज्याच्या तिजोरीतून चार हजार कोटी रुपये खर्च होतात. सरकारच्या शुल्कमाफीच्या या सवलतीचा लाभ घेणाऱ्यांचे शिक्षण तुलनेने कमी खर्चात होते, हे खरे. अर्थात, विविध अभ्यासेतर शुल्काचा खर्च विद्यार्थ्यांना स्वत: करावा लागतो. अनेकदा ही रक्कमही मोठी असते. (शिवाय, शुल्कमाफीच्या पोटी सरकारकडून महाविद्यालयांना नियमितपणे आणि वेळच्या वेळी रक्कम दिली जात नसल्याचा फटकाही कधीकधी विद्यार्थ्यांना बसतो.) अभिमत आणि खासगी विद्यापीठांतील सरसकट सर्व विद्यार्थ्यांना मात्र शुल्कमाफीच्या सवलती नाहीत. तेथील विद्यार्थ्यांना डॉक्टर होण्यासाठी साठ लाख ते एक कोटी रुपये लागतात; तर खासगी महाविद्यालयांतील खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तीस लाख ते साठ लाख रुपये लागतात. इंजिनीअर होण्यासाठीचा हाच खर्च अभिमत वा



खासगी विद्यापीठांत १० लाख ते १६ लाख रुपये आणि खासगी महाविद्यालयात सहा लाख ते १० लाख रुपये आहे. (सवलत मिळणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तो स्वाभाविकच कमी असेल.)

थोडक्यात, डॉक्टर, इंजिनीअर, सॉफ्टवेअर/कम्प्युटर इंजिनीअर, आर्किटेक्ट आदींसारख्या उत्तम अर्थार्जनाची संधी देणाऱ्या पेशांत करिअर करायचे असेल, तर आधी खर्च करावा लागतो; आणि हा खर्च केवळ उच्च शिक्षणापुरता नसून, पूर्वप्राथमिक वर्गांपासून करावा लागतो. इंग्रजी माध्यमाची चांगली शाळा+नीट/जेईई/सीईटी यांसाठी नावाजलेल्या क्लासद्दनामांकित व्यावसायिक (वैद्यकीय/अभियांत्रिकी आदी) महाविद्यालयांतील पदवी, उत्तम करिअर असे समीकरण सध्या तयार झाले आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. मुंबई, पुणे यांसारख्या महानगरांत खासगी इंग्लिश शाळांमधील बालवाडीची तीन वर्षे आणि नंतरची दहा अशा १३ वर्षांसाठी किमान तेरा लाख ते पंचवीस लाख रुपयांपर्यंत खर्च होतो. जेईई (आयआयटी प्रवेश परीक्षा) किंवा 'नीट' (वैद्यकीय प्रवेश परीक्षा) यांच्या तयारीसाठी खासगी क्लासचालक तीन ते चार लाख रुपये शुल्क घेतात. त्यानंतर पदवीच्या चार वर्षांच्या शिक्षणाचा खच. 'तो अभ्यासक्रमनिहाय वेगळा असतो. वैद्यकीय आणि अभियांत्रिकीच्या शुल्काचा तपशील वर दिला आहे. अलीकडच्या काळात 'लिबरल आर्ट्स' सारख्या अभ्यासक्रमांनी कला शाखेला वलयांकित केले असले, तरी त्यांचे शुल्क लाखांच्या घरात जाते. विधी अभ्यासक्रमाची मागणीही वाढली आहे.

दिल्ली परिसरातील एका खासगी विद्यापीठात पाच वर्षांच्या एकत्रित विधी पदवी अभ्यासक्रमाचे शुल्क एक कोटी रुपयांवर गेल्याचे सांगितले जाते. याखेरीज स्पर्धा परीक्षांची तयारी करायची असेल, तर त्यासाठीच्या चांगल्या मानल्या गेलेल्या क्लासचे शुल्कही महागडेच आहे.

बाजारात ज्याप्रमाणे वस्तूच्या प्रतवारीनुसार किमती ठरतात, तसेच शिक्षणाचेही झाले आहे. मोबाइल फोन जसा पाच-सहा हजार रुपयांपासून दोन लाख रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत, तसे. पायाभूत सुविधा, तज्ज्ञ प्राध्यापक, 'प्लेसमेंट'ची शाश्वती आदींनुसार शुल्क वाढतात. ज्यांच्याकडे अधिक पैसे, ते अधिक दर्जाचे (?) शिक्षण घेणार, असे हे समीकरण आहे. परदेशांत जाऊन शिक्षण घेण्याची ऐपत असणारे स्वाभाविकच अमेरिका, ब्रिटन आदी देशांचा पर्याय निवडतात. याचा अर्थ असा, की बडे उद्योगपती, मोठ्या उद्योगांतील उच्चाधिकारी, आयटी उद्योगातील इंजिनीअर आणि अन्य अधिकारी, डॉक्टर, मध्यम व्यावसायिक, नोकरशहा आदी वर्गांतील लोक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी हवी ती रक्कम खर्च करून त्यांच्या भावी करिअरची सोय करतात. असे खर्चीक शिक्षण घेतलेल्यांच्या करिअरच्या संधीही अधिक असतात. खासगी महाविद्यालयांत विविध प्रवर्गांतील मुला-मुलींना शुल्कात सवलती मिळत असल्याने त्यांना महागड्या शिक्षणाची संधी मिळते आहे हे खरे; परंतु त्याला पोषक वातावरण नसेल, तर ते मागे पडण्याची शक्यता असते. शिवाय गेल्या काही वर्षांत खासगी विद्यापीठांचे प्रस्थ वाढले असून, तिथे सवलती नाहीत.

या विद्यापीठांना 'ब्रँडेड' म्हटले जात आहे. हे कथित 'ब्रँडेड' व्यावसायिक शिक्षण धनिक मंडळींपुरते मर्यादित राहते आणि त्यामुळे उद्योगांपासून नोकरशहापर्यंत त्यांच्याच मुलांना अधिक वाव मिळतो.

अभ्यास करून उत्तम गुण मिळवता येतात हे खरे; परंतु अभ्यासाला पोषक वातावरण असावे लागते. सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबांत असे वातावरण असते. तिथे आई-वडील मुलांकडे अभ्यासाचा आग्रह धरतात; त्यांना चांगल्या कोचिंग क्लासमध्ये पाठवतात. स्वाभाविकच पोषक स्थितीमुळे मुलांना थोड्या फार अभ्यासानेही बरे गुण मिळतात. त्याद्वारे पुढील शिक्षण घेण्यासाठी आई-वडिलांनी पैसे खर्चण्याची तयारी दर्शविली, की त्यांचे करिअर साकारू शकते. याउलट मजुरांच्या किंवा कष्टकऱ्यांच्या घरातील स्थिती असते. तिथे मुलांच्या शिक्षणाकडे आई-वडिलांचे लक्ष नसते. या स्थितीत काही मुले जिद्दीने अभ्यास करून यशाला गवसणी घालतात; परंतु सर्वच जणांना ते जमत नाही. वंचित, उपेक्षित आणि अल्पसंख्याक घटकांबाबतचे चित्र तर याहून भीषण आहे. शिक्षणासाठी पोषक वातावरण केवळ घरी असून चालत नाही, भवतालातही असावे लागते. शिवाय, ज्या भागात राहता तिथे सुविधाही असाव्या लागतात. शहरांमध्ये त्या असतात; ग्रामीण भागाचे काय? अनेक गावांत मुलांना शाळेसाठी चार-पाच किलोमीटर पायपीट करावी लागते. सारी ऊर्जा शाळेत ये-जा करण्यासाठीच जाते. ही मुले गुणवान असली, तरी सर्व सुविधा असलेल्या शहरांतील 'आहे रे' वर्गातील मुलांशी स्पर्धा कशी करणार?

शिक्षण हे समानतेची संधी निर्माण करते. 'नाही रे' वर्गातील लोकांना प्रगतीची दारे उघडते. मात्र, शिक्षणाचे वस्तूकरण झाल्याने आणि त्यामुळे त्याची प्रतवारी तयार झाल्याने, उत्तम प्रतीचे शिक्षण महाग होत चालले आहे. सरकारकडून सवलती दिल्या जात असल्या, तरी पोषकता आणि समान सुविधा निर्माण झालेल्या नाहीत. त्यामुळे आर्थिक सक्षम आणि पोषकता असलेले उत्तम प्रतीचे महागडे शिक्षण घेऊन आकर्षक करिअर करीत आहेत, तर आर्थिक स्थिती बेताची असलेले आणि पोषकता नसलेले स्वस्तातील शिक्षण घेऊन रोजगारासाठी भटकताना दिसताहेत. यातून विषमतेची दरी रुंदावण्याची शक्यता अधिक. समानतेची संधी देणारे शिक्षण अशा प्रकारे विषमतेला कारणीभूत ठरते आहे. हे बदलायचे असेल, तर शिक्षणाचे वस्तूकरण थांबवण्याची गरज आहे. त्यासाठी शिक्षणाकडे बाजारपेठ म्हणून पाहण्याचे थांबवावे लागेल. सर्वांना समान दर्जाचे शिक्षण देणे ही खरी गरज आहे. त्याकडे लक्ष द्यायला हवे.(साभार म.टा)

**श्रीधर लोणी**

## श्री गणेशाचा ऐतिहासिक, पुरातत्वीय आणि सांस्कृतिक प्रवास

भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी असलेला आणि जगभरात ज्ञान, कला आणि बुद्धीचे प्रतीक मानला जाणारा श्री गणेश हा केवळ पौराणिक कथेपुरता मर्यादित नाही. त्याच्या निर्मितीला आणि जागतिक विस्ताराला हजारो वर्षांचा ऐतिहासिक आणि पुरातत्वीय संदर्भ आहे.

**वेदांपासून पुराणांपर्यंत**

वेदकाळात गणपती संकल्पनेची पहिली बीजे दिसतात. ऋग्वेदातील 'गणानां त्वा गणपतिं हवामहे' या ऋचेत गजाननाचा उल्लेख आहे. मात्र अनेक इतिहासकारांच्या मते, हा वैदिक 'गणपती' आजच्या हत्ती-मुख असलेल्या रूपात नव्हता. तेव्हा 'गण' म्हणजे लोकांचा समूह आणि त्यांचा प्रमुख तो 'गणपती' या अर्थाने शब्द वापरला गेला असावा. पुढे स्मृती आणि पुराण काळात शिव-पार्वतीचा पुत्र, विघ्नहर्ता आणि 'प्रथम पूजनीय' असे स्थान त्याला मिळाले.

**मूर्तीचा विकास**

सुरुवातीला यक्ष किंवा गणांच्या रूपात पुजल्या जाणाऱ्या या देवतेला हत्तीचे मुख कसे मिळाले, याचा पुरावा प्राचीन शिल्पकलेत मिळतो. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात कुशाण काळात मथुरेच्या शिल्पात आणि सातवाहन काळात अमरावती स्तुपावर हत्ती-मुख असलेल्या यक्षांच्या आकृत्या आढळतात. हे गणपतीचे सर्वात प्राथमिक रूप मानले जाते. आंध्र प्रदेशातील अनंतपूर आणि कर्नूल जिल्ह्यात झालेल्या उत्खननात दुसऱ्या शतकातील टेराकोटाच्या गणेशमूर्ती मिळाल्या आहेत.

गुप्त काळात (४थे-५वे शतक) गणपतीची स्वतंत्र पूजा आणि मंदिरे सुरू झाली. मध्य प्रदेशातील उदयगिरी लेण्यांमधील ५व्या शतकातील मूर्ती आणि भुमरा येथील शिवमंदिरातील मूर्ती हे महत्त्वाचे पुरावे आहेत. ८व्या शतकात आद्य शंकराचार्यांनी 'पंचायतन पूजेत' शिव, विष्णू, सूर्य, देवी यांच्यासोबत पाचवी प्रमुख देवता म्हणून गणपतीला स्थान दिले. १०व्या शतकानंतर गणेशाला परब्रह्म मानणारा 'गाणपत्य संप्रदाय' उदयाला आला आणि गणेश पुराण, मुद्गल पुराण यांसारखे ग्रंथ रचले गेले.

**जागतिक प्रवास**

भारतातून ही उपासना जगभर पसरली. भारताबाहेर गणपतीचे सर्वात प्राचीन रूप अफगाणिस्तानातील गार्देझ येथील ५व्या-७व्या शतकातील महाविनायक मूर्तीच्या रूपात सापडते. हिंदू शाही राजा खिंगल याने स्थापन केलेली ही मूर्ती आहे. बौद्ध धर्माच्या महायान आणि वज्रयान पंथामुळे नेपाळ, तिबेटमार्गे ७व्या-८व्या शतकात गणपती चीन आणि जपानमध्ये पोहोचला. जपानमध्ये त्याला 'कांगितेन' किंवा 'शोटेन' नावाने समृद्धी आणि यशाचा देव मानले जाते. आजही तिथल्या मंदिरांमध्ये त्याची गुप्त पद्धतीने पूजा होते.

चोल, पल्लव राजे आणि व्यापाऱ्यांमार्फत गणपती कंबोडिया, थायलंड, म्यानमार आणि इंडोनेशियात पोहोचला. इंडोनेशियातील माउंट ब्रोमो या सक्रिय ज्वालामुखीच्या कड्यावरची ७०० वर्षे जुनी गणेशमूर्ती प्रसिद्ध आहे, जी ज्वालामुखीपासून रक्षण करते अशी तिथे श्रद्धा आहे. इंडोनेशियाने आपल्या चलनी नोटेवरही गणपतीचे चित्र छापले होते. थायलंडमध्ये 'फ्रा पिकानेत' म्हणून कलेचा देव म्हणून पूजा होते, तर कंबोडियात ख्मेर साम्राज्याच्या काळात अनेक गणेश मंदिरे उभारली गेली. वेदांमधील 'गणांचा प्रमुख' या संकल्पनेतून उगम पावलेला गणपती आज बुद्धी, कला आणि यशाचे जागतिक प्रतीक बनला आहे.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,** वर्धा

## सद्गुरु ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्रजी

भारताला विश्वगुरू व्हायचे आहे; पण 'गुरु' म्हणजे नेमके काय? अंतर योगचे ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्रजी उलगडतात 'श्री गुरुगीते'तील गुरुतत्त्व. आज माहितीची कमतरता नाही; पण योग्य दिशा दाखविणाऱ्या मार्गदर्शनाची कमतरता नक्कीच जाणवते.

मोबाईल, इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या युगात कोणत्याही प्रश्नाचे उत्तर काही क्षणांत मिळते. ङपण जीवनाची योग्य दिशा कोणती? निर्णयांमध्ये स्पष्टता कशी येईल? यश मिळूनही मनात शांतता का नाही? आणि स्वतःपासून स्वतःपर्यंत पोहोचण्याचा मार्ग कोणता?

या प्रश्नांची उत्तरे केवळ माहितीमध्ये नसतात. त्यासाठी आवश्यक असते. योग्य मार्गदर्शन. आणि भारतीय संस्कृतीत या मार्गदर्शनाचे सर्वोच्च रूप म्हणजे 'गुरु'. स्कंद पुराणातील भगवान शिव आणि देवी पार्वती यांच्यातील दिव्य संवादातून प्रकटलेली 'श्री गुरुगीता' हा गुरुतत्त्वाचा सखोल परिचय करून देणारा अमूल्य ग्रंथ आहे. हा केवळ गुरूंची स्तुती करणारा ग्रंथ नाही; तर गुरु म्हणजे कोण, योग्य गुरुचे जीवनातील स्थान काय, शिष्याने कोणत्या भावनेने गुरुचा स्वीकार करावा आणि गुरुकृपेतून आत्मज्ञानाचा मार्ग कसा खुला होतो, याचे सखोल विवेचन करणारी आध्यात्मिक ज्ञानधारा आहे.

गुरु म्हणजे केवळ एखादी व्यक्ती नव्हे. जो अज्ञानाचा अंधकार दूर करून सत्याचा प्रकाश दाखवतो, जो मनुष्याला स्वतःच्या अंतरंगाशी जोडतो आणि जीवनाला योग्य दिशा देतो. तो गुरु. गुरुगीतेत गुरुचे स्वरूप, गुरु-शिष्य नाते, गुरुभक्ती, गुरुसेवा, शिष्याची पात्रता, गुरुकृपा आणि आत्मज्ञानाचा मार्ग यांचे महत्त्वपूर्ण विवेचन आढळते.

या ग्रंथाचे महत्त्व आजच्या काळात अधिकच वाढते. ङकारण आज माणसाकडे माहिती भरपूर आहे; पण त्या माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे जीवनदृष्टीत रूपांतर करण्यासाठी योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे.

भारताला विश्वगुरू बनविण्याची चर्चा आज सर्वत्र होत आहे. मात्र ङजगाला मार्गदर्शन करण्यापूर्वी 'गुरु' म्हणजे काय, हे समजून घेणे आवश्यक आहे. याच विचाराला अधोरेखित करणाऱ्या



एका महत्त्वपूर्ण प्रसंगी ङकेंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 'श्री गुरुगीता' ग्रंथाचे प्रकाशन झाले.

भौतिक विकासासाठी महामार्ग आवश्यक असतात; पण अज्ञानातून ज्ञानाकडे आणि अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या अंतर्मुख यात्रेसाठी गुरुचा मार्ग आवश्यक असतो. आज विद्यार्थी, तरुण, गृहस्थ, व्यावसायिक आणि साधक प्रत्येकाच्या जीवनात मार्गदर्शनाची गरज आहे. करिअरची दिशा, जीवनातील निर्णय, मनःशांती, मूल्याधिष्ठित जीवन आणि आत्मशोध प्रश्न वेगवेगळे असले तरी योग्य दिशेची गरज सर्वांनाच असते.

'श्री गुरुगीता' या गरजेकडे केवळ धार्मिक दृष्टिकोनातून नव्हे, तर जीवनाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी देते. या प्राचीन आध्यात्मिक ज्ञानाला आधुनिक जीवनाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अंतर योग फाउंडेशनचे संस्थापक आणि आध्यात्मिक गुरु जीवनमुक्त सद्गुरु ब्रह्मर्षि आचार्य उपेंद्र जी यांच्या विवेचनातून झाले आहे. क्लिष्ट संस्कृत श्लोकांचा अर्थ अत्यंत सोप्या, शास्त्रसंगत आणि जीवनोपयोगी भाषेत समजावून सांगण्याचा त्यांचा प्रयत्न या ग्रंथाचे विशेष वैशिष्ट्य आहे. त्यामुळे हा ग्रंथ विद्यार्थी, गृहस्थ, व्यावसायिक, साधक आणि ज्येष्ठ नागरिक, सर्वांसाठी समजण्यास सुलभ होतो.

भारतीय अध्यात्माची वैशिष्ट्यपूर्ण भावना केवळ 'माझे कल्याण' अशी नाही; तर 'सर्वांचे आणि विश्वाचे कल्याण' अशी आहे. ङज्ञान, साधना आणि शक्ती यांचा उपयोग व्यापक कल्याणासाठी व्हावा, हीच आपल्या ऋषी-मुनींची आणि संतांची परंपरा आहे. गुरुपौर्णिमा हा केवळ गुरुंचे पूजन करण्याचा दिवस नाही. ङतो आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या ज्ञानपरंपरेचे स्मरण करण्याचा आणि स्वतःला एक प्रश्न विचारण्याचा दिवस आहे 'गुरूंनी दाखविलेल्या मार्गावर चालण्यासाठी मी स्वतःमध्ये कोणता बदल घडवून आणला?'

काही ग्रंथ वाचले जातात; काही ग्रंथ अभ्यासले जातात; पण काही ग्रंथ मनुष्याला स्वतःकडे पाहायला शिकवतात. 'श्री गुरुगीता' हा त्यापैकी एक ग्रंथ आहे. कारण गुरु केवळ जीवन बदलत नाहीत; ते जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलतात. माहितीच्या महासागरात दिशेचा शोध घेणाऱ्या आजच्या युगात 'श्री गुरुगीता'चा प्रकाश प्रत्येक जिज्ञासू मनासाठी एक अर्थपूर्ण आध्यात्मिक निमंत्रण ठरू शकते.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।

गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः?

**डॉ शिवानी गढीकर,**
अमरावती
मो. ९४२१८९३४५०

## पीसीओएस/ पीसीओडी जागरूकता महिना

**फक्त पाळीची तक्रार नाही,
हा आहे हार्मोन्सचा खेळ;
स्वतःची काळजी घेण्याची,
हीच आहे योग्य वेळ!**

आजच्या आधुनिक आणि गतिमान युगात विज्ञानाने प्रचंड प्रगती केली आहे, परंतु त्यासोबतच आपल्या जीवनशैलीतही मोठे बदल झाले आहेत. परिणामी महिलांच्या आरोग्याशी संबंधित महिलांमधील या अत्यंत सामान्य हार्मोनल आणि मेटाबॉलिक समस्येबद्दल समाजात जनजागृती करणेसाठी दरवर्षी सप्टेंबर महिना हा जगभरात ङपीसीओएस/ पीसीओडी जागरूकता महिना म्हणून पाळला जातो. हा विकार केवळ अंडाशया(ओव्हरी)तील सिस्ट पुरता मर्यादित नसून, हा संपूर्ण शरीरातील हार्मोन्स (संप्रेरक) आणि चयापचय क्रियेशी संबंधित एक व्यापक आजार आहे म्हणून वर्ष २०२६ मध्ये ङपीसीओएस चे अधिकृत नाव बदलून पीएमओएस असे केले आहे. जेव्हा एखादी महिला या आजाराची रुग्ण बनते, तेव्हा तिच्या शरीरात 'अँड्रोजन' या पुरुष संप्रेरकाचे प्रमाण वाढते. यामुळे अंडाशयात लहान-लहान 'सिस्ट' तयार होतात आणि स्त्रीबीज तयार होण्याची प्रक्रिया विस्कळीत होते.

परिणामी रुग्णाला शारीरिक त्रासांना सामोरे जावे लागते ते :-महिलेला अनियमित मासिक पाळी, पोटाचा घेर वाढणे आणि प्रयत्न करूनही वजन कमी न होणे, चेहऱ्यावर आणि छातीवर/पाठीवर काळे व जाड केस उगवणे. त्वचेवर सतत पिंपल्स येणे, केस पातळ होणे, गर्भधारणेत अडचण (वंध्यत्व). यात अचानक बदलणारे शारीरिक रूप यामुळे अनेक तरुणींमध्ये न्यूनगंड (कमी आत्मविश्वास) निर्माण होतो. समाजात आजही या आजाराबद्दल पुरेशी जनजागृती नसल्याने, रुग्णाला



'लठ्ठपणा'/'वंध्यत्वा'साठी दोष दिला जातो, ज्यामुळे त्या नैराश्य (डिप्रेशन) आणि तीव्र चिंतेच्या (अँझिटी) बळी ठरतात. या समस्येने जगभरातील प्रजनन वयाच्या ८% ते १३% महिला पीसीओएस ने ग्रस्त आहेत. भारतातील वेगवेगळ्या अभ्यासांनुसार, प्रजनन वया(१८ ते ४५ वर्षे)च्या २०% ते २५% महिला या समस्येचा सामना करत आहेत. हा दर जागतिक सरासरीच्या जवळपास दुप्पट आहे. बदलती जीवनशैलीमुळे वजन वेगाने वाढते आणि हार्मोनल असंतुलन अधिक गंभीर बनते. धावपळीच्या जीवनात मानसिक ताणतणाव, आनुवंशिक घटक (जेनेटिक्स): जर आई, बहीण किंवा कुटुंबातील इतर महिलांना हा त्रास असेल तर सध्याच्या आकडेवारीनुसार, भारताला 'जागतिक पीसीओएस ची राजधानी' म्हटले जात आहे, ग्रस्त असलेल्या सुमारे ७०ऱ्न महिलांचे वेळेवर अचूक निदान होत नाही. भविष्यात या आजाराकडे वेळेवर लक्ष न दिल्यास / केवळ 'पाळीची किरकोळ तक्रार' म्हणून दुर्लक्ष केल्यास भविष्यात रुग्णाला गंभीर आजार - प्रामुख्याने टाईप-२ मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि गर्भाशया(एंडोमेट्रीयल)चा कर्करोग यांचा धोका संभवतो.

पीसीओडी/पीसीओएस नियंत्रित करण्याचे उपाय :-आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे, प्रथिने ( प्रोटिन) आणि संपूर्ण धान्यांचा समावेश करा. साखर, मैदा आणि पॅकबंद ( प्रोसेस्ड) अन्नपदार्थ पूर्णपणे टाळा. रोज ३० ते ४० मिनिटे वेगाने चालणे, योग, सायकलिंग / व्यायाम केल्याने शरीरातील इन्सुलिनची पातळी सुधारते आणि वजन नियंत्रित राहते. मानसिक ताण कमी करण्यासाठी दररोज ध्यान ( मेडीटेशन), दीर्घ श्वसन / स्वतःच्या आवडीचे छंद जोपासा. शरीरातील हार्मोन्सचे संतुलन राखण्यासाठी दररोज रात्री ७ ते ८ तासांची शांत आणि गाढ झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे. लक्षणे आढळल्यास घरगुती उपाय ऐवजी स्त्रीरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

**तारा व्दा शर्मा**

**दिवाळी विशेषांक- २०२६**

दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही 'जनमाध्यम' दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फ विनंती...आपले साहित्य atimadhyam@gmail.com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सअॅप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम' कडे राखीव राहील. इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि. २० ऑक्टो. २०२६ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.

# अकोल्याच्या रस्त्यांवर आता 'ई-बस'चा प्रवास!

## चार्जिंग स्टेशनचे काम अंतिम टप्प्यात ; पहिल्या टप्प्यात २० बस दाखल

**पुढील महिन्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पणाची शक्यता**



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील सार्वजनिक वाहतुकीला आधुनिकतेची जोड देणारी प्रधानमंत्री ई-बस सेवा अखेर अकोल्याच्या रस्त्यांवर धावण्याच्या तयारीत आहे. खडकी येथील ई-बस चार्जिंग स्टेशनचे काम अंतिम टप्प्यात आले असून, पहिल्या टप्प्यात दाखल झालेल्या २० ई-बस लवकरच प्रवाशांच्या सेवेत येणार आहेत. त्यामुळे वातानुकूलित, सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय अकोलेकरांना उपलब्ध होणार आहे.

विधानसभा मुख्य प्रतोद तथा आमदार रणधीर सावरकर आणि खासदार अनुप धोत्रे यांनी सोमवारी खडकी येथील चार्जिंग स्टेशनची पाहणी करून कामाचा आढावा घेतला. यावेळी महापौर शारदा रणजीत खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल गोगे, सभागृह नेता पवन महल्ले यांच्यासह महापालिका अधिकारी उपस्थित होते.

प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेंतर्गत अकोला महापालिकेला एकूण ४२ ई-बस मिळणार आहेत.

यामध्ये १२ मीटर लांबीच्या १४ आणि ९ मीटर लांबीच्या २८ बसचा समावेश आहे. त्यापैकी २० बस पहिल्या टप्प्यात अकोल्यात दाखल झाल्या आहेत.

चार्जिंग स्टेशनमध्ये कंपनीची चार्जिंग यंत्रणा बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, आरटीओच्या परवानगीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### वातानुकूलित बसमध्ये सुविधा

नव्या ई-बसमध्ये वातानुकूलित सुविधा, सीसीटीव्ही यंत्रणा यांसह प्रवाशांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून, रुग्णांसाठी व्हीलचेअरची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रदूषणमुक्त वाहतुकीला चालना देतानाच शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा उद्देश या सेवेचा आहे.

### पुढील महिन्यात लोकार्पण?

चार्जिंग स्टेशनचे काम पूर्णत्वाकडे असून पुढील महिनाभरात आरटीओची आवश्यक प्रक्रिया पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ई-बस सेवेचे लोकार्पण करण्याचे नियोजन असल्याची माहिती खासदार अनुप धोत्रे यांनी दिली.

### 'सिटी बस'च्या प्रतीक्षेला पूर्णविराम

अकोला शहरात सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असावी, अशी नागरिकांची अनेक वर्षांपासूनची अपेक्षा आहे. ई-बस सेवा सुरू झाल्यानंतर शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा आधुनिक पर्याय मिळणार असून, शहरातील वाहतुकीवरील ताण कमी करण्यासही त्याचा हातभार लागण्याची अपेक्षा आहे. ई-बस सेवा प्रत्यक्ष रस्त्यावर धावू लागल्यास अकोल्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. यावेळी मनपा सहायक आयुक्त गणेश शहाणे, शहर अभियंता अजय गुजर, विद्युत विभागाचे उपअभियंता अमित सराग, अभियंता चेतन शंकरपुरे, प्रकल्प व्यवस्थापन समितीचे अभियंता आनंद वंजारी, कनिष्ठ अभियंता तुषार खोले यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# 'परिस्थिती बदलाचीच गरज'

## शिवार फेरीतून शेतक-यांचा निर्धार

**■ अत्याधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा घेतला प्रत्यक्ष अनुभव**
**■ २५ एकरांवरील पीक प्रात्यक्षिकांना उत्स्फूर्त प्रतिसाद**



■ प्रतिनिधी | अकोला ■

अनियमित पाऊस, बदलते हवामान आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीसमोरील आव्हाने दिवसेंदिवस वाढत असताना पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची गरज शेतकऱ्यांना प्रकर्षाने जाणवू लागली आहे. जल, जमीन आणि पर्यावरणाचे संवर्धन करीत शाश्वत व हवामानपूरक शेतीकडे वळण्याचा निर्धार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शिवार फेरीत सहभागी झालेल्या हजारो शेतकरी बांधव-भगिनींनी व्यक्त केला.

कृषी विद्यापीठाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय शिवार फेरीच्या दुसऱ्या दिवशी विदर्भातील विविध जिल्ह्यांसह गोंदिया, गडचिरोली ते बुलढाणा परिसरातून शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. शेतकरी उत्पादक गट, पाणी फाउंडेशन, रिलायन्स फाउंडेशन, उमेद अभियान, महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत महिला बचतगट तसेच कृषी विभागाशी संबंधित विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्यही या फेरीत सहभागी झाले. 'हवामान बदलाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी आधुनिक व शाश्वत शेती तंत्रज्ञान जाणून घेऊन त्याचा प्रत्यक्ष शेतात अवलंब करणे आवश्यक आहे. शिवार फेरीच्या माध्यमातून विविध तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याबरोबरच शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी शेतकऱ्यांना मिळत आहे,' असे मत कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी व्यक्त केले. आधुनिक पीक वाण, सुधारित पीक व्यवस्थापन, शेतीपूरक व्यवसाय, शेतमाल प्रक्रिया आणि स्थानिक पातळीवरील मूल्यवर्धन याबाबत शेतकऱ्यांना माहिती मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

२५ एकरांवरील जिवंत प्रात्यक्षिके ठरली आकर्षण

शिवार फेरीतील २५ एकरांच्या प्रक्षेत्रावर उभारण्यात आलेली जिवंत पीक प्रात्यक्षिके शेतकऱ्यांसाठी विशेष आकर्षण ठरली. खरीप हंगामातील विविध पिकांच्या सुधारित जाती, विद्यापीठाच्या शिफारशीनुसार पीक व्यवस्थापन तंत्रज्ञान आणि आधुनिक शेती पद्धती प्रत्यक्ष पाहण्याची संधी यामुळे शेतकऱ्यांना मिळाली. गहू संशोधन विभागाच्या प्रक्षेत्रावर तेलबिया, कडधान्ये, तृणधान्ये, कापूस, चारापिके, भाजीपाला आणि फुलपिकांच्या विविध जातींची प्रात्यक्षिके साकारण्यात आली आहेत. कमी पाण्यात, कमी कालावधीत तसेच कीड-रोगांचा प्रादुर्भाव कमी ठेवून चांगले उत्पादन देणाऱ्या वाणांची माहिती घेण्यासाठी शेतकऱ्यांनी विशेष उत्सुकता दाखविली.

### महिला शेतकरी, युवकांचा लक्षणीय सहभाग

शिवार फेरीत महिला शेतकऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. विविध प्रक्षेत्रांवर महिला शेतकरी शास्त्रज्ञांकडून तंत्रज्ञानाची माहिती घेत तसेच आपल्या शेतीविषयक समस्यांवर मार्गदर्शन करून घेताना दिसल्या. कृषी शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण युवक-युवतींचाही उत्स्फूर्त सहभाग राहिला. अनेक शेतकरी सहकुटुंब शिवार फेरीत सहभागी झाले होते.

### २० हून अधिक प्रक्षेत्रे, संशोधन विभागांना भेट

२० ते २२ सप्टेंबरदरम्यान आयोजित शिवार फेरीत २० हून अधिक प्रक्षेत्रे आणि विविध संशोधन विभागांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'शेतकऱ्यांना विविध कृषी तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहता यावे आणि तज्ज्ञांकडून शेतीविषयक समस्यांचे समाधान करून घेता यावे, या उद्देशाने शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या स्वागतासाठी विद्यापीठ सदैव तत्पर आहे,' असे संचालक, विस्तार शिक्षण तथा शिवार फेरीचे आयोजक डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी सांगितले.

### आज शिवार फेरीचा समारोप

तीन दिवसीय शिवार फेरीचा आज मंगळवारी, दि. २२ सप्टेंबर रोजी समारोप होणार आहे. दुष्काळसदृश परिस्थिती आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर फायदेशीर व शाश्वत शेतीचे विविध पैलू प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी विदर्भासह राज्यातील शेतकरी बांधव-भगिनींनी शिवार फेरीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले आहे.

## श्री गणेश भक्तीधारा' कार्यक्रमात भावगीत, भक्तिगीतांची मेजवानी

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय संस्कृतीची जगभराला ओळख करून देणारी भाव व भक्तिगीते संगीत आणि अध्यात्म यांचा सुरेल संगम असून आयुष्याला प्रेरणा देणारी आहेत असे प्रतिपादन महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांनी केले. गणेशोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मुख्यालयात पार पडलेल्या 'श्री गणेश भक्तीधारा' भक्तिमय कार्यक्रमात विविध भावगीते भक्तिगीते आणि गझलांच्या सुरेल सादरीकरणाने वातावरण भक्तिमय झाले. गणरायाच्या भक्तीने आणि मधुर स्वरांनी परिसर निनादून गेला.

## दोन दिवसीय मोफत आरोग्य शिबिरात ४०० नागरिकांची तपासणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय जनता पक्ष, पूर्व मंडळ महिला आघाडी, युवा प्रतिष्ठान तसेच नगरसेविका सुनिता अग्रवाल, प्राची काकड आणि नगरसेवक विशाल इंगळे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग क्रमांक १३ मधील छत्रपती संभाजी पार्क येथे दोन दिवसीय मोफत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २० व २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत हे शिबिर सुरू राहणार आहे. खा. अनुप धोत्रे आणि आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी महापौर शारदा रणजीत खेडकर, भाजपा शहराध्यक्ष जयंत मसने आणि मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात हृदयरोग, मधुमेह, मोतीबिंदू, स्त्रीरोग, कान-नाक-घसा, जनरल सर्जरी, हाडांचे आजार यांसह विविध आजारांची तपासणी केली जात आहे.




### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५४३/२०२६ — प्रोसेस नं.११८१९/२०२६
चौ.ता. ०४/११/२०२६ — दिनांक : १६/०९/२०२६

**अर्जदार :** १. सुधाकर अंबादास आमले, वय अ. ६३ वर्षे, धंदा- शेती, २. दिनकर अंबादास आमले, वय अ. ६० वर्षे, धंदा- शेती, ३. धनराज अंबादास आमले, वय अं. ५४वर्षे, चंदा शेती, रा. व्दारा अंबादास आमले, जागृती अपार्टमेंट, फलॅट नं. ६, राम मंदिर जवळ, वृंदावन नगर सुधीर कॉलनी, अकालो, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुर्यकांता अंबादास आमले
**पत्ता :-** रा. व्दारा अंबादास आमले, जागृती अपार्टमेंट, फलॅट नं. ६, राम मंदिर जवळ, वृंदावन नगर सुधीर कॉलनी, अकाली, ता. जि. अकोला.

या अर्थउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की मयत सुर्यकांता अंबादास आमले यांचे दि.०४/०७/२०१७ रोजी आयकॉन हॉस्पीटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्याचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी.

अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**
I Have Changed My Name From VIJAYA PANDURANGJI GONDCHAR -TO- VIJAYA PANDURANG GONDCHAR
Passport No :- N6210452 My Residential Address in:- Behind Gajanan Appts, Gajanan Nagar Akot, Akola

**Change In Name**
I Have Changed My Name From PANDURANGJI NAGORAO GONDCHAR -TO- PANDURANG NAGORAO GONDCHAR
Passport No :- N6210452 My Residential Address in :- Behind Gajanan Appts, Gajanan Nagar Akot, Akola

**Change In Name**
I Have Changed My Name From SACHIN PANDURANGJI GONDCHAR -TO- SACHIN PANDURANG GONDCHAR
Passport No :- N6210452 My Residential Address in:- Behind Gajanan Appts, Gajanan Nagar Akot, Akola

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५२०/२०२६ — प्रोसेस नं.११३१७/२०२६
चौ.ता. १६/१०/२०२६ — दिनांक : ०४/०९/२०२६

**अर्जदार :** १. जयश्री रविंद्र कुलकर्णी रा. शेशद्री भवन, गौरक्षण रोड, चक्रधर अपार्टमेंट जवळ, हरिष अश्विनी कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. २. राहुल रविंद्र कुलकर्णी रा. फ्लॅट नं. एस-५, आश्रय अपार्टमेंट, पॅथॉन सोसायटी, रिलायन्स फ्रेश समोर, मनिष नगर, पो. विवेकानंद नगर, उपजिल्हा नागपूर. दुसरा पत्ता - रा. शेशद्री भवन, गौरक्षण रोड, चक्रधर अपार्टमेंट जवळ, हरिष अश्विनी कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ३. राधिका पवन अग्निहोत्री व्दारा पवन विनोद अग्निहोत्री, रा. कृष्णा संकुल डुप्लेक्स नं. ६, डाबकी रोड, गजानन महाराज मंदिर जवळ, अंबिका नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रविंद्र शेषराव कुलकर्णी
**पत्ता :-** रा. शेशद्री भवन, गौरक्षण रोड, चक्रधर अपार्टमेंट जवळ, हरिष अश्विनी कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रविंद्र शेषराव कुलकर्णी यांचे दि. ०४/०१/२०२६ रोजी स्वामी विवेकानंद मेडीकल मिशन, पारसोडी, नागपूर रूरल, नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २५५/२०२६ — प्रोसेस नं.३९४०/२०२६
चौ.ता. २६/१०/२०२६ — दिनांक : १७/०९/२०२६

**अर्जदार :** १. संगिता सुरेंद्र डिक्कर, वय - ७६ वर्ष, २. भरत सुरेंद्र डिक्कर, वय - ५६ वर्ष, ३. रणजीत सुरेंद्र डिक्कर, वय ५२ वर्षे नं. १ ते ३, रा. हनुमान मंदिर जवळ, तापडीया नगर, महाजनी प्लॉट, अकोला ता. जि. अकोला ४. किर्ती प्रवीर वताने, वय ५४ वर्ष, रा. बोर्ड ऑफिस जवळ, शास्त्री नगर, टोपे नगर, अमरावती.ता.जि.अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, मनुबाई मारोती खांडेकर दिनांक १२/०२/२०२६ रोजी मरण पावल्या आहेत. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा, अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणप देण्यात येईल

**मालमत्तेचे वर्णन : मयत मनुबाई मारोती खांडेकर** यांचे नावे मौजा नालवाडा, ता. दर्यापूर, नि अमरावती येथील ग्रा.पं. नालवाडा अंतर्गत मालमत्ता क. २८९ अ.क ३२५, क्षेत्रफळ ३९६ ची फूट यावर बांधलेले घरकुल येणेप्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत २०,०००/- रु. आहे.

आज दि. १९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

शिक्का

आदेशानुसार
सहा अधिक्षक (प्रशासन) दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. ए.बी.कटटे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक :- १४५५/२०२६ — पुढील तारीख ०५.१०.२०२६

**सुलभा व इतर विरूध्द निरंक**

## जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार- 1. Sulbha Kiran** Ayade Age: 64 yrs, Occ-Housewife
**2. Aditya Kiran Ayade** Age-32 yrs Occ-Labour
**3. Prutha Kiran Ayade** Age-39 yrs Occ-Labour
All R/o Near Sitarambaba mandir Balaji Plot, Amravati

**विरुध्द-गैरअर्जदार-निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत किरण किशवराव आयदे हे दि २७.१०.२०२५ रोजी अमरावती, येथे मयत झाले. अर्जदार सुलभा व इतर विरूध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सहतु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा **सुलभा व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि. १५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
वरीष्ठ स्तर, अमरावता

---

## जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री / श्रीमती /कु. **मो. रिजवान मो.अफसर** पत्ता-**हीरापुरा अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२३** संगणक मालमत्ता क्र.**ACH A00005109** जुना मालमत्ता क्र.**२३०००५१३** नझुल शीट नं. **२५ए** प्लॉट नं. **१७०**-श्री /श्रीमती /कु. **श्री. कृष्णराव नारायण वानखडे** या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु. **मो. रिजवान मो.अफसर** या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक १७/०९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप / लक्षवेध :-**
**उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-**
**पूर्व-** वासुदेव बिजवे व अब्दुल रउफ शेख गणी यांचे घर
**पश्चिम :-**रस्ता
**उत्तर -**प्लॉट नंबर १६७
**दक्षिण :-**सिमा असलम शेख असलम यांचे घर

मुख्याधिकारी
नगर परिषद, अचलपूर

---

## जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री / श्रीमती /कु. **श्री. सुरेश मोतीराम डाहाके** पत्ता-**अल्बासपुरा अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२७** संगणक मालमत्ता क्र.**ACH A00010494** जुना मालमत्ता क्र.**२७०००६७०** नझुल शीट नं. **६सी** प्लॉट नं. **३०३**-श्री /श्रीमती /कु. **श्री. चंद्रशेखर मोतीराम डाहाके इतर२** या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु. **श्री. सुरेश मोतीराम डाहाके** या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक १६/०९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप / लक्षवेध :-**
**उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-**
**पूर्व-** रोड
**पश्चिम :-**प्रदिप विखार यांचे घर
**उत्तर -**ढोरे यांचे घर
**दक्षिण :-**रामदास आंदागोंदे

मुख्याधिकारी
नगर परिषद, अचलपूर

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.**

आर.एम.जे.सी. ४४०/२०२६ — ने. ता. ०१/१०/२०२६

**अर्जदार :- १. निर्मला मनोहरराव नेवारे,** वय ६० वर्षे, व्यवसाय - मजुरी
**२. विनोद मनोहरराव नेवारे,** वय ४५ वर्ष व्यवसाय - मजुरी दोन्ही रा. शिरजगांव कसबा ता, चांदुर बाजार जि. अमरावती

**गैरअर्जदार :- निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक शामराव सखारामजी नेवारे यांचा मृत्यु दि. २५/०८/२०२४** रोजी तसेच **मृतक लक्ष्मी शामरावजी नेवारे हिचा मृत्यु दि. १४/१२/२०१५** रोजी त्याचबरोबर **मृतक मनोहर शामरावजी नेवारे** यांचा मृत्यु दि. १८/०९/२००४ रोजी रा. शिरजगांव कसबा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं. ४४०/२०२६ नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्यांबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०९/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक दिवाणी व
फौजदारी न्यायालय चांदुर बाजार

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक :- १९६०/२०२६ रेखा ३ वि निल पुढील तारीख १७.१०.२०२६

## जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार- १. रेखा केवलदास** मेश्राम वय ५७ वर्ष, व्यवसाय गृहिणी रा. शारदा नगर, नवी वस्ती, बडनेरा ता. जि. अमरावती
**२. श्रध्दा अश्वनी मेश्राम** वय २९ वर्ष, व्यवसाय गृहिणी
**३. अश्वजीत अश्वनी मेश्राम** वय १० वर्ष, व्यवसाय- शिक्षण
**४. कबीर अश्वनी मेश्राम** वय ०७ वर्ष, व्यवसाय-शिक्षण क. ३ व ४ तर्फे अज्ञान पालनकर्ता क. २ ते ४ रा. माल ढाका जवळ, शारदा नगर नवी वस्ती, बडनेरा, ता. जि. अमरावती

**विरुध्द- गैरअर्जदार- Nill**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत अश्वनी केवलदास मेश्राम** हे दि. २०.०६.२०२६ रोजी बडनेरा अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **रेखा केवलदास मेश्राम अधिक तीन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **रेखा केवलदास मेश्राम** अधिक तीन वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१६.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
वरीष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. एस. एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक : १७२२/२०२६ — पुढील तारीखः ०५.१०.२०२६

**Manoramabai Krushnarao Kevale+ 2 Versus NIL**

Applicants- **1) Manoramabai Krushnarao Kewale,** Age 80 yrs Occ- NIL R/o Amba Vihar, Ravi Nagar, Amravati, Tq & Dist. Amravati Retired **2) Sharad Krishnarao Kewale**, Aged about 65 yrs Occ R/o Jijamata Colony, Cidco N-2 Aurangabad 431001
**2) Harsha Mahendra Jari,** Aged about 58 yrs, Occ-Household R/o Tulsi Nagar, Near Tharmal Power Station, Durgapur Tq & Dist. Amravati

## जाहिरनामा / सायटेशन

**==Versus== Non- Applicant-NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **deceased Krushnarao Ramchandra Kewale** तथा दि. ३०.१०.२००८ रोजी अमरावती येथे मयत झाले Manoramabai **Krushnarao Kevale+ 2 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सबहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्या **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा **Manoramabai Krushnarao Kevale+ 2 Versus NIL** वरीलप्रमाणे सबहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांच हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि.२०/८/२०२६रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
वरीष्ठ स्तर, अमरावता

---

**तहसिलदार, तिवसा (राजस्व) यांचे कार्यालय ता. तिवसा, जिल्हा-अमरावती**

Ph.No.-०७२२५-२९५००३ E-Mail:-tah.tisoa@gmail.com
जा.क्र. प्रस्तु-१/भो. वर्ग रुपांतरण अर्ज/जाहिरनामा/कावि- ९३५/२०२६, दिनांक- ०१/०१२०२६

## जाहिरनामा

उपरोक्त याद्वारे सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, **श्री. देवेंद्र माधवराव मोतीखाये, रा. मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती** यांनी नमुद केल्याप्रमाणे, त्यांचे मालकीचे व ताब्यातील मौजा मोझरी, ता. तिवसा येथील शेत भुमापन क्रमांक व उपविभाग - ७२/२, क्षेत्रफळ- १.०१ हे. आर या शेतजमिनीपैकी क्षेत्र-०.०५ हे. आर ही शेतजमिन औद्योगिक प्रयोजनाकरीता (फटाका गोडावुनकरीता) अकृषक करावयाचे आहे. तरी सदर क्षेत्राचे औद्योगिक प्रयोजनाकरीता (फटाका गोडावुनकरीता) अकृषक करण्याबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

दाखल अर्जान्वये प्रकरण पंजीबध्द करण्यात येऊन प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तेंव्हा ज्या कोणाला सदर प्रकरणी आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी सदर्छु जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत आपला आक्षेप अर्ज आवश्यक पुराव्यांसह लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**(मयूर कळसे)**
**तहसिलदार, तिवसा**

---

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र. : २६४/२०२६ नेमलेली तारीख :- २२-१०-२०२६

**१. राजकन्या दामोधर हंबर्डे**
**२. अंकुश दामोधर हंबर्डे** दोन्ही रा. सावनेर, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत दामोधर रंगराव हंबर्डे यांचा मृत्यु दि. २२.१०.२०२३** मध्ये सावनेर, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार क्र. १ ही पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज **दिनांक : १९ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक मा. दिवाणी
न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १९
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### वीर वंदन'मधून विद्यार्थ्यांना देशसेवेची प्रेरणा

**अंजनगाव बारी-**बडनेरा येथील टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये 'वीर वंदन' कार्यक्रम उत्साहात पार पडला. परमवीर चक्र विजेते मेजर आनंद पाथारकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत देशसेवेतील थरारक अनुभव कथन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती व राष्ट्रसेवेची भावना जागृत झाली.कार्यक्रमात घ्ज्ञ्णऊइ सदस्य पराग छांगानी यांनी 'मूल्यवर्धन हेच राष्ट्रउभारणी' या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी बन्सल क्लासेसचे संचालक उमेश आगलावे, पराग छांगानी यांच्यासह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य अजय चौबे यांनी वीर जवानांना अभिवादन केले. प्रिया वानखडे यांनी आभार मानले.



### टायटन्स पब्लिक स्कूलला समूहगान स्पर्धेत तृतीय पुरस्कार

**अंजनगाव बारी-**भारत विकास परिषदेच्या वतीने महिला महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय समूहगान स्पर्धेत बडनेरा येथील टायटन्स पब्लिक स्कूलने तृतीय पुरस्कार पटकावला. हैमी बोडे, हृद्या बोडे,परिधी नवघरे, रुचा होले, चिरंतरी सुतावणे, अर्णवी गावंडे व आर्या जैन या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.संगीत शिक्षक श्वेता ढोके व शैलेंद्र बोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. प्राचार्य अजय चौबे, शाळा व्यवस्थापन व शिक्षकांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### गणेशोत्सवानिमित्त रंगतदार भजन

**कुऱ्हा-**स्थानिक पीपला विहार येथील रहिवासी जयंत पंडित यांचे घरी गणेशोत्सवानिमित्त महिला भजन मंडळातर्फे बहारदार भजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. आझाद चौक कुऱ्हा येथील नवदुर्गा महिला भजन मंडळ यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमात मृदंग वादक उमेश मेसरे यांनी साथसंगत केली.भजन गायिका शेवंताबाई मेसरे, नंदा बोबडे, वच्छला बावणे, बेबीताई मेश्राम,कल्पना बावणे,पद्मा पवार, मनिषा काळबांडे, शकुंतला मेहरकर, प्रगती पवार, पद्मा ढोले यांनी भजने सादर केली. कुसुम पवार यांनी गवळणावर आधारित सुंदर नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढविली. यावेळी मनिषा चिरडे, आरती पवार, रीना पवार, राणी पवार, रमा आत्राम, सरला वाढोणकार आदींचे विशेष सहकार्य लाभले. आयोजक पंडित परिवार यांनी उपस्थित सर्व भजन मंडळ सदस्य यांचा यथोचित सन्मान करून सर्वांचे आभार मानले.



### महाविद्यालयाचा कबड्डी संघ जिल्हास्तरावर

**कुऱ्हा-**स्थानिक अशोक शिक्षण संस्था अशोकनगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा येथील १९ वर्ष आतील मुलांचा संघ तालुका स्तरीय स्पर्धे करिता पात्र ठरला आहे. या संघामध्ये अमित डाखोरे, उजेबखान, उदय मसराम, तुषार जाधव, आर्यन पवार, अर्पित सुरसाऊत, नयन धुर्वे, रितेश शेंडे, सुजल उके इत्यादी खेडाळू सहभागी झाले. या यशाबद्दल अशोक शिक्षण संस्था,अध्यक्ष एस.एन. शेंडे साहेब व संचालक मंडळ, मुख्याध्यपिका,आर.जी. कुमरे व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विजयी संघांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.



### बुद्धिबळ स्पर्धेत पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थिनींचे यश

**अमरावती-**पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल, अमरावतीच्या विद्यार्थिनींनी तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.इयत्ता नववीतील वंशिका गजभिये तर इयत्ता आठवीतील अक्षदा पारतवार हिने बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत शाळेचा गौरव वाढविला.या उत्कृष्ट कामगिरीमुळे दोन्ही विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्या सोनल निस्ताने तसेच क्रीडा विभागाने दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी डॉ.अंकुश राजगिरे यांनी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थिनींच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## ७७ वर्षाचा संघर्ष; सिंधी समाजाच्या मालकी हक्काला आता आशेचा किरण

# संबंधित जमिनींच्या मालकी हक्काचा प्रस्ताव मंजूर

**अमरावती/का.प्र.**



देशाच्या फाळणीनंतर जन्मभूमी,घरे, जमीन जुमला आणि व्यवसाय मागे सोडून भारतात आलेल्या सिंधी समाजाच्या अनेक पिढ्यांच्या प्रदीर्घ संघर्षाला अखेर महत्त्वपूर्ण यश मिळाल्याचे सांगण्यात आले आहे. अमरावतीतील सिंधी समाज वास्तव्यास असलेल्या जमिनींच्या मालकी हक्काचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण निर्णय प्रक्रिया पुढे गेल्याने समाजात समाधानाचे वातावरण आहे. तब्बल ७७ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मिळालेला हा दिलासा महत्त्वपूर्ण असल्याचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी सांगितले.

श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत महापौर श्रीचंद तेजवानी यांनी सांगितले की, सन १९४७ मध्ये झालेल्या फाळणीनंतर संपूर्ण सिंध प्रांत पाकिस्तानमध्ये गेल्याने असंख्य सिंधी कुटुंबांना आपली घरे, शेती, मालमत्ता आणि व्यवसाय सोडून भारतात स्थलांतर करावे लागले. १९४७ ते १९५२ या काळात भारतात आलेल्या निर्वासितांचे विविध राज्यांत पुनर्वसन करण्यात आले. उपलब्ध सरकारी किंवा पडीक जमिनींवर उभारलेल्या तात्पुरत्या वसाहती कालांतराने कायमस्वरूपी वस्त्यांमध्ये रूपांतरित झाल्या. मात्र, या जमिनींचा मालकी हक्क हा प्रश्न अनेक दशकांपासून प्रलंबित होता. मालकी हक्कासाठी सिंधी समाजाच्या प्रतिनिधींनी सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केला. या प्रयत्नांना वीरेंद्र कुकरेजा यांनीही पुढाकार घेत शासनस्तरावर पाठपुरावा केला. अखेर संबंधित जमिनींचा मालकी हक्क देण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर झाल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. त्यामुळे शहरातील सिंधी समाजाच्या दीर्घकाळ प्रलंबित मागणीला महत्त्वपूर्ण दिलासा मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

फाळणीनंतर भारतात आलेल्या पहिल्या पिढीने ज्या जागेवर नव्याने संसार उभा केला, त्याच जागेचा मालकी हक्क पुढील पिढ्यांना मिळण्याच्या प्रक्रियेला आता गती मिळाल्याने हा केवळ जमिनीचा प्रश्न नसून दीर्घ संघर्षाशी निगडित बाब असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच वीरेंद्र कुकरेजा यांच्या। प्रयत्नांचेही कौतुक करण्यात आले. या पत्रकार परिषदेला भाजपा नेते आ. प्रवीण पोटे पाटील, शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, जयंत डेहणकर, चेतन गावंडे आदी उपस्थित होते.

## शालेय बुद्धिबळात सीताबाई संगई कन्या शाळेचा दबदबा

### स्वरा पाठक जिल्ह्यात प्रथम, ईश्वरी थोरात तृतीय

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागांतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विविध शाळांमधील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत सीताबाई संगई कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले.१४ वर्षे वयोगटात स्वरा विशाल पाठक हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर १९ वर्षे वयोगटात कु. ईश्वरी विजय थोरात हिने जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळविला. या दोन्ही विद्यार्थिनींची पुढील विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.उल्हास काका संगई, उपाध्यक्ष भरत संगई, विवेक संगई,सचिव प्रसाद संगई, सहसचिव प्रसन्न संगई,अजय संगई, कार्यकारणी सदस्य अविनाश संगई, आशिष संगई यांच्यासह सर्व संचालकगणांनी विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

मुख्याध्यापिका नीलिमा सांगोळे व पर्यवेक्षक अमोल डहाळे यांनीही विद्यार्थिनींचे कौतुक केले.शारीरिक शिक्षण शिक्षक समाधान शेटफळकर व संदीप दातीर यांचे मार्गदर्शन लाभले.



## आठ वर्षांनंतर टाकरखेडा संभूला रात्री मुक्कामी थांबली बस

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

गेल्या सात ते आठ वर्षांपासून टाकरखेडा संभू गावाच्या नावाने रात्रीची बसफेरी बंद असल्याने विद्यार्थी,नोकरदार,महिला व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर उपसरपंच प्रदीप शेंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, तब्बल आठ वर्षांनंतर टाकरखेडा संभू येथे रात्री मुक्कामी बसफेरी सुरू झाली आहे. ही बस अमरावती येथून रात्री ८ वाजता सुटून टाकरखेडा संभू येथे मुक्कामी राहणार असून, दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता टाकरखेडा संभू येथून अमरावतीकडे परतीचा प्रवास करणार आहे.सकाळी



बसफेरीचे औपचारिक स्वागत करून चालक ए.एम.मोहोड व वाहक एस.आर. भिहाडे यांचा सत्कार करण्यात आला. गावासाठी रात्रीची बस सुरू व्हावी यासाठी माजी उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला. यासाठी विद्यार्थ्यांचा मोर्चा, विभागीय नियंत्रकांना निवेदने तसेच अमरावती आणि नागपूर येथे प्रत्यक्ष भेटी घेऊन निवेदने देण्यात आली. पालकमंत्र्यांकडेही याबाबत मागणी करण्यात आली होती. याची दखल घेत अखेर विभाग नियंत्रक सचिन क्षीरसागर यांनी तातडीने बस सुरू करण्याचे आदेश दिले, संबंधित अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार बसफेरी सुरू करण्यात आली. रात्रीच्या वेळेत अमरावतीहून गावाकडे परतणाऱ्या नागरिकांसह विद्यार्थ्यांना या बसफेरीचा मोठा फायदा होणार आहे. पालकमंत्री तसेच संबंधित अधिकारी आणि माजी उपसरपंच प्रदीप शेंडे यांचे आभार मानले.

## पत्रकारांना न्याय मिळाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही- संजय सरवटकर

**अमरावती/का.प्र.**

दिवसेंदिवस पत्रकारांवर होत असलेले हल्ले, त्यांच्यावर होत असलेलला अन्याय आणि पोलिसांची बघ्याची भूमिका पाहून लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेला पत्रकार हैराण झाल्याने जो पर्यंत पत्रकारांना न्याय मिळणार नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नसल्याचे प्रतिपादन स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे अमरावती जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर यांनी केले. नुकतीच बडनेरा येथे विश्राम भवनात संघटनेची बैठक संजय सरवटकर यांच्या अध्यक्षतेखाली तर जिल्हा कार्याध्यक्ष (ग्रामीण) वि.दा.पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.



याप्रसंगी वि.दा.पवार म्हणाले की, कासम शहा या पत्रकारावर झालेला हल्ला हा त्या एकट्यावर नसून लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर आहे.

म्हणून सर्व पत्रकारांनी एकजूट होऊन लढा देणे काळाची गरज आहे. काही दिवसापूर्वी स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे नांदगाव खंडेश्वर तालुका अध्यक्ष कासम शहा यांच्यावर वृत्त संकलनाकरिता गेले असता हल्ला करून त्याचे आय. डी. कार्ड हिसकावून त्यांना मारहाण करण्यात आली होती. यसंदर्भात अमरावती जिल्हा अधीक्षक (ग्रामीण) अनिकेत कदम यांना पत्रकारांनी निवेदनही दिले होते. परंतु लोणी टाकळी पोलीस स्टेशन ने आरोपीला सोडून कासम शहा यांच्यावरच दबाव आणल्याची बाब समोर आली असून त्यांनाच नोटीसा देऊन कोर्टात हजर राहण्याचे फर्मान केले आहे.

यासंदर्भाच बडनेरा येथे बैठक घेण्यात आली व पोलिसांनाच्या दिरंगाई बद्दल पत्रकारांनी नाराजी व्यक्त केले. या संदर्भात लवकर आरोपीवर कारवाई न झाल्यास आंदोलनचा पवित्रा उचलण्यात येणार असल्याचा एकसूर बैठकीत पत्रकारांनी मांडला.बैठकीला पत्रकार संघांचे श्रीकृष्ण नाईक, विनोद छापामोहन, सुरेश दहिकर, अंगत दाभाडे, भास्कर काळे, गजानन सावंत, अमीर शहा, शंकर खंडारे, सुनील सदार, अमित तिवारी, प्रमोद गिरनाळे, वाय. एम. रामटेके, विजय काळे, आदेश पाठक इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## तिवसा येथील बुद्धविहारासाठी दोन कोटींची निधी

### पंचशील व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने आ.वानखडे यांचा सत्कार

**तिवसा/वार्ताहर**

शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या बौद्ध समाजाच्या जुन्या बुद्धविहाराच्या पुनर्बांधणीसाठी आ.राजेश वानखडे यांनी तब्बल दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. अनेक वर्षांपासून जर्जर अवस्थेत असलेल्या बुद्धविहाराच्या पुनर्बांधणीसह सार्वजनिक सभागृह व अभ्यासिका उभारण्यासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयाबद्दल पंचशील व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने आ.राजेश वानखडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.तिवसा शहरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये बौद्ध समाजाची



वस्ती असून,या ठिकाणी सुमारे पन्नास वर्षांपासून बुद्धविहार अस्तित्वात आहे. मात्र, इमारत जुनी झाल्याने भिंतींना भेगा पडल्या असून पावसाळ्यात छताला गळती लागण्यासह विविध समस्या निर्माण झाल्या होत्या.त्यामुळे नवीन बुद्धविहाराची उभारणी करण्याची मागणी समाजबांधवांकडून अनेक वर्षांपासून करण्यात येत होती.

या मागणीसाठी पंचशील व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रतिनिधींनी आ.राजेश वानखडे यांची भेट घेऊन या मागणीची दखल घेत जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत तिवसा नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ८ मध्ये बुद्धविहाराचे बांधकाम, सार्वजनिक सभागृह तसेच अभ्यासिका उभारण्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यासाठी पुढाकार घेतला. यावेळी सुदर्शन यावले, रवि खाकसे, मिलिंद यावले, जगदीश माहोरे, श्रीधर शापामोहन, आनंद शापामोहन,तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी अध्यक्ष भूषण यावले,मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे दिलीप शापामोहन,प्रशिक शापामोहन,अमोल खाकसे यांच्यासह सामाजिक व राजकीय चळवळीतील कार्यकर्ते आणि समाजबांधव उपस्थित होते.यावेळी आ.राजेश वानखडे यांनी संबंधित कामाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल,असे सांगितले. तसेच पंचशील यात्रेसाठीही आवश्यक मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

## अमरावतीसह विदर्भातील विधी पदवीधरांना मोठा दिलासा

**अमरावती-** ऑल इंडिया बार एक्झामिनेशन (AIBE) चे परीक्षा केंद्र अमरावती येथे उपलब्ध व्हावे, यासाठी सुरू असलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. अमरावती येथे परीक्षा केंद्र उपलब्ध झाल्याने अमरावतीसह अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यांतील विधी पदवीधर व नवोदित वकिलांना मोठा दिलासा मिळणार आहे. वकिली व्यवसायासाठी महत्त्वाची असलेली AIBE परीक्षा बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) मार्फत घेतली जाते. अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बबलू उर्फ प्रशांत देशमुख यांनी AIBE परीक्षा केंद्रासाठी सातत्याने पाठपुरावा केला.त्यांच्या प्रयत्नांना जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड.गिरीश धर्माळे, उपाध्यक्ष ॲड. भोयर, ॲड. वरूडकर, ग्रंथालय सचिव ॲड. शर्मा तसेच संपूर्ण कार्यकारिणीचे सहकार्य लाभले. यासोबतच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य ॲड.आशिष देशमुख यांनी बार कौन्सिलच्या पातळीवर या मागणीचा पाठपुरावा केला. ॲड.वैभव ठाकरे सातत्याने प्रयत्न केले. या सर्वांच्या सामूहिक आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून अमरावती येथे AIBE परीक्षा केंद्र उपलब्ध झाले आहे. त्यामुळे अमरावतीसह संपूर्ण विभागातील विधी पदवीधर आणि नवोदित वकिलांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचा आरोग्य उपक्रम

# रेडियंट हॉस्पिटलच्या सहकार्याने मज्जाविकार तपासणी शिबीर

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

सेवा संकल्प अभियानांतर्गत अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या वतीने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मज्जासंस्थेशी संबंधित विविध आजारांबाबत नि:शुल्क विशेष मार्गदर्शन व तपासणी शिबिराचे आयोजन नगरपरिषद सभागृह, अंजनगाव सुर्जी येथे करण्यात आले.या शिबिरामध्ये रेडियंट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिहॅबिलिटेशन सेंटर, अमरावती यांच्या तज्ज्ञ वैद्यकीय पथकाच्या माध्यमातून नागरिकांना मार्गदर्शन व तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. शिबिरामध्ये मिरगी, फिट/आकडी, अपस्मार, मायग्रेन, चक्कर येणे (व्हर्टिगो), लकवा/पक्षाघात, स्ट्रोक, डोक्याला मार लागणे, स्मृतिभ्रंश, पार्किन्सन्स, मेंदूतील गाठी तसेच झोपेच्या समस्या आदी मज्जासंस्थेशी संबंधित आजारांबाबत तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी प्रसिद्ध न्यूरॉलॉजिस्ट डॉ. सिकंदर अडवाणी (MBBS, MD, DM – Gold Medalist) तसेच न्यूरोसर्जन डॉ. आनंद काकणी (MBBS, MS, MCh –



Neurosurgery) यांनी नागरिकांची प्रत्यक्ष तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले.आजारांची लक्षणे,वेळीच निदानाचे महत्त्व तसेच उपचार पद्धती याबाबत त्यांनी उपस्थितांना मोलाची माहिती दिली. या आरोग्य शिबिरास नगरपरिषद अंजनगाव सुर्जीचे मुख्याधिकारी विजय लोहकरे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले तसेच उपनगराध्यक्ष प्रियंका मलठाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यासोबतच आरोग्य सभापती प्रवीण नेमाडे, शिक्षण सभापती रेहान, बांधकाम सभापती नईम बेग हसन बेग, नगरसेवक सुयोग खाडे यांच्यासह सर्व नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचारी वर्गातून गजानन चक्रनारायण व सुनील उमक यांच्यासह संबंधित कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या आयोजन व व्यवस्थापनासाठी विशेष सहकार्य केले.नागरिकांनी या नि:शुल्क आरोग्य उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला. सेवा संकल्प अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या या आरोग्य शिबिराचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# कर्जमुक्तीचे उद्दिष्ट्य पूर्ण करून शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज द्या - पालकमंत्री बावनकुळे

## कर्जमुक्तीसाठी पात्र शेतकऱ्यांची केवायसी महिनाभरात पूर्ण करा

### शेतकरी व नागरिकांना विनाखंड वीज उपलब्ध करून देण्याच्या सूचना



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात दोन टप्प्यात ८६ हजार ४४७ शेतकऱ्यांना कर्जमुक्ती जाहीर झाली आहे. त्यातील मयत व अन्य कारणांमुळे केवायसी राहिलेल्या जवळपास १८ हजार शेतकऱ्यांची एक महिन्यात केवायसी पूर्ण करावी. यासाठी स्थानिक आमदारांची मदत घेऊन याद्या तयार करा अशा सूचना करत शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या सूचना आज (दि.२१) महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यंत्रणांना दिल्या. तसेच, जिल्ह्यात शेती व सार्वजनिक उपयोगासाठी वीज अखंड उपलब्ध होण्याकरिता महावितरण कंपनीने तातडीने यंत्रणा सुधार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

नियोजन भवनात पालकमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली कर्ज माफी व पीक कर्ज संदर्भात अग्रणी बँकांची आणि महावितरणची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने' अंतर्गत दोन टप्प्यात कर्जमाफी जाहीर झाली आहे. यासंदर्भात याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र यातील काही शेतकऱ्यांना मालक शेतकरी मयत झाल्याने व अन्य तांत्रिक कारणांमुळे केवायसी झाली नसल्याने कर्जमाफी झाली नसल्याचा विषय तातडीने सोडविण्याच्या सूचना बावनकुळे यांनी यावेळी केल्या. यासाठी तातडीने जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघ निहाय केवायसी मुळे लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांची यादी तयार करून तलाठ्यांच्या माध्यमातून त्यांना नोटीस देण्यात याव्या, स्थानिक आमदारांनी यात स्वतः लक्ष घालून हा विषय प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी समन्वयाने कार्य करून महिनाभरात निकाली काढण्याचे निर्देशांनी दिले.

या कामात बँकांनी कुठल्याही पद्धतीने दिरंगाई किंवा कुचराई करता कामा नये. बँकांनी मयत शेतकऱ्यांचा वारस लावून त्यास लाभ ☞(पान २ वर)

# मारेकरी पती अद्याप पसार

## -बडनेरा पोलिसांकडून शोधमोहीम सुरू

### दाभा येथील हत्या प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दाभा गावात बंद घरात सडलेल्या अवस्थेत आढळलेल्या वैशाली ललित मेहरे यांच्या मृत्यू प्रकरणाला आता हत्येचे वळण मिळाले आहे. मृतक महिलेचा भाऊ दिनेश ठाकरे यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी तिचा पती ललित सुनील मेहरे (वय ३२) याच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल होताच आरोपी पसार झाला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. दाभा गावातील एका बंद घरातून दुर्गंधी येत असल्याने हा प्रकार उघडकीस आला होता. पोलिसांनी घराचा दरवाजा उघडल्यानंतर वैशाली मेहरे यांचा सडलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. त्यानंतर मृतदेहाची ओळख पटविण्यात आली. या प्रकरणात आता मृतकाच्या भावाने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी पतीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.यवतमाळ जिल्ह्यातील पोटगव्हाण येथील रहिवासी दिनेश ठाकरे यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत ललित मेहरे हा दारूच्या नशेत वैशालीसोबत वारंवार वाद घालून मारहाण करीत असल्याचा आरोप केला आहे. तक्रारीनुसार, घटनेच्या दिवशी दोघांमध्ये वाद झाला. यावेळी ललितने वैशालीला लाकडी दांड्याने मारहाण केल्याचा आरोप असून, त्यात तिचा मृत्यू झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. वैशालीचा मृत्यू झाल्यानंतर तिचा मृतदेह घरातच ठेवून आरोपीने घराला कुलूप लावले आणि तेथून पसार झाल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. काही दिवसांनी घरातून दुर्गंधी येऊ लागल्याने हा प्रकार उघडकीस आला.

**सासूनेही दिली होती माहेरच्यांना** ☞(पान २ वर)

# चांदूर रेल्वे, धामणगाव, नांदगाव खंडेश्वर तालुक्यांवर दुष्काळात अन्याय

## माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात काँग्रेस शिष्टमंडळाची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव



**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळ ट्रिगर यादीतून वगळण्यात आलेल्या धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर या तिन्ही तालुक्यांमध्ये तत्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, या मागणीसाठी धामणगाव विधानसभा काँग्रेस कमिटीच्या वतीने माजी आमदार प्रा.वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

ऐन सोयाबीनच्या शेंगा भरण्याच्या आणि कपाशीच्या बोंड लागण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर म्हणजेच सप्टेंबर महिन्यात या तिन्ही तालुक्यांमध्ये पावसाचा मोठा खंड पडल्याने पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. प्रशासकीय आकडेवारीनुसार सप्टेंबर महिन्यात धामणगाव तालुक्यात तब्बल साठ टक्के, तर चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यात पन्नास टक्क्यांहून अधिक पावसाची घट नोंदवली गेली आहे, जी संपूर्ण जिल्ह्यात सर्वाधिक आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा या भागात सुमारे पावणेतीनशे ते साडेतीनशे मिमी पावसाची प्रचंड तूट असूनही केवळ सुरुवातीच्या सरासरीच्या तांत्रिक निकषांवर बोट ठेवून या तिन्ही तालुक्यांना वगळण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

प्रशासनाने महसूल मंडळांच्या फेऱ्यात न अडकता या तिन्ही तालुक्यांना एकसंध घटक मानून तत्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करावे, अशी ठाम मागणी यावेळी माजी आमदार वीरेंद्र ☞(पान २ वर)

# आयएनएसच्या 'लघु व मध्यम वृत्तपत्र समिती'च्या अध्यक्षपदी विलास मराठे



**नवी दिल्ली :** देशातील वृत्तपत्रसृष्टीची प्रतिष्ठित शिखर संस्था असलेल्या इंडियन न्यूजपेपर सोसायटीच्या (घ्एु) सन २०२६-२७ या वर्षासाठी गठित करण्यात येणाऱ्या 'लघु व मध्यम वृत्तपत्र समिती'च्या अध्यक्षपदी दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास ए. मराठे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयएनएसचे अध्यक्ष करण दर्डा यांनी ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्याकडे सोपविली असून, अमरावतीसह संपूर्ण विदर्भातील वृत्तपत्र क्षेत्रासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.

आयएनएसच्या कार्यकारी समितीची ६६६ वी बैठक ७ सप्टेंबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथील आयएनएस कॉन्फरन्स हॉलमध्ये तसेच दृकश्राव्य माध्यमातून पार पडली. या बैठकीमध्ये सन २०२६-२७ या कार्यकाळासाठी संस्थेच्या विविध समित्या व उपसमित्यांची स्थापना करण्याचे आणि त्यावर सदस्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार आयएनएसच्या अध्यक्षांना प्रदान करण्यात आले होते.

त्या निर्णयानुसार आयएनएसच्या अध्यक्षांनी विलास ए. मराठे यांची 'स्मॉल अँड मीडियम न्यूजपेपर्स कमिटी'च्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. आयएनएसच्या सरचिटणीस मेरी पॉल यांनी अधिकृत पत्राद्वारे मराठे यांना या नियुक्तीची माहिती दिली.

विलास अरुण मराठे यांना पत्रकारिता, संपादन, वृत्तपत्र व्यवस्थापन, मुद्रण तंत्रज्ञान, जाहिरात, विपणन आणि प्रशासकीय कामकाजाचा चार दशकांहून अधिक प्रदीर्घ अनुभव आहे. दैनिक हिंदुस्थानच्या माध्यमातून त्यांनी विदर्भातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय आणि विकासात्मक प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली आहे. बदलत्या काळात वृत्तपत्र व्यवसायासमोरील आव्हाने ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, वितरण व्यवस्थेचे बळकटीकरण आणि वाचकांशी विश्वासाचे नाते कायम ठेवण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. लघु आणि मध्यम वृत्तपत्रे ही भारतीय लोकशाहीची मुळे मजबूत करणारी ☞(पान २ वर)

# निवडणुक प्रचारादरम्यान गोंधळ प्रकरणात माजी खासदार नवनीत राणा यांना जामीन



**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार येथील मुख्य बाजार चौकात २०२४ च्या विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान झालेल्या गोंधळाच्या प्रकरणात माजी खासदार नवनीत राणा यांना आज (दि.२१) जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला. दर्यापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायाधिश एस. टी. डोके यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली.

दर्यापूर विधानसभेसाठी २०२४ साली माजी आमदार रमेश बुंदीले हे निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यांच्या प्रचारासाठी माजी खासदार नवनीत राणा या खल्लार येथे आल्या असतांना दोन गटांमध्ये वाद निर्माण होऊन परिस्थिती तणावपूर्ण झाली होती. त्यावेळी सभास्थळी खुर्च्या फेकण्यात आल्या होत्या.

या घटनेप्रकरणी खल्लार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरण सध्या सेशन खटला म्हणून न्यायालयात सुरू आहे. या प्रकरणात एकूण १२ आरोपी आहेत. न्यायालयीन तारखांना माजी खासदार नवनीत राणा उपस्थित न राहिल्याने त्यांच्या विरोधात अटक वॉरंट ☞(पान २ वर)

# ऑपरेशन कवच अंतर्गत अवैध दारू-जुगार अड्ड्यांवर ग्रामीण पोलिसांचा छापा

## ३१ जणांवर कारवाई; १ लाख ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवैध दारू विक्री आणि जुगार अड्ड्यांविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार रविवारी दि.२० सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेसह विविध पोलीस ठाण्यांच्या पथकांनी केलेल्या कारवाईत ३१ जणांवर कारवाई करून तब्बल १ लाख ८९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अमरावती ग्रामीण जिल्ह्यात 'ऑपरेशन कवच' अंतर्गत अवैध धंद्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. सण-उत्सवाच्या काळात अवैध दारू विक्री, जुगार तसेच त्यातून उद्भवणाऱ्या अनुचित घटनांना आळा घालण्यासाठी सर्व ठाणेदार आणि स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली.

**तळणी येथे देशी दारूचा साठा जप्त-** स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तळणी येथे छापा टाकण्यात आला. यावेळी विनापरवाना देशी दारूची विक्री केल्याप्रकरणी राहुल वसंतराव दांडगे (वय ४७, रा. तळणी, पूर्णा, ता. चांदूर बाजार) याच्यावर कारवाई करण्यात आली. त्याला दारूचा माल पुरविणारा राहुल श्रीरामजी वानखडे, रा. येवूर्णा याच्याविरुद्धही कारवाई करण्यात आली. या कारवाईत २४५ नग देशी दारूच्या पावट्या ☞(पान २ वर)

# डॉ.कुमार बोबडे आज आकाशवाणीवर



**अमरावती/प्रतिनिधीः-** ज्येष्ठ पत्रकार व श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे जनसंवाद विभागप्रमुख डॉ कुमार बोबडे यांची मुलाखत मंगळवारी सायंकाळी ६.३० वाजता आकाशवाणीच्या महाराष्ट्रातील सर्व केंद्रांहून प्रसारित होणार आहे. 'जीवनकार्य लेखणीतून ' या विषयावर कार्यक्रम अधिकारी आशिष सातपुते यांनी ही मुलाखत घेतली असून ' अमृत कलश ' या कार्यक्रमातंर्गत मुंबई अस्मिता वाहिनीवरून तिचे प्रसारण होईल. आकाशवाणीच्या सर्व केंद्रांसोबतच एआयआर, नागपूर ५८५, एआयआर मुंबई अस्मिता वाहिनीवरून ही मुलाखत ऑनलाईन सुद्धा प्रसारित होणार आहे.

# दर्यापूर तालुका तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करा

## शेतकरी व ग्रामिण जनतेला तातडीने मदत देण्याची सर्वपक्षीय मागणी



**खल्लार/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती गंभीर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर दर्यापूर तालुक्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकरी व ग्रामिण जनतेला आर्थिक मदत, कर्जविषयक दिलासा, रोजगार, चारा व पाण्याची व्यवस्था करावी, या प्रमुख मागण्यांसाठी सर्वपक्षीय पदाधिकारी, शेतकरी प्रतिनिधी व नागरिकांनी आज (दि.२१) तहसिलदार, दर्यापूर यांच्यामार्फत मुख्यमंत्री, कृषिमंत्री व महसूलमंत्री यांना निवेदन सादर केले.

शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास राज्यभर शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनाच्या माध्यमातून शासनाला देण्यात आला.

दर्यापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेती पावसावर अवलंबून आहे. यंदाच्या खरीप हंगामात पावसाचे प्रमाण, पावसातील खंड, पिकांची वाढ, जमिनीतील ओलावा आणि उपलब्ध पाणीसाठ्याची स्थिती यामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि उत्पादनातील संभाव्य घट यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

शासनाने केवळ कागदोपत्री आकडेवारीवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष पर्जन्यमान, पावसातील खंड, पिकस्थिती, जमिनीतील ओलावा, पाणीसाठे आणि पिकनुकसान यांचा सर्वंकष आढावा घेऊन दर्यापूर तालुक्यातील परिस्थितीची तातडीने पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली. ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या भागांचा विशेष आढावा घेऊन दुष्काळी उपाययोजना लागू करणे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपये नुकसानभरपाई देणे, सर्व शेतीकर्जाबाबत ☞(पान २ वर)

# प्राणघातक हल्ल्यातील चार विधीसंघर्षित बालक ताब्यात

## दारू पिण्यासाठी पैसे मागत चाकूने वार केल्याचा आरोप



**अमरावती/प्रतिनिधीः-** दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून एमआयडीसी परिसरात एका कामगारावर चाकूने प्राणघातक हल्ला करणाऱ्या चार विधीसंघर्षित बालकांना अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाने महादेवखोरी जंगल परिसरातून तातडीने ताब्यात घेतले. ही कारवाई २० सप्टेंबर रोजी करण्यात आली. पुढील तपासासाठी चौघांनाही राजापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. राजापेठ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शीतल सागर परतेकी (वय २५, रा. जेवडनगर, अमरावती) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. त्यांचे पती सागर परतेकी हे साई पाइप, एमआयडीसी येथील कंपनीत काम करतात. २० सप्टेंबर रोजी रात्री साडेसातच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे रिक्षाने कामावर जाण्यासाठा ☞(पान २ वर)

# कुख्यात 'छोटा डॉन' एमपीडीएखाली स्थानबद्ध

## ८ गंभीर गुन्हे दाखल; मध्यवर्ती कारागृहात रवानगी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय असलेल्या श्रावण ऊर्फ 'छोटा डॉन' राजेश बनारसे (वय १९, रा. वरुणनगर, महादेवखोरी, अमरावती) याच्यावर पोलिसांनी एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. त्याच्याविरुद्ध अमरावती शहरातील फ्रेजरपुरा, राजापेठ, नांदगावपेठ तसेच अमरावती ग्रामीणमधील तिवसा पोलीस ठाण्यात खून, जबरी चोरी, चोरी, अश्लील कृती, धमकी, फौजदारी धाकदपट, अवैध शस्त्र बाळगणे तसेच तडीपारी आदेशाचे उल्लंघन यांसह गंभीर स्वरूपाचे एकूण आठ गुन्हे दाखल आहेत. स्थानबद्धतेचा आदेश बजावल्यानंतर त्याला २१ सप्टेंबर रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले. श्रावण बनारसे हा २०२५ पासून गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्यावर यापूर्वीही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तसेच त्याला तडीपार करण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही तो गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय राहिल्याने त्याच्याविरुद्ध एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली.

पोलिसांच्या माहितीनुसार, बनारसेविरुद्ध खून, जबरी चोरी, चोरी, आगळीक करणे, अश्लील कृती करणे, मृत्यू किंवा जबर दुखापत घडवून आणण्याची धमकी देणे, फौजदारीपात्र धाकदपट करणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, सामाईक इरादा, ☞(पान २ वर)

# मंगेश कळसकर कुटुंबीयांना ५६ लाखांची नुकसान भरपाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्याच्या इतिहासात रस्ता अपघातीतील कदाचित सर्वात मोठा मोबदला दिला जात आहे. सप्ताहभरापूर्वी झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतीत अमरावतीच्या एका महिलेला जनरल इन्शुरन्स कंपनी कडून ५६ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय जिल्हा न्यायाधीशांनी दिला आहे.माहितीनुसार, रंजना कळसकर नामक महिलेचे पती मंगेश कळसकर यांचा या वर्षी मे महिन्यात रस्ता अपघातात मृत्यू झाला होता. परिजनांनी लिबर्टी इन्शुरन्स कंपनीकडून अपघात विमा घेतला होता. त्यांचा मोटर अक्सीडेंट क्लेम प्रकरण क्रमांक २०८/२६ असा होता.

**अमरावतीच्या इतिहासातील सर्वात मोठा मोबदला**

दोन दिवसापूर्वी झालेल्या लोक अदालतीत तक्रारकर्ता रंजना कळसकर व इतरांच्या वतीने एड. रोकडे यांनी बाजू मांडली, तर लिबर्टी विमा कंपनीच्या वतीने एड. पवार यांनी पक्ष ठेवला. लोक अदालतीत हे प्रकरण ☞(पान २ वर)

